

मासिक वार्तापत्र • अंक ४ • फेब्रुवारी २०१६ • सहयोग राशी - रु. ५ • १६ पाने

# कामगार बिगुल

**नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक**


फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे? ८

मार्क्सचे भांडवल समजून घ्याः चित्रांकनासह १४

कथा
नागडा राजा
येह शेङ ताओ १५


## विश्वव्यापी मंदी आणि सांप्रदायिक फासिस्ट दहशतीच्या छायेत सरले वर्ष २०१५

# नव्या वर्षात कामगार वर्गाला फासीवादी वावटळ भेदत पुढे जाण्याचा संकल्प करावाच लागेल

संपादक मंडळ

वर्ष २०१५ ला निरोप देताना एकविसाव्या शतकाचे दीड दशक पूर्ण झाले आहे. खरे तर या दीड दशकातील एक एक वर्ष कष्टकरी जनतेसाठी विद्ध्वंस आणि दुर्दशा घेऊनच आले, मात्र या बाबतीत गेले वर्ष वैशिष्ट्यपूर्ण होते. आर्थिक शोषण-उत्पीडनाबरोबर भगवी सांप्रदायिक फासीवादी दहशत आपल्या नग्न रूपात गेल्या वर्षी समोर आली आणि तिने कामगर वर्ग आणि प्रागतिक लोकांच्या जगण्यातील घुसमट सहन करण्या पलीकडे नेली. २००७ पासून सुरू असलेल्या विश्वव्यापी महामंदीने गेल्या वर्षातसुद्धा जगभरात कष्ट करून पोट भरणाऱ्या लोकांना कामगार कपात, बेरोजगारी आणि महागाईच्या तडाख्यांनी घायाळ केले. आपल्या आंतरिक संकटाशी झुंजणाऱ्या जागतिक भांडवलशाहीने जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये क्षेत्रिय युद्धे आणि दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देत पाशवतेचे नवे मानदंड स्थापित केले. नफ्याच्या आंधळ्या हव्यासाने निसर्गाचा नाश तसाच सुरू ठेवला. भांडवली लुटमार, अत्याचार-अनाचाराची ही विनाशलीला जनतेने मुकाटपणे सहन केली, असे नाही. जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये भांडवली सत्ताधीशांच्या विरोधात लोक रस्त्यावर उतरले, मात्र कोणत्याही क्रांतिकारी नेतृत्त्वाच्या उदयाच्या खुणा गेल्या वर्षीसुद्धा दिसून आल्या नाहीत व त्यामुळे कोणतेही सशक्त भांडवलशाही विरोधी आंदोलन उभे राहू शकले नाही. त्यामुळे या वर्षीची आव्हाने अधोरेखित करण्यासाठी गेल्या वर्षाच्या घटनाक्रमाकडे एकवार नजर फिरवणे आपल्यासाठी आवश्यक ठरते.

केंद्रातील नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वातील एनडीए सरकारने गेल्या वर्षभरातील आपल्या कारनाम्यांद्वारे अशा लोकांनासुद्धा भारतातील फासीवादी उभाराच्या वास्तवाबद्दल विचार करण्यास भाग पाडले, जे आत्तापर्यंत हे वास्तव मान्य करण्यास टाळाटाळ करीत होते. या देशाची कष्टकरी जनता, अल्पसंख्याक आणि दलित-उत्पीडित समुदाय या फासीवादी उभाराच्या निशाण्यावर आहे. गेल्या वर्षी श्रमसुधारांच्या नावाखाली बुर्ज्वा लोकशाहीची अतिमर्यादित लोकशाही चौकट आणखी संकुचित करून कामगारांचे उरले सुरले अधिकार हिरावून घेण्याच्या हालचालींना वेग आला. नवउदारवादाच्या गेल्या अडीज दशकांमध्ये वेगवेगळ्या श्रमकायद्यांना अगोदरच्या सरकारने अत्यंत कमकुवत केलेच होते, परंतु मोदी सरकारने ते बदलून पूर्णपणे भांडवलशहांच्या बाजूने वळवण्यास सुरुवात केली. देशभरात मोदी लाटेची हवा निघून जात असताना भांडवलदार वर्गाचा मात्र अजून आपल्या या नेत्यावर पूर्ण विश्वास आहे तो त्यामुळेच. अर्थात, वेगवेगळ्या मुद्द्यांवर संसद वारंवार स्थगित झाल्यामुळे श्रमकायद्यांमधील दुरुस्तीसंबंधी विधेयकाला अजून संसदेची मंजुरी मिळू शकलेली नाही. मात्र केंद्रीय श्रम मंत्रालयाने आत्तापर्यंतच्या सर्वात मोठ्या श्रमसुधारांद्वारे सहा मूलभूत श्रमकायद्यांमध्ये फेरबदल करण्यासाठी आणि सध्याच्या ४४ केंद्रीय श्रम कायद्यांना संपुष्टात आणून चार संहिता बनवण्यासाठी कंबर कसलेली आहे. भांडवलदार वर्गाने कामगारांच्या रक्ताचा एक एक थेंब पिळून काढण्याच्या आड येणारे उरलेसुरले अडथळेसुद्धा त्यामुळे दूर होतील. याशिवाय गेल्या वर्षी महाराष्ट्रातील भाजपा सरकारनेसुद्धा राजस्थान सरकारप्रमाणेच श्रम कायदे भांडवलदारांच्या बाजूने वळवण्याची प्रक्रिया गतिमान केली.

मागील कित्येक वर्षांप्रमाणेच गेल्या वर्षातसुद्धा देशातील कष्टकरी जनता महागाईच्या तडाख्यांनी हैराण झाली. चलनवाढीच्या सरकारी आकड्यांच्या चलाखीद्वारे सरकारने महागाईवर नियंत्रण मिळवल्याचे कितीही दावे केले तरी महागाईने सामान्य लोकांचे जगणे मुश्कील केले आहे, हे या देशातील जनता आपल्या दैनंदिन जीवनातून बर्यापैकी जाणून आहे. डाळ, भाज्या, तेल, अंडी, दूध, औषधे इत्यादींच्या किंमती वर्षभर वाढत

पान ११ वर

# रोहित वेमुलाच्या मृत्यूने उभे केलेले काही प्रश्न, ज्यांची उत्तरे जातिउन्मूलनाची ऐतिहासिक परियोजना पुढे नेण्यासाठी अनिवार्य आहेत.

*अभिनव*

देशभरातील विद्यापीठ परिसर १७ जानेवारी रोजी झालेल्या रोहित वेमुला याच्या संस्थात्मक हत्येनंतर आक्रोशाने धुमसतो आहे. हैदराबादपासून दिल्लीपर्यंत आणि मुंबईपासून कोलकातापर्यंत तमाम संवेदनशील आणि न्यायप्रिय तरुण रस्त्यावर उतरले आहेत. कार्पोरेट मिडियासुद्धा या संतापाच्या लाटेवर पांघरूण घालू शकलेले नाही. रोहितला आत्महत्या करण्यास भाग पाडणारी परिस्थिती निर्माण करण्यात बंडारू दत्तात्रेय आणि स्मृति इराणीबरोबरच विद्यापिठाचे कुलगुरू आप्पाराव यांचा स्पष्ट हात होता, हे वास्तव लोकांपर्यंत पोहोचल्यामुळे मोदी सरकारचे मंत्री आणि विद्यापीठ प्रशासनाची छी-थू होते आहे. आत्तापर्यंत कोणत्याही दोषी व्यक्तीवर सरकारने कोणतीही कारवाई केलेली नाही, उलट त्यांना वाचवण्याचे सरकारी प्रयत्न सुरू आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये इतर प्रतिरोधांना चिरडून टाकण्याचे जे धोरण मोदी सरकारने अंगिकारले आहे, तेच धोरण येथेसुद्धा राबविले जात आहे. एफटीआईआई आणि आक्युपाई यूजीसीच्या संघर्षात आपण पाहिले आहे, की प्रतिरोधाच्या आंदोलनांना आपल्या गतीने मरू देण्याचे आणि त्याचबरोबर अधूनमधून पाशवी दमनाच्या कारवाईच्या कारस्थानाचे हे धोरण आहे. प्रागतिक शक्ती आतापर्यंत या धोरणाला कोणत्याही प्रकारचे प्रत्युत्तर देऊ शकलेल्या नाहीत, ही गोष्ट वेगळी. त्याच्या कारणांवर आपण नंतर चर्चा करू.

आता आपल्या चर्चेचा विषय आहे, एका अत्यंत संवेदनशील, न्यायप्रिय तरुणाचा अकाली मृत्यू आणि त्याचा परिणाम म्हणून आपल्या समोर उभे ठाकलेले काही यक्षप्रश्न, ज्यांची उत्तरे दिल्याशिवाय आपण जातीच्या उच्चाटनाच्या परियोजनेत थोडेसुद्धा पुढे सरकण्याची आशा करू शकत नाही, कार्ल सागानसारखा शास्त्रज्ञ बनण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या रोहित वेमुलाने आत्महत्या कां केली? ताऱ्यांचे जग, अंतराळ आणि निसर्गावर निस्सीम प्रेम करणाऱ्या या तरुणाने जीवनाऐवजी मृत्यूला मिठी कां मारली? माणसावर प्रेम करणारा हा तरुण अशा प्रकारे निराशेच्या गर्तेत कां कोसळला? न्याय आणि समतेच्या लढ्यात आघाडीच्या फळीत असणारा हा तरूण, ज्याच्या क्षमतेची जाणीव त्याच्या विरोधकांनासुद्धा होती, तो अचानक हा लढा आणि लढ्यातील आपल्या सोबत्यांना सोडून कां निघून गेला? या प्रश्नांचे उत्तर देण्याचा प्रयत्न याआधीच अनेक क्रांतिकारी कार्यकर्ते बुद्धिजीवी आणि विद्यार्थी तरूण साथीदारांनी केलेला आहे. आम्ही कोणत्याही मुद्द्याची पुनरुक्ती करणार नाही. या प्रश्नावर आम्हांला जे काही वाटते, त्याचे काही वेगळे पैलू आम्ही तुमच्यासमोर ठेवू इच्छितो.

रोहितच्या मृत्यूचे खरे कारण आत्महत्या हे नाही, तर संस्थात्मक हत्या हे आहे, हे सांगणारे काही आम्ही पहिले नाही. तसेच रोहितची हत्या निराशा आणि हताशेचा तात्कालिक परिणाम असताना, ऐतिहासिकदृष्ट्या आजच्या राजकीय परिस्थितीच्या विरोधातील हा एक विद्रोहसुद्धा आहे व त्याने देशभरातील विद्यार्थी- युवा आंदोलनामध्ये एक ठिणगी पेटवण्याचे काम केले आहे, हे सांगण्यातही आम्ही नवेपणाचे कोणतेही श्रेय घेऊ शकत नाही. परंतु याबरोबरच काही अडचणीत टाकणारे प्रश्नसुद्धा आहेत. रोहितला न्याय मिळवून देण्यासाठीच्या संघर्षात पुढे जाता जाता ते अधिकाधिक महत्त्वपूर्ण बनत जाताहेत. प्रगतिशील आंदोलनामध्ये हे प्रश्न टाळण्याकडेच कल असल्याचा भास होतो आहे. या प्रश्नांवर आम्ही सर्वांत शेवटी येऊ. सुरुवातीला, पुनरूक्तीचा धोका स्वीकारून आम्ही काही मूलभूत प्रश्नांपासून चर्चेला सुरुवात करू इच्छितो.

पान ४ वर

# जन्मदिनानिमित्त बर्टोल्ट ब्रेख्त यांच्या तीन कविता



बर्टोल्ट ब्रेख्त
(१० फेब्रुवारी १८९८ - १४ ऑगस्ट १९५६ )

## ब्रीदवाक्य

जर तेथे वारा वाहत असेल,
तर मी एक झेंडा फडकवू शकतो,
जर तेथे एकही झेंडा नसेल
तर मी काठ्या-कपड्यांनी झेंडा बनवीन.

## जेव्हा कूच केले जात असते

जेव्हा कूच केले जात असते
बहुतेक लोकांना माहीत नसतं
की शत्रू त्यांच्या मस्तकावर
कूच करतो आहे.
जो आवाज त्यांना हुकूम देतो
त्यांच्याच शत्रूचा आवाज असतो
आणि जो माणूस शत्रूविषयी बडबडत असतो
स्वतःच त्यांचा शत्रू असतो.

## जनरल, तुझा रणगाडा एक मजबूत वाहन आहे

जनरल, तुझा रणगाडा एक मजबूत वाहन आहे
तो जंगल धुळीस मिळवतो
आणि चिरडून टाकतो शेकडो माणसांना
परंतु एक गुण त्याच्यात आहे –
त्याला एका ड्रायवरची गरज असते
जनरल, तुझा बाँबवर्षक मजबूत आहे
तो वादळाहून वेगाने उडतो आणि
हत्तीपेक्षाही जास्त वजन वाहून नेतो
परंतु एक गुण त्याच्यात आहे
त्याला एका मेस्त्रीची गरज असते.
जनरल, माणूस किती उपयोगी आहे
तो उडू शकतो, तो मारू शकतो
परंतु एक गुण त्याच्यात आहे-
तो विचार करू शकतो.

सहकाऱ्यांनो
'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लुट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट)
मुंबई ४०००४३ मो. नं. ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.

**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**



खरी गोष्ट तर ही आहे की धर्मच आपल्याला आपापसात वैरभाव बाळगायला शिकवतात. भावाला भावाचे रक्त वाहण्यास शिकवतात. भारतीयांची एकता धार्मिक एकोप्यातून निर्माण होणार नाही, तर ती धर्माच्या चितेवर तयार होईल. कावळ्याला कितीही धुतले तरी त्याचा हंस होत नाही. वाकळ धुवून त्यावर रंग चढवण्यात अर्थ नाही. धर्माचा रोग स्वाभाविक आहे, त्याच्या मृत्यु व्यतिरिक्त त्यावर दूसरा उपाय नाही.

**राहुल सांस्कृत्यायन**

**'कामगार बिगुल' ची वेबसाइट**
www.marathi.mazdoorbigul.net

**फेसबुक पेज**
www.facebook.com/kamgarbigul


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : नारायण खराडे, विराट चौधरी

संपादकीय कार्यालय : रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३

संपर्क : ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. ५ (एका अंकासाठी)
वार्षिक - रु. १०० (टपाल शुल्कासह)

# रोहितच्या संस्थात्मक हत्येचा देशभरातून निषेध

हैदराबाद केंद्रिय विद्यापीठाचा विद्यार्थी रोहित वेमुलाच्या संस्थात्मक हत्येने देशभरातील प्रगतिशील विद्यार्थी आणि संघटनांना रस्त्यावर उतरायला भाग पाडले. १७ जानेवारीपासून आतापर्यंत असंख्य निदर्शने झाली आहेत, आणि अजूनही सुरू आहेत. बिगुल मजदूर दस्ता, दिशा छात्र संगठन, अखिल भारतीय जातिविरोधी मंच, नौजवान भारत सभा आणि युसीडीई आदी संघटनांनीसुद्धा या मुद्यावर विद्यार्थी आणि तरुणांना घेऊन वेगवेगळ्या भागांमध्ये जबरदस्त प्रतिरोध व्यक्त केला. विद्यार्थी-तरुण आणि कामगारांनी रोहितच्या हत्येला कारणीभूत असलेले भाजप मंत्री बंडारू दत्तात्रेय, मानव संसाधन मंत्री स्मृती इराणी यांच्या राजीनाम्याची आणि हैदराबाद विद्यापीठाचे कुलगुरू अप्पाराव यांच्या निष्कासनाची मागणी करीत या मुद्द्यावर जनसामान्यांमध्ये प्रचार केला. या सर्व जबाबदार व्यक्तींना एका संवेदनशील आणि गंभीर विद्यार्थ्याला आत्महत्या करण्यास भाग पाडल्याबद्दल कठोर शिक्षा झाली पाहिजे व जोपर्यंत या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही.

कालिना येथील मुंबई विद्यापीठ परिसरामध्ये युसीडीई व अन्य विद्यार्थी संघटनांनी केंद्र सरकार व दोषी व्यक्तींच्या विरोधात जोरदार घोषणा देत विरोध मार्च काढला. मुंबईतील सर्व प्रागतिशील संघटनांच्या संयुक्त मोर्चाद्वारे भायखळ्यापासून आजाद मैदानपर्यंत विशाल रॅली काढण्यात आली. यावेळी हजारो लोक सहभागी झाले होते. नौजवान भारत सभा, नरवाणा (हरयाणा) शाखेने धमतान साहिब गावामध्ये या घटनेच्या विरोधात कोपरा सभा घेत पत्रके वाटली तसेच धमतान बसस्थानकावर निदर्शकांनी केंद्रीय मंत्र्यांच्या पुतळ्याचे दहन केले. कलायतमध्येसुद्धा निदशर्ने करून पत्रके वाटण्यात आली तसेच स्मृती इराणी यांचा पुतळा जाळून रोहितला न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा संकल्प करण्यात आला. दिशा छात्र संघटनेने रोहितच्या संस्थात्मक हत्येच्या विरोधात इलाहाबादच्या पीडी टंडन पार्क, सीवील लाईन्स पासून सुभाष चौकापर्यंत प्रतिरोध मार्च काढला, तसेच कदम मिलाओ साथियों या गीतासह लोकांना एकजूट होऊन निरंकुश फासीवादी शक्तींना प्रत्युत्तर देण्याचे आवाहन करण्यात आले. दिशा छात्र संघटनेने दिल्लीत मानव संसाधन विकास मंत्रालयासमोर निदर्शने केली व दोषींना ताबडतोब शिक्षा देण्याची मागणी करीत इंकलाब जिंदाबादच्या घोषणा दिल्या. दिशा छात्र संघटनेच्या महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक शाखेनेही पत्रके वाटून तरुणांपर्यंत आपले म्हणणे पोहोचवले. लखनौ येथे नौजवान भारत सभा, नयी दिशा मंच आणि वेगवेगळ्या लोक संघटनांनी जीपीओ स्थित गांधी प्रतिमेपाशी निदर्शने करून पत्रके वाटली. पंजाब स्टुडेंट्स युनियन – ललकारने पंजाबमध्ये मानसा, भटिंडा आणि चंदीगढ येथे वेगवेगळ्या ठिकाणी क्रांतिकारी गीते गात आपला विरोध व्यक्त केला आणि रोहितला न्याय मिळवून देण्यासाठी सर्व प्रगतिशील आणि न्यायप्रिय लोकांना रस्त्यावर उतरून आवाज उठवण्याचे आवाहन केले. देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये रोहितच्या प्रकरणाने लोकांमध्ये निर्माण केलेला असंतोष दिवसागणिक वाढतो आहे व दोषींना शिक्षा आणि रोहितला न्याय मिळवून देण्यासाठी विद्यार्थी प्रतिबद्ध होऊन लढत आहेत. सर्व प्रगतिशील विद्यार्थी संघटनांनी केलेल्या निदर्शने आणि मोर्चांमध्ये वक्त्यांनी वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून विस्तारपूर्वक आपले विचार मांडले. एकूण घटनाक्रम मांडत वक्त्यांनी सांगितले की संपूर्ण विद्यापीठ प्रशासनापासून केंद्रिय मंत्री बंडारू दत्तात्रेय, मानव संसाधन विकास मंत्री स्मृती इराणी आदींनी रोहितला आत्महत्या करण्यास भाग पाडले. आंबेडकर स्टुडेंट्स असोसिएशनचा सदस्य असलेला रोहित आणि त्याचे सोबती बराच काळ संघ आणि संघाशी जोडलेल्या इतर संघटनांच्या निशाण्यावर होता. हिंदुत्त्ववादी शक्तींनी देशभरात असहमतीचा गळा आवळून उच्च शिक्षण संस्था, कला आणि साहित्य संस्था आदींच्या भगवाकरणाची जी मोहीम उघडली आहे, तिचा वेगवेगळ्या माध्यमांतून बुरखा फाडण्यात रोहित सक्रिय भूमिका पार पाडीत होता. गेल्या वर्षी आगस्टमध्ये एका एबीवीपी नेत्याच्या खोट्या तक्रारीवरून केंद्रिय मंत्री बंडारू दत्तात्रेय यांनी स्मृती इराणी यांना रोहित आणि त्याच्या सोबत्यांवर कारवाई करण्यासाठी पत्र लिहिले आणि मानव संसाधन मंत्रालयाने विद्यापीठाला पाच पत्रे पाठवून दबाव निर्माण केला व रोहितसह पाच शोधविद्यार्थ्यांची हास्टेलमधून हकालपट्टी करण्यात आली, तसेच त्यांची फेलोशिपही थांबवण्यात आली. त्यानंतरही त्यांनी या अत्याचाराच्या विरोधात मोकळ्या आकाशाखाली आपला संघर्ष सुरूच ठेवला, परंतु प्रशासनाने त्यांच्या संघर्षाकडे अजिबात लक्ष दिले नाही आणि अखेरीस निराश होऊन विज्ञानाच्या क्षेत्रात विलक्षण रस असणाऱ्या रोहितने घुसमटलेल्या जीवनापेक्षा मृत्यूला मिठीत घेणे पसंत केले. ज्यांचे प्रतिनिधी आज सत्तेच्या जवळजवळ प्रत्येक संस्थेमध्ये उच्च पदांवर आहेत किंवा त्यांना तेथे बसवण्याची मोहीम भाजप सरकार सत्तेत आल्यापासून सुरू झालेली आहे, त्या पितृसत्ता, ब्राह्मण्यवाद आणि धर्माचे राजकारण करणाऱ्या फासीवादी टोळ्यांच्या विरोधात त्याने आवाज उठवला होता, हाच त्याचा दोष होता. अस्मितेचे राजकारण करणारे लोक या मुद्द्यावर एक तर गप्प आहेत किंवा हा मुद्दा मतांच्या राजकारणासाठी वापरण्याच्या प्रयत्नात आहेत, व त्यांच्यापैकी बरेच जण अगोदरच फासीवाद्यांच्या कुशीत जाऊन बसले आहेत, असेही वक्त्यांनी सांगितले. रोहितला न्याय मिळवून देण्यासाठी देशभरात सुरू असलेल्या आंदोलनाला पूर्ण समर्थन देण्याची घोषणा करीत वक्त्यांनी सांगितले की या आंदोलनाला जातीयवादी आणि धार्मिक कट्टरपंथी, रूढीवादी शक्तींच्या युतीच्या विरोधातील व्यापक संघर्षाशी जोडूनच आपण रोहितच्या बलिदानाला खरीखुरी श्रद्धांजली वाहू शकतो.




१९ जानेवारी रोजी मुंबई विद्यापीठाच्या कालिना कँपसमध्ये निदर्शन करणारे युनिव्हर्सिटी कम्युनिटी फार डेमोक्रेसी अण्ड इक्वेलिटी, अखिल भारतीय जाति विरोधी मंच, आणि इतर जनसंघटनांचे सदस्य.




२३ जानेवारी रोजी इलाहाबाद येथे दिशा छात्र संगठन आणि नौजवान भारत सभेने अन्य जनसंघटनांसह विरोध जुलूसाचे आयोजन केले. इलाहाबाद येथील पी.डी.टंडन पार्कपासून सिविल लाईन्स येथील सुभाष चौकापर्यंत प्रतिरोध मार्च काढण्यात आला.




२१ जानेवारी रोजी लखनऊ येथे निदर्शन करणारे अखिल भारतीय जाति विरोधी मंच, नई दिशा छात्र मंच, नौजवान भारत सभा, जागरूक नागरिक मंच आणि वेगवेगळ्या संघटनांचे सदस्य.



१८ जानेवारी रोजी एम.एच.आर..डी. बाहेर निषेध करणारे वेगवेगळ्या संघटनांचे सदस्य आणि विद्यार्थी- तरुण. या वेळी दिशा छात्र संगठन आणि नौजवान भारत सभेचाही सहभाग होता. दिल्ली सरकारतर्फे या निदर्शकांवर भयंकर लाठी चार्ज करण्यात आला आणि कित्येकांना अटकही करण्यात आली. तरीही विद्यार्थी आणि तरुणांनी आंदोलन सुरूच ठेवले.

# जातिउन्मूलनाची ऐतिहासिक परियोजना पुढे नेण्यासाठी अनिवार्य उत्तरे

पान १ वरुन

## रोहितच्या संस्थात्मक हत्येच्या शोकांतिकेचे तीन निर्देशांक

रोहितच्या मृत्यूनंतर जे आंदोलन सुरू झाले त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या शक्ती सक्रीय आहेत. ही एक संस्थात्मक हत्या आहे, याबाबत सामान्य सहमती असूनदेखील, अन्य बाबींबद्दल या शक्तींमध्ये मतभेद आहेत आणि ते या दुःखद घटनेची व्याख्यासुद्धा वेगवेगळ्या प्रकारे करीत आहेत. रोहित मुळात दलित असल्यामुळे त्याच्यासोबत असे घडले, असे काही जणांचे म्हणणे आहे. वेगवेगळ्या आंबेडकरवादी संघटना आणि अस्मितावादी राजकारण करणाऱ्या संघटना याला दलित उत्पीडनाचा मुद्दा बनवीत आहेत, व एकूण मुद्दा अस्मितेपुरता मर्यादित करीत आहेत. काही डाव्या संघटनासुद्धा (संसदीय आणि बिगरसंसदीय) या कोरसमध्ये तार सप्तकात गात आहेत. भूतकाळात कम्युनिस्ट आंदोलन जातीच्या प्रश्नाला नीट समजू न शकल्यामुळे व आंबेडकरांवर टीका करण्याच्या पश्चात्तापातून काही जण असे करीत आहेत, तर इतर काही निव्वळ संधीसाधू राजकारणाच्या भूमिकेतून असे करीत आहेत. काही जण असेही आहेत ज्यांमध्ये हा संधीसाधूपणा आणि पश्चात्ताप यांचे मिश्रण झाले आहे. काही प्रागतिक संघटना आणि बुद्धिजीवी असेसुद्धा आहेत जे रोहित वेमुलाच्या दलित असण्याला पुरेसे महत्त्व देत नाही आहेत, व संघी दमनाच्या सामान्य लाटेचा एक परिणाम म्हणून त्याच्याकडे पाहत आहेत. कित्येक आंबेडकरवादी असे आहेत जे रोहित वेमुलाची फेसबुक पेज आणि डायरीतील अंश आपल्या पद्धतीने आणि संदर्भांपासून वेगळे काढून मांडत आहेत आणि रोहित वेमुलाला एक सामान्य आंबेडकरवादी बनवण्याचा प्रयत्न करीत आहेत. रोहितचा आंबेडकरवादी विचारांकडे कल असल्यामुळे त्याचा त्याग म्हणजे आंबेडकरवादी विचार योग्य असल्याचा पुरावा म्हणून ते सादर करीत आहेत. **अशा प्रकारे ते सर्व अस्मितावाद्यांप्रमाणे भावनांचे राजकीयीकरण करण्याऐवजी राजकारणाचे भावनात्मीकरण करीत आहेत.** थोडक्यात, इतरही अनेक प्रकारचे दृष्टिकोन आपआपसात भिडत आहेत. याचा परिणाम म्हणून, जे विद्यार्थी, तरुण रस्त्यावर आहेत त्यांच्यामध्येसुद्धा रोहितला न्याय मिळवून देण्यासाठीच्या एकूण आंदोलनाबाबत योग्य दृष्टिकोन आणि या दुःखद घटनेच्या एका संतुलित आणि वैज्ञानिक विश्लेषणाचा अभाव दिसून येतो आहे. अशा वेळी आम्ही या घटनेची एक संतुलित आणि वैज्ञानिक व्याख्या करण्याचा प्रयत्न करीत आहोत. मात्र या बाबतीत आमचे म्हणणे अंतिम असेल, असा आमचा कोणताही दावा नाही.

रोहित वेमुलाच्या संस्थात्मक हत्येच्या दुःखद घटनेचे **तीन प्रमुख निर्देशांक (कोऑर्डिनेट्स)** आहेत. ते समजून घेणे रोहित वेमुलासाठी न्यायाचा संघर्ष पुढे नेण्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे. या तिन्ही कारकांनी रोहित वेमुलाच्या संस्थात्मक हत्येचा ऐतिहासिक संदर्भ घडवलेला आहे आणि ते त्यांच्या सापेक्षिक महत्त्वासह समजूनच आपण ही हत्या आणि अशा तमाम हत्यांच्या विरोधात आवाज उठवू शकतो.

**पहिला** महत्त्वाचा पैलू म्हणजे, रोहित वेमुला आणि त्याच्या सोबत्यांनी संघी फासीवाद आणि उजव्या राजकारणाला हैदराबाद केंद्रिय विद्यापीठात एक राजकीय विरोध उभा केला आणि हाच त्यांचा सर्वात मोठा गुन्हा होता. रोहित आणि त्याच्या सोबत्यांनी बऱ्याच काळापासून हैदराबाद विद्यापिठात संघी टोळीच्या सांप्रदायिक ब्राह्मण्यवादी फासीवादाच्या विरोधात एक राजकीय संघर्ष पुकारला होता. त्याचबरोबर ते लोकशाही आणि नागरिक अधिकारांसंबंधी वेगवेगळे मुद्दे जोरदारपणे मांडत होते. कॅंपसमध्ये याकूब मेमन आणि अफजल गुरू यांच्या फाशीच्या संदर्भात फाशीच्या शिक्षेला विरोध करणे, बीफ फेस्टिव्हलचे आयोजन करणे आणि त्याचबरोबर हाफपॅंटवाल्या संघवाल्यांचे पितळ उघडे पाडणारी फिल्म मुजफ्फरनगर बाकी है चे प्रदर्शन करणे व त्याचबरोबर संघी विद्यार्थी संघटना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशाही सतत समस्या आणि आव्हाने उभी करणे हा रोहित आणि त्याच्या साथीदारांचा सर्वात मोठा गुन्हा होता. मोदी सत्तेत येण्याच्या आधीपासून आणि प्रामुख्याने त्यानंतर सांप्रदायिक फासीवादी आणि उजव्या शक्तींना तो खटकत होता. फासीवादी राजकारण हिटलर आणि मुसोलिनीच्या काळापासून कित्येक परिवर्तनांमधून गेले आहे आणि प्रत्येक विचारधारा आणि चळवळीप्रमाणेच फासीवादी विचारधारा आणि चळवळसुद्धा आपल्या भूतकाळातून शिकत असतात आणि आपली रणनीती आणि रणकौशलांमध्ये परिवर्तन करीत असतात, म्हणजेच रिडेम्प्टिव्ह ॲक्टिविटी करीत असतात. परंतु काही गोष्टी अशा आहेत ज्या मुळात फासीवादी विचारधारा आणि चळवळीच्या स्वभावातूनच निर्माण होत असतात व त्यांच्याशी नाभिनाळबद्ध असतात. कोणत्याही प्रकारचा राजकीय विरोध सहन न करणे, ही त्यापैकीच एक प्रवृत्ती. रोहित आणि त्याचे सोबती सांप्रदायिक




फासीवाद्यांना आणि ब्राह्मणवाद्यांना कॅंपसमध्ये फक्त विरोधच करीत नव्हते तर त्यांच्यासाठी ते एक राजकीय आव्हान ठरू लागले होते. म्हणूनच संघी विद्यार्थी संघटनेने त्यांना निशाणा बनवणे सुरु केले. खोटे आरोप लावून त्यांना वसतीगृहातून काढायला लावणे, नंतर निलंबित करणे आणि त्यानंतर विद्यापिठातील सार्वजनिक ठिकाणांवर त्यांच्यावर प्रतिबंध लादणे – या सार्या गोष्टी म्हणजे रोहित आणि त्याच्या सोबत्यांना त्याच कारणासाठी निशाणा बनवण्याची उदाहरणे होत. जेथे हाफपॅंटवाल्यांची ब्रिगेड कमकुवत आहे तेथे ती सध्या मोदी सत्तेत असण्याचा फायदा घेत मनमानी करीत आहे. जामिया मिलिया आणि अलिगढ मुस्लिम विद्यापिठाची स्वायत्तता रद्द करण्याच्या कारस्थानाद्वारे संघी ब्रिगड यावेळी त्यांचा अल्पसंख्याक दर्जा समाप्त करण्याची मागणी करीत आहे, हे येथे उल्लेखनीय आहे. अरुणाचल प्रदेशातील सरकार बरखास्त करून राष्ट्रपती शासन लागू करण्यापासून विद्यापिठांची स्वायत्तता रद्द करणे आणि शैक्षणिक संस्थांचे भगवाकरण करण्यापर्यंत याची अनेक उदाहरणे देता येतील. हैदराबाद विद्यापिठात जेव्हा राजकीयदृष्ट्या संघी विद्यार्थी संघटना रोहित आणि त्याच्या सोबत्यांवर भारी पडू शकली नाही (ते ए.एस.ए.शी संबंधित होते, विद्यापीठ विद्यार्थीसंघ निवडणुकीत एस.एफ.आई. आणि ए.एस.ए यांची युती आहे) तेव्हा त्यांनी रोहित आणि त्याच्या सोबत्यांना इतर पद्धतींनी निशाणा बनवण्यास सुरुवात केली. सैंया भये कोतवाल तो डर काहे का. म्हणूनच बंडारू दत्तात्रेय यांनी एवढ्या सक्रियतेने या प्रकरणात हस्तक्षेप केला आणि स्मृती इराणी यांच्या मानव संसाधन मंत्रालयाने रोहित आणि त्याच्या सोबत्यांना धडा शिकवण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाला पाच पत्रे पाठवली. ही भक्कम सरकारी यंत्रणा आणि सरकारी व्यवस्था पाच तरुण विद्यार्थ्यांच्या पाठी अशी हात धुवून कां लागली होती? ज्या कारणासाठी आज मोदींचे फासीवादी सरकार राजकीय विरोध उभा करणाऱ्या प्रत्येक शक्तीच्या मागे लागले आहे, मग ते एफटीआईआईचे विद्यार्थी असोत, जेएनयूचे विद्यार्थी आंदोलन असो किंवा हेंदराबाद केंद्रिय विद्यापीठातील विद्यार्थी असोत, अगदी त्याच कारणांसाठी. **म्हणूनच जर आपण रोहित वेमुलाची संस्थात्मक हत्या आणि त्याच्या एकूण संघर्षाला फक्त दलित अस्मितेपुरते मर्यादित करून ठेवले, तर तो रोहितच्या राजकीय वारशाचा अपमान नाही का होणार?** त्याच्या एकूण राजकीय संघर्षाला कुठे ना कुठे कमीपणा दाखवण्यासारखे नाही का होणार? रोहितच्या संघर्षाची बांधिलकी फक्त त्याच्या दलित अस्मितेमधून आलेली नव्हती. तो हर तर्हेच्या शोषण आणि उत्पीडनाच्या विरोधात संघर्ष करीत होता. रोहितचा संघर्ष फासीवाद आणि उजव्या विचारधारात्मक राजकारणाच्या विरोधात राजकीय संघर्ष होता. तुम्ही रोहितच्या विचारधारात्मक भूमिकेशी सहमत किंवा असहमत असू शकता, त्याने वास्तव बदलणार नाही. रोहितच्या एका सोबत्याने त्याच्या डायरीतील एक अंश सोशल मीडियाद्वारे प्रकाशित केला आहे. त्यामध्ये रोहितने लिहिले होते की त्याचा विश्वदृष्टीकोन मार्क्सवादी होता, परंतु भारतीय समाजासाठी आंबेडकरांच्या दृष्टीच्या उपयोगितेवर त्याचा विश्वास होता. आंबेडकरांची जातीच्या प्रश्नावर काय भूमिका होती व जातीच्या प्रश्नावर ते काय उपाय सुचवीत होते यावर वेगळी चर्चा केली जाऊ शकेल व आम्ही स्वतः या विषयावर कधीतरी नक्कीच लिहू. मात्र हे स्पष्टच आहे की रोहित आंबेडकरवादी राजकारण आणि मार्क्सवादी विचारधारा यांच्यामध्ये समन्वय मानणारा होता. हा विचार बरोबर आहे की चुकीचा हा वेगळ्या चर्चेचा विषय आहे. त्याचबरोबर रोहित डावे राजकारण (ज्याच्या संसदीय दुरुस्तीवादी प्रकाराशी त्याचा परिचय जास्त होता आणि त्याचा क्रांतिकारी डाव्या राजकारणाशी परिचय नव्हता, असे म्हणता येऊ शकते) किंवा आंबेडकरवादी राजकारण या समीक्षेच्या पलीकडच्या गोष्टी आहेत, असे मानीत नव्हता, हे स्पष्टच आहे. खोडलेल्या भागावरून त्याच्या विचारांसंबंधी कोणताही ठोस निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही, परंतु त्यामध्ये लिहिलेल्या गोष्टी रोहितच्या विचार पटलावर होत्या, हे नाकारता येणार नाही. रोहितचे विचार काहीही असतील, एवढे मात्र नक्की की त्याचे विचारधारात्मक क्षितिज अस्मितावादी राजकारणाइतके संकुचित, अवैज्ञानिक आणि अतार्किक नव्हत, हे तर उघडच आहे. **म्हणूनच रोहितची संस्थात्मक हत्या आणि त्याच्या एकूण राजकीय संघर्षाला फक्त दलित अस्मितेपुरते मर्यादित करणे त्याची राजकीय विचारधारात्मक जाणीव आणि बांधीलकी यांच्यावर अन्याय ठरेल.**

रोहित वेमुलाच्या मृत्यूच्या घटनेचा **दुसरा** निर्देशांक म्हणजे, रोहित वेमुला आणि त्याच्या साथीदारांना निशाणा बनवणे यामुळे जास्त सोपे झाले कारण ते मुळातच समाजाच्या अरक्षित समुदायातून म्हणजेच दलित समुदायातून आलेले होते. त्यांना निशाणा बनवण्याच्या प्रक्रियेत जी बाब निर्णायक ठरत होती ती होती रोहित वेमुला आणि त्याच्या सोबत्यांनी संघी राजकारणाला केलेला विरोध आणि त्यांनी उभे केलेले जबरदस्त आव्हान. असे नसते तर संघी फासीवादी शक्तींनी एका विशिष्ट वेळी आणि एका विशिष्ट संदर्भात काही विशिष्ट दलित विद्यार्थ्यांनाच निशाणा कां बनवले हे सांगणे कठीण होऊन जाईल. त्याचबरोबर, एका विशिष्ट वेळी आणि विशिष्ट संदर्भात काही दलित नेते कशा प्रकारे संघी ब्राह्मण्यवादाच्या कुशीत जाऊन बसले आहेत, हेसुद्धा सांगणे कठीण होऊन जाईल. रोहितच्या हौतात्म्याच्या काल निर्धारणाचे आणि संदर्भ निर्धारणाचे कार्य तेव्हाच होऊ शकते जेव्हा रोहितच्या एकूण लढ्याला एका राजकीय विचारधारात्मक लढ्याच्या दृष्टीने पाहिले जाईल. अस्मितेच्या संघर्षाच्या दृष्टीने त्याकडे पाहून चालणार नाही. **परंतु त्याचबरोबर हे सत्यसुद्धा क्षणभरसुद्धा बाजूला सारले जाता कामा नये की तो एका गरीब दलित परिवारातून आला होता, व म्हणूनच रोहित आणि त्याच्या सोबत्यांना निशाणा बनवणे फासीवादी सत्तेसाठी जास्त सोपे बनले.** या दोन्ही कारकांचे गतित्त्व समजून घेणे गरजेचे आहे.

फासीवादी राजकारण हरतर्हेच्या राजकीय विरोधाला चिरडून टाकते, परंतु ज्यावेळी राजकीय विरोध करणारी व्यक्ती दलित, स्त्री किंवा धार्मिक अल्पसंख्याक असते तेव्हा हे दमन आणि उत्पीडन जास्त सरळ आणि सोपे आणि त्याचबरोबर जास्त क्रूर होते. या सर्वांनाच फासीवादी प्रतिक्रिया वेगवेगळ्या रूपांमध्ये निशाणा बनवीत असते. याचे कारण म्हणजे धार्मिक अल्पसंख्याकांच्या रूपात किंवा जातीय (एथनिक) अल्पसंख्याकांच्या रूपात किंवा प्रवासी किंवा वांशिक अल्पसंख्याकांच्या रूपात आणि काही विशिष्ट संदर्भात जातीय अल्पसंख्याकांच्या रूपात फासीवादी राजकारणाला नेहमीच एका फेटिशची गरज भासत असते त्याचा उपयोग ते जनतेसमोर एक काल्पनिक शत्रू उभा करण्यासाठी करू शकतात. फेटिश ती गोष्ट असते जी लोक आणि सत्य यांच्यामध्ये उभी असते. फासीवादी राजकारण भांडवली संकटाच्या काळातील बुर्ज्वा वर्गाची एक नग्न प्रतिक्रिया असते जी निमभांडवली वर्गाच्या रूमानी, अज्ञानी आणि अंध उभारावर स्वार होऊन येते. तिचे कामच असते मध्ये उभ्या असलेल्या लोकांच्या तळ्यात-मळ्यात असलेल्या जाणीवेचा, किंवा राजकीय चेतनेच्या अभावाचा म्हणूया, वापर करून प्रतिक्रियेचे असे वातावरण निर्माण करणे, ज्याद्वारे भांडवली लूटीला विरोध करणाऱ्या प्रत्येक शक्तीला चिरडले जाऊ शकते. जेव्हा असे प्रतिक्रियेचे वातावरण तयार होते तेव्हा त्याच्या निशाण्यावर फक्त कामगार वर्ग आणि त्याचे आंदोलनच असते असे नाही तर प्रत्येक लोकशाही अधिकार, नागरिक अधिकार, स्वातंत्र्य आणि

पान ५ वर

# जातिउन्मूलनाची ऐतिहासिक परियोजना पुढे नेण्यासाठी अनिवार्य उत्तरे

पान ४ वरुन

वैयक्तिकतासुद्धा येत असते. या वातावरणाच्या निशाण्यावर तंझानियाची कुणी युवती, कुणी प्रेमी युगुल, लहानसहान चोरी करताना पकडली गेलेली कुणी गरीब व्यक्ती असू शकते. अशा प्रकारची प्रतिक्रिया पैदा करण्याची संभावना निम्न भांडवली वर्गाच्या नैसर्गिक जाणीवेमध्येच निहित असते.

आज बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि संघाच्या तमाम आनुषंगिक संघटनांचा आधार याच निम्न भांडवली वर्गामध्येच आहे ज्यामध्ये निम्न मध्यम वर्गापासून खात्या पित्या मध्यम वर्गापर्यंत येतात, आणि जर व्यवसायांबद्दल बोलायचे झाले तर लहान व्यापारी, दुकानदार, ठेकेदार, दलाल, प्रापर्टी डिलर, शेअर व्यवसायी, छोटे कारखानदार यांच्यापासून सुखवस्तू सरकारी कर्मचारी येतात. याशिवाय त्यांच्यामध्ये निम्नमध्यमवर्गातील पिवळ्या चेहऱ्यांचे असे युवकही असतात जे सतत बेरोजगारी, अभाव आणि अनिश्चिततेत राहिल्याममुळे एका भयंकर अंध प्रतिक्रियेचे बळी ठरलेले असतात. फासीवाद समर्थित आणि प्रायोजित अंधराष्ट्रवाद त्यांना जगण्याचे एक कारण प्रदान करतो, त्यांना एका कल्पित समुदायासोबत एक काल्पनिक नात्याचा काल्पनिक आभास देतो. अशा लोकांचे विचार करण्याची, समजण्याची क्षमता गमावलेल्या उन्मादी जमावात रूपांतर करणे फासीवादासाठी सोपे असते . आणि त्यासाठी फासीवादाचे प्रमुख उपकरण म्हणजे विभिन्न अल्पसंख्याकांना काल्पनिक शत्रू म्हणून सादर करणे, स्त्रियांचे दमन करणे, कारण त्यांची एकूण शब्दावली आणि भाषालंकार पुरुषसत्तावादी आणि मस्क्युलिनिस्ट असते. उदाहरणादाखल, मुसलमानांच्या धोक्याचा मुकाबला करण्यासाठी वीर हिंदू पुरुषांची गरज असते. मुसलमानांना धोकादायक ठरवण्याच्या प्रक्रियेचे एक अंग असते मुसलमान पुरुषांना हिंदू स्त्रियांसाठी धोकादायक ठरवणे (उदाहरणार्थ, लव्ह जिहाद इत्यादी) . अशा रूपकीकरणाबरोबरच स्त्रियांचे सतत वस्तुकरण होते, त्यांना आपली मालमत्ता म्हणून पाहण्याची, खरे तर त्यांचे कौमार्य आणि लैंगिकता ही एकूण समुदायाची सामुदायिक संपत्ती बनवण्याची प्रक्रियासुद्धा सुरू होते. एका वेगळ्या अर्थाने ही वस्तुकरणाची आणि अधीनस्थीकरणाची प्रक्रिया एका अगदी वेगळ्या रूपात दलितांबाबतही होते. उच्च ब्राह्मण्यवादी संस्कृती आणि सभ्यता हीच हिंदू श्रेष्ठतेची प्रतीके असतात. म्हणूनच दलितांना, आणि प्रामुख्याने गरीब दलितांना दडपणे, ही हिंदू समाजाचे आरोग्य टिकवून ठेवण्याची एक पूर्वशर्त ठरते. जर हिंदू कर्मकांडीय पदानुक्रमच नष्ट झाला तर मुसलमान आणि इस्लामसमोर हिंदू श्रेष्ठता स्थापित कशी करणार? **त्यामुळे भारताच्या विशेष संदर्भात सांप्रदायिक फासीवादासाठी विशेषत्वाने आणि त्याचबरोबर कोणत्याही प्रतिक्रियावादी दक्षिणपंथी किंवा मध्य दक्षिणपंथी बुर्ज्वा राजसत्तेसाठी साधारणपणे दलित, स्त्रिया आणि मुसलमानांना 'त्यांची जागा' दाखवणे एक मूलभूत गरज बनते.** संघी सांप्रदायिक फासीवादाच्या उभारानंतर आणि सत्तेत आल्यानंतर ही चारित्रिक वैशिष्ट्ये आपल्या शुद्धतर रूपात दिसू लागतात. परंतु साधारणपणे भारतातील भांडवली राजसत्तेच्या बाबतीत हे निःसंदेहपणे म्हटले जाऊ शकते. **थोडक्यात, रोहित आणि त्याचे साथीदार आणि अशाच प्रकारे जेव्हा दलित युवक किंवा कार्यकर्ता व्यवस्थेच्या विरोधात एक राजकीय विरोध आणि आव्हान उभे करतात तेव्हा व्यवस्था सूडाच्या भावनेने आणि दुहेरी प्रतिक्रियेसह तो विरोध चिरडून टाकते आणि म्हणूनच असे म्हटले पाहिजे की रोहितला निशाणा बनवणे मोदी सरकार आणि संघी गुंडांना तुलनेने सुगम झाले कारण ते अगोदरच अरक्षित पार्श्वभूमीतून आले होते.**

रोहितच्या मृत्यूचा **तिसरा महत्त्वपूर्ण पैलू** किंवा निर्देशांक, ज्याच्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे तो म्हणजे रोहित एका गरीब कष्टकरी कुटुंबातून आला होता. **रोहित किंवा त्याच्यासारखे तमाम दलित विद्यार्थी ज्यांनी शैक्षणिक संस्थानांमध्ये आत्महत्या केलेल्या आहेत, ते निरपवादपणे गरीब दलित कुटुंबांतून येणारे होते, हा केवळ योगायोग नाही.** गेल्या दहा वर्षांमध्ये हैदराबाद केंद्रिय विद्यापीठातच या प्रकारच्या ९ घटना समोर आल्या आहेत. एकूण देशाबद्दल बोलायचे झाले तर उच्चतर शिक्षण संस्थांमध्ये जवळपास १८ दलित विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे सर्व दलित विद्यार्थी कामगारवर्गीय किंवा निम्न मध्यमवर्गीय पार्श्वभूमीतून येणारे होते, हा फक्त योगायोग आहे का? सुमारे १२ वर्षांपूर्वी आम्ही हिंदी पत्रिका 'आव्हान'च्या पानांवर हिंदू कॉलेज, दिल्ली विद्यापीठातील एका दलित विद्यार्थ्याच्या आत्महत्येबद्दल लिहिले होते. कशा प्रकारे त्याचे हिंदू माध्यमातून शिकून येणे, इंग्रजीचे कमी ज्ञान यामुळे त्याला शिक्षकांकडून सतत प्रताडित व्हावे लागत होते, व शेवटी कंटाळून त्याने आत्महत्या केली. तो विद्यार्थीसुद्धा एका गरीब निम्न मध्यमवर्गीय कुटुंबातील होता. काही अपवाद सोडले तर विद्यापीठ परिसरात जातीय भेदभाव आणि दलित उत्पीडनाचे बळी नेहमी गरीब आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबातून येणारे विद्यार्थीच ठरत असतात. जातिसूचक शब्दांनी अपमानित केले जाणे, वेगवेगळ्या सूक्ष्म आणि तरल जातीयवादी व्यंगांद्वारे आणि विनोदांद्वारे निशाणा बनविले जाण्याचे दुःख तुलनेने बऱ्या आर्थिक पार्श्वभूमीतून येणाऱ्या दलित विद्यार्थ्यांनासुद्धा भोगावे लागते, परंतु इंग्रजी माध्यमातून शिक्षण झाल्यामुळे, राहणीमान आणि पोशाख आणि त्याचबरोबर एक समान शैक्षणिक पार्श्वभूमी असल्यामुळे उच्च मध्यम वर्गातून येणाऱ्या दलित विद्यार्थ्यांना जातीय भेदभावाच्या सर्वात नग्न प्रकारांना, व प्रामुख्याने दलित उत्पीडनाला कमी तोंड द्यावे लागते. नेमके हेच दलित उत्पीडनाच्या त्या घटनांना सुद्धा लागू होते, ज्या विद्यापीठ परिसराच्या बाहेर घडतात. शहरांमध्ये सफाई कामगारांसोबत सतत होणारे उत्पीडनाचे प्रकार असोत, किंवा गावांमध्ये दलित शेजमजुरांसोबत होणार्या पाशवी आणि हिंस्र उत्पीडनाच्या घटना असोत, कष्टकरी वर्गातून येणारे दलितच प्रामुख्याने निशाण्यावर असतात. एकीकडे नोकरशाही आणि शिक्षणामध्ये आपले स्थान निर्माण केलेल्या दलितांनासुद्धा अपमान झेलावा लागतो आणि सवर्ण आणि ब्राह्मण्यवादी मानसिकता बाळगणाऱ्या सहकाऱ्यांना दलितांना बरोबरीचा दर्जा देणे जड जाते, पण त्याचबरोबर हेसुद्धा खरे आहे की सुखवस्तू दलितांची स्थिती कष्टकरी कुटुंबातून येणार्या दलितांहून वेगळी झाली आहे. त्यांच्यासोबत होणाऱ्या भेदभावाचासुद्धा कोणीही न्यायप्रिय व्यक्ती विरोधच करणार, परंतु प्रामुख्याने नोकरशाही आणि सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये असणार्या दलित संघटना, मुख्यत्वे बामसेफ आदी संघटनांचा कष्टकरी आणि गरीब दलितांशी काही संबंध राहिला आहे का? त्यांचे मुख्य दुखणे आता फक्त हेच आहे की नोकरशहा किंवा शिक्षक बनल्यानंतरसुद्धा सूक्ष्म रूपांमध्ये आणि कधीकधी स्थूल रूपांतसुद्धा त्यांना जातिगत अपमानाला तोंड द्यावे लागते आहे. परंतु या जातिगत अपमानाच्या विरोधात आणि ब्राह्मण्यवादाच्या पाशवी रूपांच्या विरोधात ते आता रस्त्यांवर उतरडून लढायलासुद्धा तयार नाहीत. ते सत्तेशीसुद्धा तेवढेच इमानदार आहेत आणि राजसत्तेचे तंत्र आणि उपकरणांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या ब्राह्मण्यवाद आणि सवर्णवाद समाप्त होण्याचे स्वप्न ते पाहत आहेत, पण हे स्वप्न कधी पूर्ण होऊ शकत नाही. याच्या कारणांवर आम्ही नंतर येऊ.

थोडक्यात, जर थेट आकडे घेऊन बोलायचे म्हटले तर एवढे तरी निश्चितच म्हणता येते की विद्यापिठांमध्ये किंवा बाहेर, शहरांमध्ये किंवा गावांमध्ये, शेतांमध्ये किंवा कारखान्यांमध्ये अपवाद वगळल्यास गरीब आणि कष्टकरी दलितांनाच जातिगत उत्पीडन आणि अपमानाच्या पाशवी रूपांचे बळी ठरावे लागते आहे. **त्याचबरोबर, हेसुद्धा लक्षात घ्यावे लागेल की तथाकथित बहुजन समाजाचे अंग असणाऱ्या मागास जाती आणि नवधनाढ्य दांडगटच सामान्यपणे उत्पीडन करणाऱ्यांच्या भूमिकेत असतात.** ज्या वेगवेगळ्या मागास आणि मध्य जाती सुदूर भूतकाळात ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या उत्पीडनाचे आणि दमनाचे बळी ठरल्या होत्या. त्यांच्यापैकी कित्येक उत्पादन आणि राजकीय आर्थिक संबंध बदलताच श्रीमंत कुलक आणि शेतकरी जातींमध्ये रूपांतरित झाल्या आहेत. (तरीही बहुतेक मध्य जातींचा एक बर्यापैकी हिस्सा कामगार आणि निम्न मध्य वर्गात सामील आहे), त्यांच्यापैकी कित्येकांच्या आर्थिक आणि राजकीय शक्तीमध्ये जबरदस्त वाढ झालेली आहे. त्याचबरोबर त्यांच्या सामाजिक आणि कर्मकांडीय स्थितीतही परिवर्तन झाले आहे. आज दलितांचे उत्पीडन करणाऱ्या प्रमुख शक्ती याच जातींमध्ये निर्माण झालेला नवधनाढ्य कुलक आणि श्रीमंत शेतकरी वर्गातच आहेत. मग ते पंजाबमधील जट्ट शेतकरी असतील, हरयाणा, उत्तर प्रदेश किंवा राजस्थानमधील जाट असतील, दक्षिण भारतातील रेड्डी व कम्मा असतील, किंवा श्रीमंत शेतकऱ्यांमध्ये रूपांतरित झालेले यादव किंवा भूमिहार असतील. हे सर्व आजसुद्धा मध्यम किंवा मागास जातींमध्ये येतात, किंवा त्यांचा भूतकाळ मध्यम जातींचा भूतकाळ आहे. **अशा वेळी, बहुजन समाजाच्या काल्पनिक एकजुटीचे अस्मितावादी तर्काद्वारे आपण दलित उत्पीडनाचा सामना करू शकत नाही, हे स्पष्टच आहे.**

कोणत्या ना कोणत्या रूपामध्ये दलित उत्पीडन आणि जातिगत अपमानाचा सामना करावा लागत असला तरी दलित उत्पीडन आणि जातिगत अपमानाच्या विरोधात दलित जनतेचा तो हिस्सा लढणार नाही ज्याला लुटीच्या वाटपात आणि राजकीय सत्तेमध्ये एक हिस्सा मिळालेला आहे, हे उघडच आहे. तो जातिगत अपमानाच्या वैविध्यपूर्ण सूक्ष्म रूपांचा बळी असूनसुद्धा फक्त कण्हत राहतो. तो कधीच भगाणा, गोहाणा, मिर्चपूर, लक्ष्मणपूर बाथे, बथानी टोलाच्या विरोधात लढाऊ संघर्षात सहभागी होत नाही, रस्त्यावर उतरत नाही. आम्ही अपवादांची नाही तर दलितांमध्ये पैदा झालेल्या त्या उच्च आणि मध्यम वर्गाबद्दल बोलत आहोत, ज्याला आज भांडवली सत्ता व्यवस्थेने सहयोजित केले आहे, कारण अपवाद नियम सिद्ध करीत नाहीत. आतापर्यंतचा अनुभव हीच बाब सिद्ध करीत नाही का? **म्हणूनच ज्या एकजूटीद्वारे आज दलित उत्पीडनाचा सामना केला जाऊ शकतो, ज्या एकजुटीद्वारे आज आपण ब्राह्मण्यवादी पुरुषसत्ताक भांडवली राज्यसत्तेसमोर आव्हान उभे करू शकतो ती बहुजन समाजाची काल्पनिक एकता नाही तर वर्ग एकजूट आहे.** कष्टकरी वर्गाचे जातींमध्ये असलेले विभाजन हा या एकजुटीतील सगळ्यात प्रमुख अडथळा आहे, हे खरे आहे. परंतु हे विभाजन कष्टकरी वर्गांना उपदेश देऊन किंवा ब्राह्मण्यवादावर प्रवचन देऊन दूर केले जाऊ शकत नाही. हे जातिगत विभाजन दूर करण्यासाठी कष्टकरी वर्गांमध्ये झुंजार सामाजिक आणि सास्कृतिक चळवळ उभारण्याबरोबरच, या संघर्षांच्या दरम्यान या जातिय विभाजनांवर सतत प्रहार करीत राहणे गरजेचे आहे. याशिवाय, आज जातीच्या उन्मूलनाचा आणखी कोणताच मार्ग असू शकत नाही.

**जे लोक भांडवली राज्यसत्तेच्या विरोधात सोशल इंजिनिअरिंगची समीकरणे मांडत असतात, (उदाहरणार्थ, काही लोक दलित मागास मुसलमान ख्रिश्चन सिख विरुद्ध सवर्ण हिंदू यांसारखी मजेदार समीकरणे मांडत असतात) ते कित्येक गोष्टी समजू शकत नाहीत.** सर्वप्रथम तर ते हे समजू शकत नाहीत की आज मागास जातींमध्ये पैदा झालेल्या श्रीमंत शेतकरी आणि कुलक वर्गाची दलितांसोबत कोणतीही एकता निर्माण होऊ शकत नाही कारण त्यांचे आर्थिक हित दलित कामगारांच्या जबरदस्त शोषणावर आधारित असते, जातिगत विभाजन दलित कामगारांच्या शोषणाला अति-शोषण, आर्थिकेतर शोषण आणि उत्पीडनकारी शोषणामध्ये बदलण्यात त्यांची मदत करीत असते आणि त्यांचे वरकड विनियोजन वाढवीत असते. अशा वेळी जाट, रेड्डी, कम्मा आणि श्रीमंत यादव शेतकरी आदी कोणत्याही परिस्थितीत दलित उत्पीडनाच्या विरोधात किंवा जातिगत विभाजनाच्या विरोधात उभे राहू शकत नाहीत. उलट आज तेच दलितांवर सर्वाधिक पाशवी हिंसा करणारे लोक आहेत. त्याचबरोबर, अशी समीकरणे देणारे हेसुद्धा समजू शकत नाहीत की मागास जातीच नाहीत तर तथाकथित उच्च जातीसुद्धा आज वर्गांमध्ये विभाजित झालेल्या आहेत आणि त्यांच्यामध्ये एक मोठा कामगार वर्ग निर्माण झालेला आहे. फक्त शेतमजुरांबद्दल बोलायचे झाले तर ५३ टक्के शतमजूर आज गैरदलित किंवा गैर आदिवासी आहे. शहरी सर्वहारामध्ये तर हा हिस्सा आणखीनच मोठा आहे. दलित जनतेचा सुमारे ९० टक्के हिस्सा आजसुद्धा शहरी किंवा ग्रामीण सर्वहारामध्ये येतो, हे खरे आहे. परंतु हेसुद्धा खरे आहे की भारताच्या एकूण कामगार वर्गामध्ये दलित आणि आदिवासींची टक्केवारी फार फार तर २५ ते ३० टक्केच आहे. **अशा वेळी, जेव्हा ब्राह्मण्यवादी पितृसत्ताक भांडवली सत्तेवर प्रहार करण्यासाठी वर्गीय एकतेची गरज आहे तेव्हा हेसुद्धा आवश्यक आहे की ही वर्गीय एकता निर्माण करण्यासाठी संघर्षांद्वारे एकता स्थापित केली जावी आणि झुंजार सास्कृतिक सामाजिक आंदोलनही उभारले जावे.** रोहित वेमुलाच्या आत्महत्येच्या शोकांतिकेचे हे तीन निर्देशांक समजूनच आपण आज विशेषत्वाने सांप्रदायिक फासीवादी आणि ब्राह्मण्यवादी मोदी सरकारच्या विरोधात एक प्रभावी रणनीती बनवू शकतो.

## आर्थिक शोषण विरुद्ध सामाजिक उत्पीडनाचा प्रश्न

रोहित वेमुला याच्या संस्थात्मक हत्येनंतर वेगवेगळ्या प्रगतिशील बुद्धिजीवी आणि गटांनी आपल्या पत्रपत्रिकांमधून, ब्लागवर जे विचार मांडले त्यांतून सामान्यपणे जो विषय पुढे आलेला आहे, त्यावर एक समीक्षात्मक टिप्पणीची गरज आहे, असे आम्हांला वाटते. आम्ही अगोदर इंगित केल्याप्रमाणे कित्येक क्रांतिकारी डाव्या संघटनासुद्धा तडजोडीची आणि आंबेडकरवादासोबत जुळवून घेण्याची कार्यदिशा सादर करताना दिसत आहेत. हा शुद्ध संधीसाधूपणा आहे. **रोहितचा मृत्यू आणि त्याचा आंबेडकरवादी राजकारणाकडे असलेला कल पाहून जणू क्रांतिकारी डावे कोणत्यातरी ओझ्याखाली दबले जात आहेत, जणू आता तरी आंबेडकरवादासोबत तडजोड करावीच लागेल, असा काहीतरी विचार त्यांच्या डोक्यात घुसला आहे. त्यामुळे वेगवेगळ्या डाव्या संघटनासुद्धा जय भीम चा नारा देत आहेत. जय भीम किंवा लाल सलाम हे केवळ राजकीय नाहीत, तर विचारधारात्मक नारे आहेत, व ना क्रांतिकारी डाव्यांनी आंबेडकरवाद्यांकडून त्यांनी लाल सलामचा नारा देण्याची अपेक्षा ठेवली पाहिजे, ना आंबेडकरवाद्यांनी कम्युनिस्ट जय भीमचा नारा देत नाहीत म्हणून नाराज झाले पाहिजे.**

जय भीम कामरेडछाप नारे त्यांनी दिले पाहिजेत ज्यांना खरोखरच असे वाटते आहे (अज्ञानातून किंवा मग एखाद्या बौद्धिक द्राविडी प्राणायामाच्या आधारे) की विचारधारा आणि विश्व दृष्टिकोनाच्या स्तरावर मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांच्यामध्ये काही ताळमेळ असू शकतो. परंतु अनेकदा क्रांतिकारी डावे जय भीमचा नारा एक तर भूतकाळातील पाप धुवून काढण्यासाठी (की आम्ही जात समजू शकलो नाही, आम्ही आंबेडकरांविषयी योग्य दृष्टिकोन बाळगला नाही, वगैरे) आणि एका अवैज्ञानिक, अतार्किक अपराधबोधातून देत असतात, किंवा एका प्रकारच्या श्रेष्ठताबोधातून देत

पान ६ वर

# जातिउन्मूलनाची ऐतिहासिक परियोजना पुढे नेण्यासाठी अनिवार्य उत्तरे

**पान ५ वरून**

असतात (म्हणजे, आम्हांला ठाऊक आहे की आंबेडकरांची विचारधारा आणि राजकारण योग्य नाही, मात्र तरीही आम्ही हा नारा देतो आहोत, कारण या लोकांना इतकी शतके दडपण्यात आले आहे, सारखे तर्क) . काही डावे असे आहेत जे आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यांच्यामध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारचा ताळमेळ विचारधारात्मक स्तरावर स्थापित करू इच्छितात. हे दोन विश्वदृष्टिकोन, या दोन पद्धती आणि दोन विचारसरणींमध्ये कोणताही सेतू बनवणे वैज्ञानिकदृष्ट्या शक्य नाही, म्हणून शेवटी असे प्रयत्न भयंकर प्रकारच्या गंमतीशीर विरोधाभासांच्या गर्तेत जाऊन पडतात. उदाहरणार्थ आनंद तेलतुंबडे, सुभाष गाताडे, आणि समाजवाद की नई पहल सारखे मंच. जर व्यक्तीने दोन स्टुलांवर एकाच वेळी बसण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच तो मधोमध पडणार.

असेच काही प्रयत्न रोहित वेमुलाच्या संस्थात्मक हत्येनंतर केले जात आहेत. यांपैकी सर्वांत मुख्य प्रयत्नांमध्ये एक भूमिका समान आहे – भारतात आर्थिक शोषणाच्या विरोधात लढण्यासाठी मार्क्सवाद गरजेचा आहे आणि सामाजिक उत्पीडनाच्या विरोधात आंबेडकर, स्त्रीवादाची गरज आहे. या भूमिकेपेक्षा जास्त विनोदी भूमिका दुसरी असू शकत नाही. असे तर्क देणारे मार्क्सवादी संसदीय डाव्यांपासून गैर संसदीय डाव्यांपर्यंत पसरलेले आहेत. क्रांतिकारी डाव्यांवरही या भूमिकेचा प्रभाव असल्यामुळे आम्ही थोडक्यात या बाबतीत काही मुद्दे मांडू इच्छितो.

**आर्थिक शोषणावर उपाय काढण्यासाठी एका वेगळ्या विचारधारेची गरज आहे, आणि सामाजिक उत्पीडनाच्या विरोधात वेगळ्या विचारधारेची गर आहे, असे जे समजतात, त्यांच्याबद्दल खेदाने म्हणावेसे वाटते की ना ते आर्थिक शोषण समजू शकले आहेत, ना सामाजिक उत्पीडन समजू शकले आहेत.** भारतात आणि त्याचबरोबर जगभरात या दोन्ही परिघटना नेहमीच एकमेकांमध्ये मिसळून गेलेल्या असतात आणि एकाने दुसऱ्याला उत्तेजन मिळत असते. सर्वहारा आणि अन्य कष्टकरी वर्गाचे लोक ज्या भांडवली आर्थिक शोषणाचा बळी ठरत आहेत, त्याला अतिशोषणात बदलण्यात आज जातिगत विभाजन आणि उत्पीडन एक विशेष भूमिका वठवीत आहे. आपण जर कामगार समुदायातील दलित कामगार आणि तथाकथित खालच्या जातींतून येणाऱ्या कामगारांची स्थिती यांचा अभ्यास केला तर ही बाब एकदम स्पष्ट होते. दलित कामगार आणि खालच्या जातींतील कामगार यांची सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अरक्षित स्थिती आर्थिक शोषणाला आर्थिकेतर उत्पीडनासोबत समन्वित करून अतिशोषण शक्य बनवते. अशा प्रकारे जात हा आर्थिक शोषणाला उत्तेजन देऊन अतिशोषणात आणि नफ्याला अतिनफ्यात बदलणारा एक मुख्य कारक बनतो. याशिवाय संसाधनांच्या वाटपात भांडवलशाही स्वभावतः जी असमानता पैदा करते, जातिगत भेदाभेद ती असमानता आणखी जास्त वाढवण्याचे काम करतात आणि वितरणाच्या वेगवेगळ्या विनियामकांपैकी एका विनियामकाचे काम करतात. अशा वेळी जातिगत विभाजन आणि उत्पीडनाला आर्थिक शोषणापासून स्वायत्त समजणे एक भयंकर चूक आहे. असा विचार करणाऱ्या व्यक्तीला ना आर्थिक शोषण कळले आहे ना सामाजिक उत्पीडन. या बाबतीत जातिव्यवस्था आपल्या विशिष्ट रूपासह जगभरातील सामाजिक उत्पीडनाच्या वेगवेगळ्या रूपांशी समांतरता राखून आहे. जगभरात सर्वत्र सामाजिक उत्पीडनाची वेगवेगळी संस्थाबद्ध आणि गैरसंस्थाबद्ध रूपे भांडवली शोषणाला अतिशोषणात बदलण्यात साहाय्यक भूमिका पार पाडीत असतात. परंतु जातिव्यवस्था एका बाबतीत या सामाजिक उत्पीडनाहून वेगळी आहे – ती एका अशा श्रमविभाजनाच्या रूपात सुरू झाली जिला तिच्या उत्पत्तीच्या क्षणी वर्ग विभाजनच म्हटले पाहिजे, परंतु ते श्रम विभाजन धार्मिक आणि कर्मकांडीय रूपांत अश्मीभूत आणि जीवाश्मीकृत झाले. त्यामुळे हे श्रम विभाजन असण्याबरोबरच श्रमिकांचेही विभाजन बनले आणि वर्गाशी तिचे नाते संगतीचे (कारस्पांडन्स) झाले, समानतेचे राहिले नाही. या बाबतीत जातीची तुलना वंश, जातीयता (नेशनल्टी) यांच्याशी होऊ शकत नाही आणि तिचे चारित्र्य त्यांच्यापेक्षा कितीतरी जास्त वर्चस्वकारी ठरते. परंतु आपल्या आधुनिक रूपात सामाजिक उत्पीडनाचे हे रूप वास्तवात भांडवली आर्थिक शोषणास अतिशोषणात बदलण्याचे एक उपकरण बनते आणि या रूपात तेसुद्धा एका प्रकारे वांशिक उत्पीडन किंवा अल्पसंख्याक जातीय प्रवाशांच्या उत्पीडनाचीच भूमिका वठवते.

**ज्या प्रकारे जातिगत सामाजिक उत्पीडन आर्थिक शोषण अत्यधिक बनवण्यात भांडवलदार वर्गाची मदत करते, त्याचप्रकारे आर्थिक शोषणसुद्धा सामाजिक उत्पीडन फक्त वाढवीतच नाही तर आजच्या काळात ते स्पष्टपणे आर्थिक शोषणाचा आधार बनले आहे.** आम्ही वर चर्चा केल्याप्रमाणे, आकडे आणि तथ्यांबद्दल बोलायचे झाले तर कँपस आणि समाजामध्ये जातिगत उत्पीडनाच्या आत्यंतिक

> **आर्थिक शोषणावर उपाय काढण्यासाठी एका वेगळ्या विचारधारेची गरज आहे, आणि सामाजिक उत्पीडनाच्या विरोधात वेगळ्या विचारधारेची गर आहे, असे जे समजतात, त्यांच्याबद्दल खेदाने म्हणावेसे वाटते की ना ते आर्थिक शोषण समजून शकले आहेत, ना सामाजिक उत्पीडन समजू शकले आहेत.**

पाशवी आणि नग्न रूपाचे बळी सामान्यपणे गरीब पार्श्वभूमीतून येणारे दलितच असतात. कँपसमध्ये गेल्या दशकभरात झालेल्या दलित विद्यार्थ्यांच्या आत्महत्या असोत किंवा गाव आणि शहरांमध्ये होणाऱ्या दलित विरोधी उत्पीडनाच्या घटना आणि हत्याकांडे असोत. बहुतेक प्रसंगी निशाण्यावर शहरी आणि ग्रामीण गरीब दलितच असतात. अपवादसुद्धा चुकूनच आढळतात. अशा वेळी, दलित उत्पीडनाचा संबंध कुठे ना कुठे समाजातील कमकुवत आर्थिक स्थितीशी आहे, हे स्पष्ट होत नाही का? फक्त अस्मितावादी राजकारण करणारे आणि त्याचबरोबर या व्यवस्थेचे अंग बनलेले उच्च मध्यम वर्गीय दलितच फक्त हे नाकारू शकतात, कारण त्यांचे एकमेव दुखणे शासक वर्गात सम्मीलीत झाल्यानंतरसुद्धा कर्मकांडीय, सांस्कृतिक, लक्षणात्मक आणि प्रतीकात्मक समानता न मिळणे आणि सूक्ष्म रूपात जातिगत अपमानाची अस्तित्त्व हेच असते. आपण पाहू शकतो त्यानुसार रोहित वेमुलाला न्याय मिळवून देण्याच्या या लढ्यातसुद्धा हा गट रस्त्यावर उतरलेला नाही. इतकेच काय तर तोंडी विरोधसुद्धा तो विरळाच करतो आहे. फार फार तर या घटनेच्या विरोधात सोशल मीडियावर काही फोटो, उद्धरणे आणि पोस्ट टाकण्याचे काम ते करतात. यांच्यामध्ये काही तर असेसुद्धा आहेत जे या तथ्यावर अतिरिक्त जोर देत आहेत की रोहितचा प्रवेश आरक्षण श्रेणीमधून झालेला नव्हता. त्याने फरक काय पडतो? ज्यांचा प्रवेश आरक्षण श्रेणीतून होत असतो ते प्रतिभा आणि क्षमतेच्या बाबतीत कमी असतात का? हे बोलून खरे तर ते आपल्या व्यक्तिगत कुंठेचे निवारण करीत असतात. तो आरक्षण श्रेणीतील विद्यार्थी होता की तथाकथित मेरीटच्या बळावर आलेला होता, याला कोणीही प्रगतिशील व्यक्ती कां म्हणून मुद्दा बनवील? कारण हे तर भांडवली डार्विनवादी सिद्धांचाचे समर्थन करणे ठरेल. आम्ही आरंभापासूनच त्याचा विरोध करीत आलो आहोत आणि तो सिद्धांत समता आणि न्यायाच्या वैज्ञानिक सिद्धांताच्या विरुद्ध जाणारा आहे. अशा लोकांबद्दल जेवढे कमी बोलावे, तेवढेच चांगले.

आम्ही येथे जे काही स्पष्ट करू इच्छितो आहोत, ते आपणास कळलेच असेल. आर्थिक शोषण आणि सामाजिक उत्पीडन या दोन्ही परिघटना भांडवली व्यवस्थेत नेहमीच एकमेकांत अंतर्गुंथित आणि अंतर्व्याप्त असतात. ज्यांच्या डोक्याक भांडवली व्यवस्था आणि बुर्ज्वा लोकशाही यांची आदर्शीकृत चित्रे असतात, अशाच व्यक्ती हे समजू शकत नाहीत. भांडवली व्यवस्थेचे असे आदर्शीकृत रूप ज्याच्यामध्ये आधुनिक राज्यसत्ता, कायदा आणि संविधानाच्या अंतर्गत प्रत्येकाला कायदेशीर आणि औपचारिक स्वातंत्र्य आणि समता प्राप्त होत असते, कामगार जेथे दोन अर्थांनी स्वतंत्र असतो (आपली श्रमशक्ती विकण्यासाठी आणि त्याचबरोबर उत्पादनाच्या साधनांच्या मालकीपासून स्वतंत्र), ज्यामध्ये न्यायपूर्ण स्पर्धा व समान संधी असते, वगैरे. **तसे पाहता अतिशय उन्नत भांडवली देशांमध्येसुद्धा अस्वतंत्र श्रम आणि अस्वातंत्र्याची (अनफ्रीडम्स) वेगवेगळी रूपे अस्तित्त्वात असतात आणि आर्थिक शोषणाबरोबरच आर्थिकेतर उत्पीडनाची परिघटनासुद्धा अस्तित्त्वात असते, परंतु भारतासारख्या उत्तर- वासाहतिक देशांमध्ये या परिघटना अंतर्गुंथित रूपात आणखीच जास्त रेखांकित रूपात हजर असतात. वास्तवात ही प्राक् आधुनिकतेची खूण नाही, तर अशा विचित्र तंतुबद्धीकरणाची (आर्टिक्युलेशन) खूण आहे जिला आपण उत्तर-वासाहतिक (उत्तरवासाहतिक नाही) आधुनिकतेची संज्ञा देऊ शकतो.** तेव्हा, आत्यंतिक उन्नत भांडवली देशातसुद्धा जे अखेरीस मृगजळ ठरले आहे असे भांडवली आधुनिकतेचे वचन आपल्या देशात आदर्श रूपात पूर्ण करण्यासाठी आपण आटापिटा करीत असू, (जसे 'समाजवाद की नयी पहल'सारखे काही डावे समूह आणि बुद्धिजीवींच्या बाबतीत घडते आहे) तर तो एक अनैतिहासिक आणि अवैज्ञानिक आग्रह आहे, असेच म्हणावे लागेल. आदर्श रूपातील बुर्ज्वा आधुनिकता हे एक असे वचन आहे जे कधी नव्हतेच, *अ प्रामिस दट नेव्हर वाज.* बुर्ज्वा आधुनिकतेचे आदर्श आणि वास्तविक रूप यामध्ये फरक आहे, जो मार्क्स आणि एंगल्स यांनी स्पष्टपणे दाखवून दिलेला होता.

**सामाजिक उत्पीडन आणि आर्थिक शोषणाचे अशा प्रकारे भांडवली अंतर्गुंथन आणि सहयोजन असल्याने या दोन्हींचा जैविक संबंध समजून घेणे अनिवार्य आहे आणि त्याचबरोबर हेसुद्धा समजून घेणे आवश्यक आहे की आर्थिक शोषणाची मार्क्सवादाची समीक्षा सामाजिक उत्पीडनाच्या या रूपांना बाजूला काढून करण्यता आलेली नाही. ज्याने कुणी पाठ्यपुस्तके आणि टीकाकारांच्या पुस्तकांऐवजी मार्क्सवाद लेनिनवादाच्या रचना मूळातून अभ्यासलेल्या असतील, त्याला ही बाब चांगलीच माहीत असेल.** मार्क्सवाद आर्थिक शोषणाची समालोचना सामाजिक उत्पीडनाच्या रूपांशी त्याच्या असलेल्या संबंधांना समजून घेतच करतो. आज भारतात अस्तित्त्वात असलेली जातिव्यवस्था समजून घेण्यासाठी मार्क्सवाद अपुरा नाही, उलट अनिवार्य आणि अपरिहार्य आहे. भारतातील मार्क्सवाद्यांनी या दिशेने आजवर जे काम केले आहे ते अपुरे आहे, हा वेगळा मुद्दा आहे. त्यांच्या अपुरेपणाचा मार्क्सवादी विज्ञानाच्या विश्लेषणात्मक क्षमतेशी काही संबंध नाही. उलट, आंबेडकर जाती उन्मूलनाविषयी त्यांची भूमिका सच्ची आणि प्रमाणिक असूनसुद्धा ना जातीची परिघटना ऐतिहासिकदृष्ट्या समजू शकले आणि ड्यूईवादी व्यवहारवाद आणि उदार बुर्ज्वा विचारधारेच्या चौकटीत राहिल्यामुळे ना जातीच्या उन्मूलनाची कोणतीही ऐतिहासिक परियोजना सादर करू शकले. त्यांचा संबंध बुर्ज्वा उदार विचारधारेच्या डाव्या गटाशी (ड्यूईवादी उपकरणवाद आणि प्रगतिवादी प्रयोगवाद तसेच फेबियनवादी विचार) होता परंतु हा डावा गटसुद्धा बुर्ज्वा कल्याणवादाच्या पुढे जाणारा नव्हता. तो दृढ विश्वासासह क्रांतिकारी पद्धतींचा विरोधी होता आणि समाजाच्या विकासाच्या क्रमवादी (ग्रेजुअलिस्ट) सिद्धांतावर विश्वास बाळगत होता आणि राज्यसत्तेला समाजातील सर्वाधिक तार्किक अभिकर्ता मानीत होता. त्यामुळे, आंबेडकरांची विचारधारात्मक भूमिका, म्हणजेच ड्यूईवादी व्यवहारवादच त्यांना कधीच राजकीयदृष्ट्या सुधारवादाच्या पुढे जाण्याची परवानगी देत नव्हती. त्यामुळेच दलितांच्या उत्थानासाठी सुधारवादाच्या चौकटीत ज्या गोष्टी होऊ शकत होत्या, त्या त्यांनी केल्या व हे त्यांचे मोठे योगदान आहे. त्याचबरोबर जातिउन्मूलनाचा प्रश्न सर्वप्रथम राष्ट्रीय राजकीय अजेंड्यावर वांछनीय महत्त्वासह मांडण्यात आणि त्याचबरोबर दलितांमध्ये आत्मप्रतिष्ठा आणि आत्मसन्मानाची भावना निर्माण करण्यातही त्यांची मोठी भूमिका होती. परंतु हे समजून घेतले पाहिजे की सुधारवादाच्या चौकटीत जे मिळू शकत होते, ते मिळवून झाले आहे आणि आता त्याच्या पुढे न जाऊ शकल्यामुळे जातिउन्मूलनाच्या परियोजनेला काही दशकांचे मोठे नुकसान झेलावे लागले आहे. **हे एक असे वास्तव आहे ज्याच्याकडे कानाडोळा करून आंबेडकरांच्या राजकीय वारशाशीसुद्धा कोणत्याही प्रकारचे योग्य नाते जोडणे अशक्य आहे. एक तर तुम्ही त्यांना नाकारण्याच्या दिशेने जाल, किंवा त्यांच्या अंधपूजेच्या दिशेने.** सामाजिक उत्पीडनाची आज आर्थिक शोषणाशी अशी काही नाळ जोडलेली आहे की त्याचे समूळ उच्चाटन भांडवली व्यवस्थेच्या चौकटीत राहून करता येणे अशक्य आहे. वास्तवात, जातिव्यवस्थेत ऐतिहासिकदृष्ट्या प्रत्येक नव्या शोषण आधारित व्यवस्थेसह सहयोजित आणि समायोजित होण्याची अद्भुत वर्चस्वकारी क्षमता आहे. आणि म्हणूनच भारतीय इतिहासात वेगवेगळ्या भांडवलशाहीपूर्व उत्पादन पद्धती, सामंती उत्पादन पद्धती आणि भांडवली उत्पादन पद्धतीपर्यंतच्या एकूण विकासक्रमात जातिव्यवस्था आणि ब्राह्मण्यवादी विचार आपल्यामध्ये वेगवेगळे बदल करून जिवंत राहिले आहेत. याचे कारण म्हणजे या पदानुक्रम आधारित व्यवस्था आणि विचारधारेच्या रूपात प्रत्येक शासक वर्गाला आपल्या शासनाच्या *लेजिटिमेशन*चे, म्हणजेच औचित्य समर्थनाचे एक शक्तीशाली उपकरण मिळत असते. या मुद्याकडे आपण पुन्हा येऊ. सध्या आम्ही एवढेच स्पष्ट करू इच्छितो की सामाजिकदृष्ट्या जातिव्यवस्थेवर एक प्राणांतिक प्रहार क्रांतीद्वारेच केला जाऊ शकतो, सुधार आणि सवलतींची प्रक्रिया या संदर्भात काही दशकांपूर्वीच आपल्या संतृप्ती बिंदूवर पोहोचलेली आहे. या एकूण क्रांतिकारी रूपांतरणाच्या परियोजनेचा मार्ग मार्क्सवादी विज्ञानाच्या प्रकाशातच दिसू शकतो कारण हे एकच असे विज्ञान आहे जे भांडवली व्यवस्थेच्या कोणत्याही प्रकारच्या समायोजनाबद्दल, खाडाखोड, सुधार किंवा चांगलेपणाबद्दल अवैज्ञानिक आणि अनैतिहासिक गोष्टी बोलत नाही तर एकूण भांडवली व्यवस्थेला वैज्ञानिक आणि व्यावहारिक पर्याय देण्याबद्दल बोलते. आंबेडकरांचे योगदान आणि त्यांच्या सीमा या दोन्ही या परियोजनेस समजून घ्याव्या लागतील. रोहितच्या मृत्यूनंतर जातिउन्मूलनाचा प्रश्न पुन्हा एकदा जोरदारपणे ज्या प्रकारे आपल्या समोर उपस्थित झाला आहे ते पाहता आम्हांला असे वाटते की आर्थिक शोषण आणि सामाजिक शोषणाच्या या अंतर्गुंथनाची योग्य जाणीव आणि या दोन्हींचे उच्चाटन करण्याची एक वैज्ञानिक परियोजना यांच्याद्वारे आपण जातिउन्मूलनाच्या दिशेने पुढे जाऊ शकतो.

### अस्मितावादी राजकारणाचे विरोधाभास

१७ जानेवारीपासून रोहितला न्याय मिळवून देण्यासाठी जो संघर्ष सुरू झाला आहे आणि अजूनही सुरू आहे, त्यातून आणखी काही गोष्टी आपल्यासमोर आल्या आहेत. एक महत्त्वाची बाब म्हणजे या आंदोलनाने पुन्हा एकदा अस्मितावादी

**पान ७ वर**

# जातिउन्मूलनाची ऐतिहासिक परियोजना पुढे नेण्यासाठी अनिवार्य उत्तरे

**पान ६ वरून**

राजकारणाचे विरोधाभास आपल्या समोर उघडे पाडले आहेत. एकीकडे फासीवादी मोदी सरकारमधील मंत्री रोहित हा दलित होता की नव्हता या मुद्द्यावर विवाद निर्माण करीत आहे, आणि दुसरीकडे, ज्याने रोहित आणि त्याच्या सोबत्यांवर मारहाणीचे खोटे आरोप लावले होते त्या भारतीय विद्यार्थी परिषदेच्या त्या सदस्याच्या जातिगत अस्मितेलासुद्धा मुद्दा बनवीत आहेत. तो विद्यार्थी अन्य मागास वर्गाशी संबंधित आहे, हे येथे उल्लेखनीय आहे. तो ओबीसी असल्यामुळेच त्याला रोहितच्या मृत्यूसाठी जबाबदार धरण्यात येत आहे आणि निशाणा बनवण्यात येत आहे, असा दावा मानव संसाधन मंत्री स्मृती इराणी यांनी केला आहे. बर्याचदा आपण बरोबर आहोत की चूक याचा अंदाज शत्रूगट काय करीत आहे, याच्यावरून येत असतो. या घटनाक्रमामध्ये हे स्पष्ट झाले आहे की रोहितला न्याय मिळवून देण्याचा हा लढा जर अस्मितेच्या आधारे चालविला गेला आणि रोहितच्या मृत्यूची कारणे त्याच्या दलित असण्यापुरती मर्यादित करण्यात आली तर नक्कीच संघ परिवार आणि इतर उजव्या शक्तीसुद्धा त्याच्या विरोधात एक अस्मितावादी राजकारणाद्वारे उत्तर देतील. ते ओबीसी अस्मितेच्या आधारे आणखी एक विरोधी एकजूट उभारण्याचा प्रयत्न करतील. खरे तर त्यांनी असे प्रयत्न सुरूसुद्धा केले आहेत. त्याचबरोबर दलित अस्मितेच्या आजुबाजूला एकूण लढाई मर्यादित करणार्या अस्मितावादी शक्ती हेदेखील समजू शकत नाही आहेत की देशभरात रोहितच्या मृत्यूनंतर जो लढा सुरू झाला त्यात फक्त दलित जनतेचाच सहभाग नाही, दलित उत्पीडन हे लढ्याचे एक प्रमुख अंग असले तरीही. वास्तविक, रोहितच्या मृत्यूने विद्यार्थी-युवकांच्या आत धगधगणाऱ्या असंतोषाचा स्फोट होण्यासही एक कारण दिले आहे. त्यामुळे रोहितच्या मृत्यूमुळे आज विद्यार्थी आणि युवक चळवळने कूस बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परंतु सध्याच्या आंदोलनाला अस्मितावादी राजकारणाच्या भोवऱ्यातून सोडवल्यावरच ते शक्य होईल. अस्मितावादी राजकारणला सरळसरळ प्रभुत्त्वशाली अस्मितेच्या राजकारण आणि त्याच्या अवतीभवती लोकांच्या गोळा होण्याच्या प्रक्रियेला इंधन पुरवण्याचे काम करते. एन. सुशील कुमारच्या ओबीसी ओळखीवर फासीवादी मोदी सरकार जोर देते आहे, यावरून हे स्पष्ट दिसून येते आहे.

**याचे कारण म्हणजे अस्मितावादी राजकारणाचे एक मूलभूत संघटक तत्त्व असते अन्यकरणाची (अदरिंग) प्रक्रिया.** या प्रक्रियेशिवाय कोणतेही अस्मितावादी राजकारण उभेच राहू शकत नाही. म्हणूनच जर दलित मुक्तीच्या लढ्याला दलित अस्मितावादापरुते मर्यादित केले गेले तर त्याच्याबरोबर अन्य प्रतिवादी अस्मितावादसुद्धा त्याच प्रमाणात वाढेल. ब्राह्मण, अन्य बलशाली जातीसुद्धा आपल्या अस्मितेवर तसेही जोर देतात आणि त्या आधारे आपली श्रेष्ठता अधोरेखित करण्याचा प्रयत्न करतात, असे काही जण आमच्या तर्काबद्दल म्हणतील. परंतु याचे कारण हे आहे की सवर्ण जातींमध्ये अस्तित्त्वात असलेल्या शासक वर्गाच्या राजकारणाचे चारित्र्यच व्यवस्थाधर्मी आणि प्रतिक्रियावादी असते. त्याचे उत्तर आपण एखाद्या डोक्यावर उभ्या असलेल्या अस्मितावादातून देऊ शकत नाही कारण आपल्या राजकारणाचे चारित्र्य, दलित मुक्ती आणि सामान्यपणे जातिउन्मूलनाच्या राजकारणाचे चारित्र्य प्रतिक्रियावादी आणि व्यवस्थाधर्मी नाही तर प्रगतिशील आहे. सवर्णीय श्रेष्ठतावादी अस्मितावादी आणि प्रतिक्रियावादी राजकारणाचे उत्तर आपण प्रतिक्रियात्मक पातळीवर, म्हणजेच एका वेगळ्या प्रकारच्या अस्मितावादातून, दलित जातींच्या अस्मितावादातून देऊ शकत नाही. **तसे केले तर जातिउन्मूलनाची एकूण परियोजनाच अस्मितावादाच्या भोवऱ्यात अशी काही गटांगळ्या खाऊ लागेल की तिला वाचविणे कठीण होऊन जाईल. आजवर या अस्मितावादामुळे आपल्याला भयंकर नुकसान झेलावे लागले नाही आहे का? याचे उत्तर आपण वर्ग आधारित जातिउन्मूलनाचे राजकारण आणि आंदोलनाद्वारेच देऊ शकतो.**

एखाद्या दमित समुदायास त्याच्या अस्तित्त्वाबाबत, त्याच्या दमनाविषयी आणि प्रतिरोधाच्या आवश्यकतेविषयी जागृत करण्याच्या प्रक्रियेत अस्मिता स्थापित करण्याची एक राजकीय भूमिका असते. परंतु हे अस्मिता स्थापन अस्मितावादहून वेगळे असते आणि आज जातिउन्मूलन त्या टप्प्याच्या बरेच पुढे आले आहे व येथे अस्मिता स्थापनेची कोणतीही ऐतिहासिक प्रासंगिकता राहिलेली नाही. अस्मिता स्थापित करण्याचा हा टप्पा त्या दमित समुदायांसाठी (जाति,जेंडर किंवा राष्ट्रीयता) विशेषत्वाने आवश्यक असतो ज्यांनी दमनकर्त्या वर्गाने लादलेल्या हीनतेच्या विचाराचा एका मर्यादेपर्यंत स्वीकार आणि अंतर्यीकरण (इण्टर्नलाइजेशन) केलेले असते. त्याच्यासाठी अस्मिता स्थापित करण्याचे एक विशेष महत्त्व असते कारण त्याशिवाय ते आपल्या सामूहिक दमनाविषयी आणि उत्पीडनाविषयी जागृत होऊ शकत नाहीत. भारतात दलितांची अस्मिता स्थापित करण्याच्या आरंभीच्या कार्यात फुले, पेरियार, आंबेडकर आणि त्याचबरोबर क्रांतिकारी डाव्यांचेही योगदान होते. अस्मितेला या रूपात स्थापित करण्याचा संबंध मूलतः आत्मसन्मान आणि आपली मूळ मानवीय ओळख स्थापित करण्याशी असतो, प्रभुत्त्वशाली समुदायाने दमित समुदायावर लादलेल्या अमानवीकरणापासून स्वतःला वेगळे करण्याशी असतो. या कार्यवाहीशी अस्मितावादाची गल्लत करून चालणार नाही. परंतु याच्या पुढे जाऊन जेव्हा एखाद्या दमित समुदायाच्या अस्मितेला बहिष्करणवादी बनविले जाते, तिला त्याच्या एकूण सामाजिक राजकीय आणि आर्थिक चेतनेचा आधार बनविले जाते आणि त्याची एकूण सामाजिक चेतना अन्य सर्व लोकांशी त्याच्या वेगळेपणापुरती मर्यादित आणि अपचयित केली जाते, तेव्हा तीच गोष्ट अस्मितावादी राजकारणात रूपांतरित होते. **आणि हे अस्मितावादी राजकारण आजवर कोणत्याही दमित समुदायाच्या मुक्तीचा मार्ग ना बनू शकले आहे, ना कधी बनू शकेल कारण या राजकारणाचा मूळ तर्क कधीच सबवर्सिव नसतो, त्याच्या घोषणा कितीही गरमागरम असल्या तरी. हे राजकारण कधीच सुधारवाद आणि सवलती मागण्याच्या पुढे जाऊ शकत नाही.**

याच कारणामुळे रोहित वेमुलाला न्याय मिळवून देण्यासाठीचा लढा कधीच अस्मितावादी राजकारणाच्या माध्यमातून पुढे सरकू शकत नाही. हे याआधीसुद्धा कित्येक वेळा सिद्ध झाले आहे आणि रोहितच्या मृत्यूनंतर सुरू असलेल्या आंदोलनातही वारंवार सिद्ध होते आहे. प्रत्येक इमानदार व्यक्ती, मग ती कोणत्यीही राजकीय प्रवाहाशी जोडलेली असो, आपल्या काळजावर हात ठेवून हा प्रश्न स्वतःला विचारू शकते, आणि तिला एकच उत्तर मिळेल – अस्मितावादी राजकारणाच्या चिखलातून बाहेर पडल्यानंतरच जातिउन्मूलनासाठीचा ऐतिहासिक संघर्ष अग्रेसर होऊ शकतो.

•

आम्ही अगोदर म्हटल्याप्रमाणे जातिउन्मूलनाची परियोजना पुढे नेण्यासाठी एका वर्गाधारित जाति-विरोधी चळवळीची आवश्यकता आहे. आज जातिगत विभेद, उत्पीडन आणि अपमानाच्या विरोधात तेच लढतील जे त्यामुळे सर्वाधिक पीडित आहेत. दलितांमध्ये शासक वर्गाने जे आपले मित्र निर्माण केले आहेत, त्यांच्यापैकी काही व्यक्ती अपवादाने या मोहीमेत सामील होतील. परंतु दलितांमध्ये निर्माण झालेले शासक वर्गाचे मित्र - उच्च वर्ग आणि मध्यम वर्ग - या मोहीमेत एका वर्गाच्या रूपात फक्त दलित ओळखीच्या आधारे सामील होणार नाहीत. त्यांना सत्ता आणि संसाधनांमध्ये वाटा मिळालेला आहे, त्यांचे प्रतिनिधित्व करणारे राजकीय पक्ष आणि नेते उभे झाले आहेत, त्यांची हिते या व्यवस्थेशी जोडलेली आहेत. **ते सत्तेच्या राजरस्त्यावर होणाऱ्या सूक्ष्म जातिगत अपमानावर कण्हत कुंथत राहूनसुद्धा याच शासकवर्गाची पालखी वाहत राहतील. रामविलास पासवान यांनी हल्लीच म्हटले आहे, त्यांना इच्छा नसतानाही भाजपच्या इशाऱ्यांवर नाचावे लागते आहे. सत्तालोलूप, भ्रष्ट, विलासी, बेईमान, पतित आणि संधीसाधू असण्यापलीकडे रामविलास पासवान यांचा दुसरा काय नाईलाज आहे, हा खरा प्रश्न आहे. त्याच प्रकारे उदित राज नरम आवाजत रोहितच्या मृत्यूसाठी भाजप नेत्यांना वर्तमानपत्रांच्या रकान्यांतून बोल लावत आहेत, मात्र या प्रश्नावर भाजपाच्या कुशीतून बाहेर पडण्याचा त्यांचा कोणताही विचार नाही. हैदराबाद विद्यापीठात रोहितला न्याय मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या विद्यार्थ्यांनी ज्यांना हुसकावून लावले होते त्या रामदास आठवले यांचीसुद्धा तीच गत आहेत. हे नेते असेच निर्माण झालेले नाहीत. दलितांमध्ये जो एक अत्यंत लहान अभिजन गट तयार झाला आहे, त्यांचे प्रतिनिधित्व हे नेते करीत आहेत आणि त्यांनी स्वतःला दलितांचे तारणहार म्हणून कितीही सादर केले तरी आता त्यांची बांधीलकी सत्ता आणि संसाधनांमध्ये आपला वाटा वाढवण्याशीच आहे, आणखी कशाशीही नाही.**

कोणत्याही दमित ओळखीच्या किंवा समुदायाच्या बाबतीत ही गोष्ट खरी आहे की त्या समुदायाचे सर्वच सदस्य कधीच त्या दमनाच्या विरोधात लढत नाहीत. त्यांची व्यापक बहुसंख्या म्हणजेच गरीब कष्टकरी जनताच दमन आणि उत्पीडनाच्या विरोधात लढते. कारण दमन आणि वर्चस्व अधिक बळकट बनवण्यासाठी शासक वर्ग नेहमीच सर्वांत दमित समुदायांच्या एका हिश्शाला सहयोजित करीत असतो. मार्क्स यांनी भांडवलच्या तिसऱ्या खंडात म्हटल्याप्रमाणे, **शासक वर्ग शासित वर्गातील तीव्रतम मेंदूंना आपल्यात सामील करून घेण्यात ज्या मर्यादेपर्यंत यशस्वी होतो, तेवढेच त्याचे शासन जास्त स्थिर आणि खतरनाक बनते.** अगदी याच प्रकारे दमित राष्ट्रीयता, स्त्रिया आणि आदिवाश्यांमधून शासक वर्गाने एका हिश्शाला सहयोजित केले आहे, त्याला कुलीन बनवले आहे आणि त्याला सत्ता आणि संसाधनांमध्ये एक वाटासुद्धा दिलेला आहे. अस्मितावादी राजकारण कधीच सबवर्सिव होऊ शकत नाही, त्याचे हेदेखील आणखी एक कारण आहे. म्हणूनच प्रत्येक दमित समुदायामध्ये त्या विशिष्ट दमनाच्या रूपाचा सामना एका वर्गाधारित चळवळीद्वारेच केला जाऊ शकतो. त्याच प्रकारे, जातिउन्मूलनाची परियोजना वर्ग संघर्षाचे एक अविभाज्य अंग आहे. ही त्याच्यापासून वेगळी किंवा पूर्णपणे स्वायत्त नाही, ना ती त्याच्याशी संकलित (एग्रीगेटिव्ह) पद्धतीने जोडलेली आहे. वास्तविक, हे तिचे एक जैविक अंग आहे. **या रूपात आम्ही असे म्हणतो की झुंजार जातिविरोधी सामाजिक सांस्कृतिक चळवळीशिवाय क्रांती शक्य नाही आणि क्रांतीशिवाय जातीचे निर्णायक उन्मूलन शक्य नाही. क्रांती होताच आपोआप जातीचे उन्मूलन होईल, असा याचा अर्थ नाही हे वेगळे सांगण्याची गरज नाही. परंतु एवढे मात्र निश्चित आहे की जातिव्यवस्थेला खतपाणी देणाऱ्या सामाजिक आर्थिक व्यवस्थेला क्रांतीबरोबर इतिहासाच्या कचराकुंडीत पोहोचविता येईल.**

•

# ओळखा, कोण खरा देशभक्त आहे आणि कोण देशद्रोही?

**पान १६ वरून**

स्थापना झाल्यापासून १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आरएसएस काय करीत होती, हे आरएसएसचा कुणीही माणूस सांगू शकेल काय? राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रद्रोहाचे प्रमाणपत्र वाटणाऱ्यांनी पसरवलेल्या उन्मादाच्या पलीकडे जाऊन विचार करा. जर आज निरपराध पत्रकार, नागरिक, कामगार, विद्यार्थी, शिक्षक कोर्टापासून गल्लीबोळापर्यंत सर्वत्र या कट्टरतावाद्यांचा निशाणा ठरत आहेत. उद्या तुम्ही या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न केलात, तर तुम्हीसुद्धा त्यांचे बळी ठरणार नाही का?

**विचार करण्यासारखी तिसरी गोष्ट ही की देश म्हणजे काही कागदावर बनवलेला नकाशा नसतो. देश हा त्यात राहणाऱ्या सामान्य कष्टकरी जनतेचा बनलेला असतो. आज मोदी सरकार आणि संघ परिवार जी महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, शोषण आणि उत्पीडन देशातील कोट्यावधी कष्टकरी सामान्य लोकांवर, विद्यार्थ्यांवर, तरुणांवर, दलितांवर, स्त्रियांवर आणि वृद्धांवर लादत आहेत, तीच या सरकारची देशभक्ती आहे का? आणि या शोषण-उत्पीडनाच्या विरोधात जो आवाज उठवील, तो देशद्रोही आहे का?** सध्या परिस्थिती अशीच आहे. जो कुणी सरकारच्या विरोधात आवाज उठवील, तो देशद्रोही आणि जो कुणी सरकारच्या प्रत्येक निर्णयावर नंदीबैलासारखा हो ला हो म्हणेल, तो देशभक्त. म्हणूनच तर सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाने सरकारच्या प्रत्येक निर्णयावर मान डोलावण्यास नकार देणाऱ्या देशद्रोह्यांना वठणीवर आणण्यासाठी तऱ्हेतऱ्हेच्या गुंडांच्या टोळक्यांना रस्त्यावर मोकळे सोडले आहे. आणि त्यानंतर तुमचा प्रत्येक आवाज भारत माता की जय, वंदे मातरम् च्या कल्लोळात आणि लाथाबुक्क्यांच्या वर्षावात दाबून टाकला जात आहे. आणि हे तेच लोक आहेत जे त्यांच्या संघटनेतील एकासुद्धा अशा व्यक्तीचे नाव सांगू शकत नाहीत जी देशासाठी लढली आहे, जिने देशासाठी हौतात्म्य पत्करले आहे. हे कसले राष्ट्रभक्तीचा पुरावा देणार? तुम्ही अशा लोकांना राष्ट्रप्रेमाचे ठेकेदार होऊ द्याल का? ह्या गुंडांच्या गर्दीत कोण कोण सहभागी आहेत?

**आज आपण हिटलरच्या अनुयायांचे खरे रूप ओळखले नाही आणि त्यांच्या विरोधात आवाज उठवला नाही, तर उद्या फार उशीर झालेला असेल. देशातील महागाई, बेरोजगारी आणि गरिबीची भीषण परिस्थिती पाहता, तोंडात चांदीचा चमचा घेऊन जन्माला न आलेल्या आपल्यापैकी प्रत्येकालाच आज ना उद्या आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा लागेल. अशा वेळी प्रत्येकालाच हे सरकार आणि त्याच्या संरक्षणाखाली काम करणाऱ्या गुंडांच्या टोळ्या देशद्रोही ठरवतील. विचार करावाच लागेल, आवाज उठवावाच लागेल. नाहीतर, फार उशीर झालेला असेल.**

•

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

गेल्या काही वर्षांपासून चालू असलेल्या खोल आर्थिक मंदीमुळे एकीकडे लाखो लोकांना आपला रोजगार गमवावा लागत असताना बहुतेक देशांमध्ये एक तर फासीवादी पक्ष सत्तेत आले आहेत किंवा बळकट तरी झाले आहेत. (जसे आपल्या देशात फासीवादी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निवडणुकांमध्ये प्रतिनिधित्व करणारा भाजप) असे पक्ष सत्तेत येताच कामगारांच्या अधिकारांवर जोरदार हल्ला चढवतात आणि कॉर्पोरेट घराण्यांचा नफा वेगाने वाढविणारी धोरणे बनवतात. जर्मनीत हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनी यांना आपण इतिहासातील फासीवादाचे जनक म्हणून ओळखतो. त्यांनी लाखो-कोट्यावधी निर्दोष माणसांची कत्तल केली आणि आजसुद्धा तमाम फासीवादी त्यांना आपले गुरू मानतात. अशा परिस्थितीत, आर्थिक अरिष्ट किंवा मंदी म्हणजे नेमके काय असते, ती फासीवादाला कसा जन्म देते, फासीवाद कसा ओळखावा आणि त्याच्याशी लढण्याचा खरा मार्ग कोणता, यांसारख्या गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे.

एखादा फासीवादी पक्ष सत्तेत असतो तेव्हाच फासीवादाचा धोका असतो, आणि फासीवादी पक्ष सत्तेतून बाहेर पडताच फासीवादाचा धोका टळतो, असे मानणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत जेव्हा लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वातील भाजप सरकारचा पराभव झाला होता, तेव्हा अनेकांचा असा गैरसमज झाला होता की फासीवादाचा धोका आता टळलेला आहे. त्यांचा समज किती बालीश होता हे स्पष्ट झालेच आहे, व आता फासीवादाचा धोका सर्वात भयंकर रूपात आपल्या डोक्यावर घिरट्या घालीत आहे. फासीवाद म्हणजे काय? हे समजून घेतल्याशिवाय आपण काही झाले तरी त्यांच्या विरोधात लढण्याचा प्रभावी मार्ग शोधून काढू शकत नाही. त्याच्या सर्वच सामाजिक-आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक पैलूंची योग्य जाणीव विकसित करूनच आपण त्याला पराभूत करण्याचा एक व्यावहारिक कार्यक्रम आखू शकतो. गेल्या वर्षी मोदी सरकार सत्तेत येताच, पाच वर्षांपूर्वी फासीवादाचा धोका टळला म्हणून सांगणारे लोक रडू-विव्हळू लागले आणि फासीवाद फासीवाद म्हणून ओरडू लागले आहेत. त्यांच्या मते भाजप सत्तेत असला, तर फासीवादाचा धोका असतो आणि जर भाजप सरकार बनवू शकला नाही तर फासीवादाचा धोका टळतो! फासीवादाची एवढी बालीश समज असल्यामुळेच हे लोक फासीवादाला पराभूत करण्याचा जो कार्यक्रम तयार करतात तोसुद्धा विसंगतींनी भरलेला असाच असतो. बिहारमध्ये नुकत्याच झालेल्या भाजपच्या पराभव म्हणजे फासीवादाचे दिवस संपत आल्याचे द्योतक आहे असे हे लोक मानत आहेत. त्यामुळे ते उत्सव साजरा करण्याच्या मनस्थितीत आहेत. बिहारसारखे महागठबंधन किंवा व्यापक डाव्या आघाडीच्या बळावर फासीवाद संपवण्याची योजना बनवणाऱ्या डॉन क्विहोतेंची सध्या कमी नाही. ते फक्त निवडणुकीच्या माध्यमातून फासीवादाला पराभूत करण्याचे शेखचिल्लीचे स्वप्न पाहत आहेत. परंतु हे खरेच शक्य आहे का? निवडणुकीच्या माध्यमातून फासीवाद संपवला जाऊ शकतो का?

या प्रश्नावर गंभीरपणे विचार करणे व फासीवाद विरोधी लढ्याला योग्य दिशा देणे आज गरजेचे आहे. अशा वेळी, हा दीर्घ लेख फासीवादाची एक सुस्पष्ट समज निर्माण करण्यास वाचकांना साहाय्यक ठरेल, असे आम्हांला वाटते. हा लेख फासीवाद निर्माण होण्याच्या आर्थिक-राजकीय कारणांवर विस्ताराने चर्चा करतो, जर्मनी आणि इटलीमधील फासीवादाच्या इतिहासाचे विश्लेषण करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढतो, भारतातील सर्वांत मोठी फासीवादी शक्ती असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एकंदर जन्मकुंडली मांडतो आणि शेवटी फासीवादाशी लढण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यावहारिक कार्यक्रम सादर करतो. फासीवादाच्या निरनिराळ्या सैद्धांतिक पक्षांवरही हा लेख प्रकाश पाडतो व इतिहासात केल्या गेलेल्या सैद्धांतिक चुकांची समीक्षासुद्धा करतो.

हा निबंध सर्वप्रथम २००९ साली कामगारांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मजदूर बिगुल या मासिक वृत्तपत्रात सहा भागांमध्ये प्रसिद्ध झाला होता. हा निबंध मुळात हिंदीत लिहिला गेला होता व या लेखाने मांडलेल्या प्रस्थापनांना गेल्या पाच वर्षांतील घटनाक्रमाने योग्य सिद्ध केले आहे.

**संपादक**

भाग - २

लेखक : अभिनव

मराठी अनुवाद : अमित शिंदे

***आतापर्यंत आपण फासीवादाच्या निर्मितीमध्ये सहाय्यभूत ठरणारी परिस्थिती निर्माण होण्यामागच्या आर्थिक प्रक्रीयांबद्दल माहिती घेतली. पण ही आर्थिक परिस्थिती अटळपणे फासीवादालाच जन्म देते असे नाही. फासीवादाला रोखता येऊ शकते की नाही ह्याचे उत्तर संकटकाळावर मात करू शकणारा एखादा क्रांतिकारी पर्याय उपलब्ध आहे की नाही ह्यावर अवलंबून असते. जर असा क्रांतिकारी पर्याय अस्तित्वात नसेल तर जनतेला प्रतिक्रियावादाच्या मार्गावर नेणे फासीवादी शक्तींना सहज साध्य होईल. ह्या पाश्र्वभूमीवर, भगत सिंहांनी जे सांगितले होते त्याची आठवण होते – ''जेव्हा कठीण परिस्थिती लोकांना आपल्या कह्यात घेते तेव्हा मानवी आत्म्यात क्रांतिकारी भावना जागवणे गरजेचे असते, नाहीतर प्रतिक्रियावादी शक्ती जनतेला चुकीच्या मार्गावर घेऊन जातात''.***

***ही सामान्य रूपरेखा मांडल्यानंतर जर्मनी आणि इटली मधील फासीवादाच्या उदयाची परिस्थिती आणि प्रक्रिया समजून घेणे संयुक्तिक ठरेल. जर्मनी हे फासीवादाचा उदय, विकास आणि सशक्तीकरण ह्यांचे सर्वाधिक प्रातिनिधिक उदाहरण आहे. जर्मनीच्या तुलनेत इटलीमध्ये फासीवाद आधी आला, पण तरीही जर्मनी हा असा देश होता जिथे फासीवादाने खोलवर मूळे रुजवली आणि तिथे त्याचा जबरदस्त प्रभाव तयार झाला. त्यामुळेच आपल्या विश्लेषणाची सुरुवात जर्मनीपासून करूयात.***

### जर्मनीमध्ये फासीवाद

फासीवादी विक्षिप्त आणि चक्रम असतात, असा एक गैरसमज त्यांच्याबद्दल प्रचलित आहे. जर्मनीच्या उदाहरणावरून हे दिसून येते की फासीवाद्यांच्या समर्थकांमध्ये माथेफिरू, चक्रम लोकांची भाऊ-गर्दी नसते तर समानता, लोकशाही आणि स्वातंत्र्य ह्या मूल्यांना जाणतेपणी विरोध करणारे खूप शिकलेले लोक सहभागी होते. जर्मनीमध्ये फासीवाद्यांना समाजाच्या सर्व स्तरांमधून समर्थन मिळालेले होते. त्यात नोकरशाही, कुलीन वर्ग, सुशिक्षित बुद्धिवंतांची (विश्वविद्यालय, महाविद्यालय, शाळांमधील शिक्षक, लेखक, पत्रकार, वकील आदी) संख्या मोठी होती. १९३४ मध्ये, हिटलरच्या **'आईन्त्साजगुप्पेन'** नामक क्रूर सैन्यदलाने जवळपास १ लाख लोकांना अटक केली, किंवा त्यांची रवानगी यातना शिबिरांमध्ये करण्यात आली वा त्यांची हत्या केली गेली. ह्या 'आईन्त्साजगुप्पेन' नामक सैन्यदलाचा एक-तृतीयांश भाग विश्वविद्यालयामधून पदवी मिळवलेल्या लोकांचा होता, हे ऐकून कदाचित तुम्हांला आश्चर्याचा धक्का बसेल.

जर्मनीमध्ये फासीवाद्यांना मोठ्या भांडवलदार वर्गाचे जबरदस्त समर्थन मिळालेले होते. हिटलरच्या **राष्ट्रीय समाजवादी कामगार पक्षाला (नात्झी पार्टी)** सर्वप्रथम समर्थन दिले ते देशांतर्गत अवजड उद्योगाच्या मालक भांडवलदार वर्गाने. त्यानंतर, भांडवलदार वर्गाचा दुसरा मोठा भाग असलेल्या निर्यातदार भांडवलदार वर्गानेसुद्धा हिटलरला समर्थन दिले. आणि त्यानंतर भांडवलदार वर्गाच्या उरल्या सुरल्या हिश्शानेसुद्धा नात्झी पक्षाला समर्थन देऊ केले. ह्या मागची कारणे स्पष्ट होती. हिटलरच्या धोरणांचा सर्वाधिक फायदा मोठ्या भांडवलदारांनाच होणार होता. जागतिक संकटाच्या काळात कामगार चळवळीची शक्ती विखंडीत करून आपली सर्वाधिक प्रतिक्रियावादी, नग्न आणि क्रूर हुकूमशाही लादण्यासाठी जर्मनीतील मोठ्या भांडवलदार वर्गाला ज्या राजकीय संघटनेची गरज होती ती संघटना होती नात्झी पक्ष. भांडवलशाहीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक-सामाजिक असुरक्षिततेच्या वातावरणात निम्न भांडवलदार वर्ग, मध्यम वर्ग आणि कामगार वर्गाच्या एक हिश्शामध्ये वाढीस लागलेल्या प्रतिक्रियावादाचा वापर करून एक बिगर-लोकशाहीवादी, हुकुमशाही सत्तेची स्थापना करण्याची क्षमता त्याच्यात होती. ह्या प्रतिक्रियेचे लक्ष्य कोणी न कोणी असणार होते, हे उघडच आहे. जर्मनीमध्ये नात्झी पक्षाने ज्यांना लक्ष्य बनवले ते होते - वांशिक अल्पसंख्याक. प्रामुख्याने ज्यू, ट्रेड युनियन कार्यकर्ते (ज्यांना नात्झी पक्षाने असुरक्षितता आणि संकटासाठी जबाबदार ठरवले) आणि कम्युनिस्ट. नात्झी पक्षाचे फासीवादी सरकार निश्चितच अंतिम विश्लेषणानुरूप मोठ्या वित्तीय आणि औद्योगिक भांडवलदार वर्गाच्या हुकूमशाहीचे नग्न आणि क्रूर रूप होते. आपण हे एका छोट्याश्या उदाहरणावरून समजू शकतो. जर्मन उद्योगपतींनी नात्झी शासनाच्या काळात आपल्या कारखान्यांमध्ये गुलामांकडून मोठ्या प्रमाणात मेहनत करून घेतली. फासीवादी सरकार त्यांना हे गुलाम फुकटात उपलब्ध करून देत असे, हे सांगण्याची गरज नाही. हिटलरने यातना शिबिरांमध्ये पाठवलेले ज्यू, कामगार, ट्रेड युनियन कार्यकर्ते आणि कम्युनिस्ट, हेच ते गुलाम होते. या कामगारांचे सरासरी आयुर्मान होते फक्त ३ महिने! ३ महिने अशा प्रकारचे काबाडकष्ट करून ते मरून जात. ह्या गुलाम-श्रमाचा उपयोग करणाऱ्या कंपन्यांमध्ये आजच्या जर्मनीतील तमाम प्रतिष्ठित कंपन्यांचा सहभाग आहे. उदाहरणार्थ - फोक्सवॅगन आणि क्रूप. ही फक्त २ उदाहरणे आहेत. ह्या घृणास्पद कामात जर्मनीमधील तमाम बडे भांडवलदार गुंतलेले होते. ह्या अमानवीय कृत्याविरोधात लढणारे बहुतांश कम्युनिस्टच होते आणि त्यांनाच सर्वाधिक पाशवी दडपशाहीला तोंड द्यावे लागले.

संकट काळात जेव्हा संसाधनांची "कमतरता" (ही वास्तविक कमतरता नसून नफा-केंद्रित व्यवस्थेने निर्माण केलेली कृत्रिम कमतरता असते) असते तेव्हाच धार्मिक आणि जातीय अंतर्विरोध आणि संघर्ष निर्माण होण्याची व वाढण्याची शक्यता सर्वाधिक असते, अशी इतिहासाची साक्ष आहे. जर जनतेमध्ये वर्गीय अंतर्विरोधाचे चित्र स्पष्ट नसेल आणि तिच्यामध्ये वर्गीय चेतना विकसित झालेली नसेल तर तिच्यामध्ये एखाद्या विशिष्ट सम्प्रदायाच्या विरोधात अतार्किक असंतोष पसरवला जाऊ शकतो आणि तुमच्या सर्व समस्यांचे कारण ह्या विशिष्ट संप्रदायाचे, जातीचे किंवा धर्माचे लोक आहेत, असा भ्रम पसरवता येतो. आज ज्याप्रमाणे जागतिक संकटाच्या काळात जगभर बेरोजगारी वेगाने वाढली आहे, त्याचप्रमाणे १९३० च्या दशकातही जगभरात बेरोजगारीने उचल खाल्ली होती. त्यावेळीसुद्धा शहरी गरिबांच्या संख्येमध्ये मोठी वाढ झाली होती. ज्या देशांमध्ये औद्योगिक विकासाचा दीर्घ इतिहास होता अशा ठिकाणी भांडवली विकासाच्या माध्यमातून कष्टकरी जनता उजाडली जाण्याची प्रक्रिया ही एक क्रमिक प्रक्रिया होती, ती हळू हळू आणि लहान लहान टप्प्यांमध्ये पूर्ण झाली होती. परंतु जर्मनीमध्ये औद्योगिक विकास १८६०-७० पर्यंत मर्यादित होता. तो राष्ट्रीय एकीकरणानंतर वेगाने वाढीस लागला आणि त्याने ग्रामीण भागातील गरीब शेतकरी आणि शहरी भागातील सर्वसाधारण कष्टकरी जनतेला इतक्या वेगाने उद्ध्वस्त केले की संपूर्ण समाजात भयंकर अशा असुरक्षिततेचे आणि अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले. जर्मनीमध्येसुद्धा शहरी बेरोजगारी तसेच शहरी व ग्रामीण भागातील गरिबी वेगान वाढली. टोकाचा वंशवाद, सांप्रदायिकता वा जातीयवाद बऱ्याच वेळा आर्थिक व सामाजिकदृष्ट्या उध्वस्त झालेल्या लोकांच्या जगण्याला एक "अर्थ" मिळवून देण्याचे काम करतो. ज्या समाजांमध्ये भांडवली विकास हा क्रांतिकारी प्रक्रियेमधून झालेला नव्हता आणि जिथे भांडवली विकासाची प्रक्रिया इतिहासाच्या एका विस्तृत पटावर पसरलेली प्रक्रिया नव्हती व एका असमान, अपूर्ण आणि विचित्र पद्धतीने, वेगवान-अराजक प्रक्रियेच्या रुपात घडली तेथील समाजात फासीवादाचा सामाजिक आधार तयार झाला, तो यामुळेच.

जर्मनीमध्ये औद्योगिकीकरणाची प्रक्रिया खूप उशिरा सुरु झाली. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात १८७० च्या दशकात झाली तर फ्रांसमध्ये १७८० पर्यंत औद्योगिक क्रांतीचे एक चक्र पूर्ण झाले होते. दुसरीकडे, जर्मनी एव्हाना एक एकीकृत देश म्हणूनही अस्तित्वात आलेला नव्हता. जर्मन एकीकरण झाल्यानंतरच जर्मन राष्ट्र अस्तित्वात आले. बिस्मार्कच्या नेतृत्वाखाली भांडवली विकासाची सुरुवात झाली. जर्मनीमध्ये राष्ट्रीय पातळीवर भांडवलशाहीचा विकास सुरू झाला जेव्हा जागतिक पातळीवर भांडवलशाहीने साम्राज्यवादी युगात म्हणजेच एकाधिकारी भांडवलशाहीच्या युगात प्रवेश केला होता. एकाधिकारी भांडवलशाहीची प्रकृती आणि चारित्र्य हे मुळातच लोकशाही विरोधी असते. जर्मनीमध्ये भांडवली विकास हा बँकांच्या मदतीने सुरु झाला आणि सुरुवातीपासूनच त्याचे चारित्र्य हे एकाधिकारी भांडवलशाहीचे होते. त्यामुळे, जर्मनीमध्ये भांडवलशाहीचा विकास १८८० च्या दशकानंतर इतक्या वेगाने झाला की १९१४ पर्यंत तो युरोपातील सर्वाधिक आर्थिक वाढीचा दर असलेला देश बनला. त्याचे औद्योगिक उत्पादन अमेरिकेपाठोपाठ सर्वाधिक होते. परंतु, कुठल्याही लोकशाही क्रांतीच्या मार्गाने भांडवलशाही आलेली नसल्याने समाजामध्ये लोकशाहीची पाळेमुळे रुजलेली नव्हती. आर्थिक महासत्ता म्हणून झालेल्या जर्मनीच्या उदयाबरोबरच जागतिक पातळीवर साम्राज्यवादी प्रतिस्पर्धा तीव्र होणे स्वाभाविक होते. त्यावेळी ब्रिटन जगातील सगळ्यात मोठी साम्राज्यवादी शक्ती होता आणि त्यांचे वसाहत साम्राज्य सर्वात मोठे होते. जर्मनी जागतिक पातळीवर लुटीच्या वाटणीची पुनर्मांडणी करू इच्छित होता. जर्मनीची हीच साम्राज्यवादी महत्वाकांक्षा जगाला पहिल्या जागतिक महायुद्धाकडे घेऊन गेली. पहिले जागतिक महायुद्ध १९१४ पासून १९१९ पर्यंत चालले. त्यात मित्र राष्ट्रांनी जर्मनी समवेत तिच्या अन्य मित्र देशांना पराभूत केले. युद्ध संपल्यानंतर वर्साय येथे एक तह झाल. तो **वर्सायचा तह** म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या तहानुसार जर्मनीवर अत्यंत कठोर अटी लादण्यात आल्या. जर्मनीकडून मोठ्या प्रमाणात युद्धाची नुकसान भरपाई वसूल करण्यात आली. तिचे सर्व अधिकारक्षेत्र काढून घेण्यात आले. तिचे काही भाग वेग-वेगळ्या देशांना देण्यात आले. युद्धसमाप्तीनंतर जर्मन अर्थव्यवस्था छिन्न-भिन्न अवस्थेला पोहोचली होती. त्यामुळे जर्मन भांडवलशाहीपुढे अस्तित्वाचे संकट उभे राहिले होते. जुना विकास दर पुन्हा मिळवायचा तर जर्मन भांडवलशाहीला कामगारांच्या शोषणाचा असा दर गाठावा लागला असता ज्याने कामगारांना विद्रोह करण्यास भाग

**पान ९ वर**

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ८ वरून

पडले असते. परंतु त्याच वेळी जर्मन भांडवलदार वर्गासमोर रशियाचे उदाहरण होते. तिथे साम्राज्यवादी युद्धाने सर्वहारा क्रांतीला जन्म दिला होता. जर्मन भांडवलदार वर्गाला ती चूक करण्यापासून जर्मनीमधील सामाजिक-लोकशाहीवाद्यांनी वाचवले. जर्मनीतील मोठ्या भांडवलदारांचा प्रतिनिधी **ह्युगो स्टीनेस** आणि जर्मन सामाजिक लोकशाहीवादी पक्षाचा नेता **कार्ल लिजन**, जो ट्रेड युनियन आणि कामगारांचा प्रतिनिधी म्हणून गेला होता, ह्यांच्यात एक करार झाला. ह्या करारानुसार, जर्मन भांडवलदार वर्गाने जर्मन कामगार वर्गाला विविध सवलती आणि सुविधा देण्यास मान्यता दिली. ह्या अशा सवलती आणि सुविधा होत्या ज्या देण्यासाठी युद्धापूर्वी तेजीच्या वातावरणात जर्मन भांडवलदार वर्ग कदापि तयार झाला नसता. पण आता कामगार वर्गाबरोबर शत्रुत्व ओढवून कुठलाही क्रांतिकारी प्रहार झेलण्याची ताकद युद्धानंतर त्याच्यात उरली नव्हती. १९१९ मध्ये वायमर गणराज्य अस्तित्वात आल्यानंतर आणि जर्मन भांडवल आणि श्रम ह्यामध्ये सामाजिक-लोकशाहीवाद्यांच्या मार्गदर्शनाखाली समझोता झाल्यानंतर लेनिने लगेच म्हटले होते की मोठ्या जर्मन भांडवलदार वर्गाने रशियन क्रांतीपासून धडा घेतला असून कामगार वर्गाशी सरळ भिडण्या ऐवजी त्याच्याशी समझोता करण्यास प्राधान्य दिले. १९१९ च्या जून मध्ये **जर्मन लीग ऑफ इंडस्ट्रीज**च्या अध्यक्षक मंडळाचे सदस्य **अब्राहम फ्राउइन**चे वक्तव्य ही बाब अधोरेखित करते – "*सद्गृहस्थहो, रशियातील घटनांनी चुकीचे वळण घेतले आणि सुरुवातीपासूनच उद्योगांनी क्रांतीचा धिक्कार केला. जर आपणही - आणि हे खूपच सोपे होते - असहकार्याची भूमिका घेतली असती तर आपल्याकडेही तीच परिस्थिती उद्भवली असती जी आज रशिया मध्ये आहे.*" एका जर्मन भांडवलदाराचे हे वक्तव्य जर्मन संशोधनवाद्यांच्या विश्वासघाताचा प्रातिनिधिक पुरावा ठरावे.

श्रम आणि भांडवलाच्या ह्या समझोत्यामुळे जर्मनीमध्ये एक अंतर्विरोध तीव्र होण्यापासून तात्पुरते यश मिळाले. परंतु त्यामुळे तो अंतर्विरोध संपुष्टात आला नाही आणि तसे होणे शक्यही नव्हते. युद्धानंतर जर्मन भांडवलाला श्रमाचे जास्त प्रमाणात शोषण करणे गरजेचे होते. परंतु जर्मन भांडवलशाहीला वाचवण्यासाठी कामगार वर्गाला अनेक सवलती देणे ही भांडवलदार वर्गाची गरज होती. ह्या कारणाने लोकशाहीचे कट्टर शत्रू असलेल्या वर्गांना आपल्या अनेक विशेषाधिकारांवर पाणी सोडावे लागले. ह्या वर्गांमध्ये जर्मनीतील **युन्कर वर्ग** (श्रीमंत शेतकरी वर्ग जो पूर्वी सामंती जमीनदार होता आणि ज्याला क्रमिक जमीन सुधारणांद्वारे भांडवली जमीन मालकांमध्ये रुपांतरित केले गेले होते) आणि मोठे भांडवलदार, ज्यात देशांतर्गत अवजड उद्योगांचे मालक भांडवलदार यांचा समावेश होता. ह्या वर्गांचा कामगार वर्गासोबतचा अंतर्विरोध वेळो-वेळी प्रकट व्हायचा, परंतु संघटित कामगार चळवळीमुळे हिटलरच्या आगमनापूर्वी हे वर्ग कामगारांचे नग्न दमन आणि शोषण करू शकले नाहीत. १९२४ पर्यंत ह्या वर्गांकडून सत्ता परिवर्तनाचे काही प्रयत्न झाले, ज्यांचा उद्देश कामगार वर्गावर बुर्झ्वा वर्गाची हुकुमशाही लादणे हा होता. परंतु एवढे करूनही जर्मनीमधील मोठा भांडवलदार वर्ग यशस्वी होऊ शकला नाही. १९२४ ते १९२९ दरम्यानचा काळ हा जर्मन भांडवलशाहीसाठी तुलनात्मकदृष्ट्या स्थिर काळ होता. या काळात भांडवल आणि श्रम ह्यामधील तडजोड निदान वरकरणी विनासायास चालू होती आणि कामगार वर्गाने आपल्या सवलती आणि सुविधा कायम राखल्या होत्या. परंतु १९२९ मध्ये आलेल्या जागतिक महामंदीने जर्मन भांडवलदार वर्गाला जबर धक्का दिला. ह्या धक्क्यामुळे जर्मन भांडवलदार वर्गाला नफ्याचा दर समाधानकारक पातळीवर राखणे अवघड झाले आणि तिथूनच त्या राजकीय संकटाची सुरुवात झाली, ज्याचा शेवट हिटलरच्या नेतृत्वाखाली नात्झी पक्षाला सत्तेत बसवण्यात झाला. १९२७ पर्यंत जर्मनीने तिचे राष्ट्रीय उत्पादन पुन्हा त्याच पातळीवर पोहोचवले जिथे ते पहिल्या महायुद्धाच्या पूर्वी होते. जर्मनी युरोपातील सर्वात मोठी आणि जगातील दुसरी मोठी अर्थव्यवस्था बनली होती. परंतु आतून जर्मन भांडवलशाही कामगार चळवळीशी झालेल्या तडजोडीच्या दबावामुळे तितकीच अस्थिर होती. जर्मन भांडवलदार वर्गाची साम्राज्यवादी महत्वाकांक्षा वाढीस लागली होती आणि जर्मन भांडवलदार वर्गाच्या बऱ्याच प्रतिनिधींकडून पुन्हा एकदा युद्धोन्मादी आणि अंधराष्ट्रवादी घोषणा ऐकावयास मिळू मिळू लागल्या होत्या. जागतिक स्तरावर साम्राज्यवादी प्रतिस्पर्धेत पुन्हा एकदा वर्चस्व स्थापन करण्यासाठी जर्मन भांडवलदार वर्गाला मुक्त कारभाराची गरज होती, जेणेकरून कामगार वर्गाशी झालेली तडजोड केराच्या टोपलीत टाकण्यासाठी दबाव वाढीस लागला होता. हेच कारण होते की जर्मन राष्ट्रीय जनता पक्ष आणि सेंटर पार्टीच्या नेतृत्वाखाली अंधराष्ट्रवादी नेत्यांचा विजय झाला. १९२८ मध्ये नात्झी पक्षाला मोठे यश मिळाले. १९२९ च्या जागतिक महामंदीमुळे कामगार वर्गाला दिलेल्या सवलती आणि सुविधा रद्द करणे हा जर्मन भांडवलदार वर्गासमोर अस्तित्वाचा प्रश्न बनला. आता ते ह्या सवलतींवरचा खर्च उचलू शकत नव्हते. महामंदीमुळे देशामध्ये बेरोजगारी आणि गरिबी वेगाने वाढली, परंतु कामगार वर्गाची मोलभाव करण्याची क्षमता कमी झाली नाही कारण त्यांचा प्रतिरोध संघटित होता. त्यामुळे महामंदीचा सगळा भार भांडवलदार वर्गावर पडू लागला आणि नफ्याचा दर ओसरला. कामगार वर्गाविरुद्ध कुठलेही आक्रमक धोरण स्वीकारू न शकल्यामुळे आर्थिक संकटाचा दबाव निम्न मध्यम वर्ग आणि मध्यम वर्गाकडे वळवण्यात आला. संकटामुळे छोट्या उद्योगपतींचा आणि व्यापाऱ्यांचा वर्ग सगळ्यात वेगाने देशोधडीस लागला. कारण हा वर्ग श्रमाच्या शोषणाचा दर वाढवण्यास पूर्णपणे अक्षम होता.

मोठ्या भांडवली वर्गाला ह्या वेळी एका अशा राजकीय शक्तीची गरज होती जी संघटित कामगार चळवळीला उध्वस्त होत असलेला निम्न मध्यम वर्ग, सर्वसाधारण शहरी कष्टकरी जनतेचा एक भाग आणि मध्यम वर्गाच्या प्रतिक्रियेच्या निशाण्यावर आणू शकेल, आणि ह्या सर्व समस्यांचे मूळ कम्युनिस्ट, ट्रेड युनियन आणि संघटित कामगार चळवळ आहे, यावर त्यांना सहमत करू शकेल. नात्झी पक्षाशिवाय दुसरे कोणीही ही गरज पूर्ण करणे शक्य नव्हते.

ह्या संकट काळात जर क्रांतिकारी नेतृत्व कामगार चळवळीला तत्कालीन व्यवस्थेतून बाहेर काढण्याच्या दिशेने नेऊ शकले असते तर परिस्थिती वेगळी असू शकली असती. पण सामाजिक-लोकशाहीवाद्यांच्या नेतृत्वाखाली कामगार चळवळ केवळ मिळालेल्या सवलती आणि सुविधांना चिकटून राहू इच्छित होती, त्यापुढे जाऊ इच्छित नव्हती. किंवा असेही म्हणू शकतो की सामाजिक-लोकशाहीवाद्यांनी कामगार चळवळीला भांडवली व्यवस्थेच्या अंतर्गत मिळालेल्या सवलतींच्या पुढे जाऊ देण्याऐवजी, आहेत त्या सवलती टिकवून ठेवण्यासाठी प्रवृत्त केले. परंतु ह्या सुधारणा चालू ठेवण्यास जर्मन भांडवलदार वर्ग आता तयार नव्हता, कारण आता तो या बाबतीत अगतिक राहिला नव्हता आणि आता त्याला ह्या सवलती चालू ठेवणे शक्यही नव्हते. तो आता आक्रमण करण्यासाठी सज्ज झाला होता. परंतु कामगार वर्ग जिथल्या तिथेच होता. ह्याचा परिणाम असा झाला की आर्थिक संकटाच्या वाढीबरोबर संघटित कामगार वर्गाच्या बाहेरील कष्टकरी जनता, म्हणजेच निम्न मध्यम वर्ग, आणि मध्यम वर्गासामोरील बेरोजगारी, असुरक्षितता आणि अनिश्चितता वाढत गेली व त्यातून अशा प्रतिक्रियेचा जन्म झाला जिचा उपयोग नात्झी पक्षाने करून घेतला. ह्याच प्रतिक्रियेला त्यांनी एक वांशिक चेहरासुद्धा मिळवून दिला कारण त्याशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणात प्रतिक्रियावादी एकजूट उभारणे शक्य नव्हते. अशा प्रकारे ह्या सर्व अनिश्चिततेसाठी आणि असुरक्षिततेसाठी ज्यूंना जबाबदार धरण्यात आले.




**फासीवाद साखळीने बाधलेल्या कुत्र्यासारखा असतो. जनता जेव्हा आपल्या अधिकारांची मागणी करीत रस्त्यावर उतरते तेव्हा शासक भांडवलदार वर्ग या कुत्र्याची साखळी ढिली करतो. हे चित्र दुसऱ्या महायुद्धाच्या काळात एका अमेरिकन चित्रकाराने काढले होते. या दिवसांत भारतातील भांडवलदार वर्गाने फासीवादी कुत्रा जनतेच्या अंगावर सोडला आहे. जनतेच्या झुंजार एकतेवर उभे असलेली सशक्त भांडवलशाहीविरोधी चळवळच फासीवादी कुत्र्याचा सामना करू शकते.**

दुसऱ्या बाजूला, सामाजिक-लोकशाहीवाद्यांनी कृषी क्षेत्रामध्ये युन्कर आणि श्रीमंत शेतकरी ह्यांचे प्रभुत्व संपवण्यासाठी आवश्यक असलेले भूमी सुधार करण्यासाठीदेखील सत्ताधाऱ्यांवर दबाव टाकला नाही. सामाजिक-लोकशाहीवाद्यांकडे त्यासाठीची पुरेशी ताकत उपलब्ध होती, हे येथे नोंदवले पाहिजे. १९२६ मध्ये राजघराण्याला सरकारकडून मिळणारा तनख्वा बंद करण्यासाठी त्यांनी जेव्हा एक यशस्वी आंदोलन पुकारले होते, तेव्हा याची साक्ष मिळाली होती. ह्याच लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला पुढे रेटून ते क्रांतिकारी जमीन सुधारणांच्या माध्यमातून शासकवर्गाचा सर्वात प्रतिक्रियावादी भाग असलेल्या ईस्ट एल्बेच्या युन्करांचे वर्चस्व तोडून शासक वर्गाची ताकत कमी करू शकले असते. युन्कर आणि मोठे भांडवलदार आणि बँका ह्यांच्यातही सुरुवातीपासूनच अंतर्विरोध अस्तित्वात असल्यामुळे हे करणे सोपेही होते. परंतु सामाजिक-लोकशाहीवाद्यांनी हे केले नाही आणि फक्त कामगार चळवळीला मिळालेल्या सवलतींना चिकटून राहण्यात धन्यता मानली. सामाजिक-लोकशाहीवादी मिळालेल्या सवलती टिकवून ठेवण्यासाठी बड्या भांडवलदार वर्गाच्या अटी मान्य करून ती तडजोड कायम राखू इच्छित होते. पण भांडवलदार वर्ग ह्या सवलती संपवून आक्रमण करण्याची तयारी पूर्ण करून बसला होता. १९२६ मध्ये **जर्मन लीग ऑफ इंडस्ट्रीज**मध्ये **पॉल सिल्वरबर्ग**चे वक्तव्य उल्लेखनीय आहे. त्याने म्हटले, "**सामाजिक-लोकशाहीवाद्यांना वास्तवात परत आले पाहिजे आणि उग्र सिद्धांतवाद सोडून रस्त्यावरची निदर्शने आणि बल ह्या नीतीचा त्यांनी त्याग केला पाहिजे, तिने नेहमीच नुकसान केले आहे. त्यांनी जबाबदार पद्धतीने मालकांच्या मार्गदर्शनाखाली सहकार्य केले पाहिजे.**" आता ह्या वक्तव्याची तुलना बुद्धदेव भट्टाचार्य यांच्या त्या वक्तव्याशी करून पाहा, जे त्यांनी ट्रेड युनियनिस्टांच्या एका सभेत केले होते. त्यात बुद्धदेव भट्टाचार्य म्हणातात, "कम्युनिस्टांनी बदलती परिस्थिती समजून घेतली पाहिजे आणि मालकांशी सहकार्य केले पाहिजे. वर्ग संघर्षाचा काळ मागे पडला आहे. आज श्रमाने भांडवलासोबत विकासासाठी भांडवलाच्या अटीवर सहकार्य करणे गरजेचे आहे."

१९२९ मध्ये जर्मन भांडवलदारांनी पहिला मोठा हल्ला करताना **रेड फ्रंट युनियन**वर प्रतिबंध लादले. दुसरीकडे नात्झींचे गुंड आणि खुनी तुकड्या खुलेआम फिरत होत्या. सामाजिक-लोकशाहीवादी शांत राहिले. त्यानंतरही १९३२ पर्यंत असे हल्ले चालूच राहिले पण सामाजिक लोकशाहीवादी शांत राहिले. कारण ह्या हल्ल्यांचे प्रत्युत्तर क्रांतिकारी मार्गानेच दिले जाऊ शकत होते आणि त्या मार्गाने जाणे विश्वासघातकी संशोधनवाद्यांना शक्यच नव्हते. अशा प्रकारे हातावर हात धरून बसण्यामुळे सामाजिक-लोकशाहीवादी आपला बालेकिल्ला असलेल्या संघटित कामगार चळवळीतही जनाधार गमावून बसल. कामगार वर्गाचाही एक भाग नात्झींच्या कळपात सामील होऊ लागला. त्याचा परिणाम असा झाला की १९३२ मध्ये **वॉन पेपेन** नावाच्या उजव्या नेत्याच्या नेतृत्वाखाली सत्ताबदल झाला आणि सामाजिक-लोकशाहीवादी मुख्य घटक असलेले सरकार पडले. त्यानंतर काही दिवसांमध्येच वायमर गणराज्याच्या बुर्झ्वा संविधानातील पळवाटांचा आधार घेऊन एक इनेब्लिंग एक्ट आणला गेला आणि संसदीय लोकशाहीला हुकुमशाहीमध्ये बदलण्यात आले. संसदेत सामाजिक लोकशाहीवादी आणि बुर्झ्वा उदारमतवाद्यांच्या विरोधात मुख्यत्वे दोन पक्ष एकत्र आले - **राष्ट्रीय जर्मन जनता पक्ष** आणि **नात्झी पक्ष**. निवडणुकांपूर्वी सामाजिक-लोकशाहीवादी आणि उदारमतवाद्यांविरोधात जबरदस्त प्रचार अभियान उभारले गेले. त्यांना देशद्रोही ठरवण्यात आले आणि संकटाला जबाबदार ठरवण्यात आले. १९३२ च्या निवडणुकीमध्ये ह्या दोन्ही पक्षांना मिळून ४२ मते मिळाली. त्यापैकी ३३ एकट्या नात्झी पक्षाची होती. १९३३ मध्ये पुन्हा निवडणुका झाल्या आणि त्यात एकट्या नात्झी पक्षाला ४४ मते मिळाली. त्याचबरोबर हिटलर सत्तेत आला आणि जर्मनीमध्ये फासीवाद विजयी झाला.

जर्मनीमधील फासीवादाच्या विजयाचा हा संक्षिप्त इतिहास समजावून घेतल्यानंतर आपण काही निष्कर्ष काढू शकतो.

जर्मनीमध्ये फासीवादाला पोषक पार्श्वभूमी कोणत्या रुपात अस्तित्वात

पान १० वर

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ९ वरून

होती? जर्मनीमध्ये भांडवली विकास उशिरा सुरू झाला. परंतु एकदा सुरू झाल्यावर तो फार वेगाने झाला आणि कुठल्याही लोकशाही क्रांतीशिवाय झाला. त्याचा परिणाम म्हणून दोन परिघटना समोर आल्या. पहिली परिघटना - सर्व क्षेत्रांमध्ये मागासलेपण कायम राहिले आणि आधुनिकीकरण आणि जनतेच्या चेतनेचे लोकशाहीकरण न होताच अभूतपूर्व वेगाने भांडवली विकास झाला. इंग्लंड आणि फ्रांससारख्या देशांमध्ये भांडवलशाही क्रांतिकारी प्रक्रियेतून अस्तित्वात आली आणि त्यानंतर तिचा दीर्घ आणि खोलवर विकास झाला. त्यामुळे समाजातील सामंती आणि गैर-लोकशाहीवादी मूल्यांचे अस्तित्व संपुष्टात आले. दुसरी परिघटना - ह्या तीव्र भांडवली विकासामुळे ज्या वेगाने गाव आणि शहरांमध्ये कष्टकरी जनतेला देशोधडीला लावले त्यातून भयंकर अशा असुरक्षिततेचे आणि अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले. ह्या असुरक्षिततेला आणि अनिश्चिततेला भांडवली व्यवस्थेविरुद्धच्या क्रांतिकारी शक्तीमध्ये रुपांतरीत करता येणे शक्य होते. परंतु सामाजिक-लोकशाहीवादी आंदोलनाने सर्वहारा वर्गाशी केलेला विश्वासघात आणि जर्मन कम्युनिस्ट पक्षाचे अपयश ह्यामुळे ते शक्य झाले नाही. नात्झीवाद हे करोडो लोकांना आर्थिक-सामाजिक आणि भौगोलिकदृष्ट्या विस्थापित करणाऱ्या अत्यंत वेगाने झालेल्या भांडवली विकासावरचे प्रतिक्रियावादी उत्तर होते. जर्मनीमध्ये जमीन सुधारणा क्रांतिकारी पद्धतीने झाल्या नाहीत. जमीन सुधारणांद्वारे जमिनींची मालकी त्यांना कसणाऱ्या लोकांकडे गेली असती. तिथे प्रशियाई मार्गाने भूमी सुधार झाले. त्याद्वारे सामंती जमीन मालकांनाच भांडवली कुलकांमध्ये आणि भांडवली शेतकऱ्यांमध्ये रुपांतरित करण्यात आले. हा वर्ग अत्यंत प्रतिक्रियावादी वर्ग होता. त्याशिवाय अपूर्ण भूमी सुधारांमुळे श्रीमंत भाडोत्री जमीन कसणारा शेतकरी वर्ग तयार झाला. ह्या वर्गाची नाळ भांडवली अर्थव्यवस्थेशी घट्टपणे जोडली गेली होती आणि हे घोर लोकशाही विरोधी होते. भांडवली व्यवस्थेच्या संकटातून निर्माण झालेल्या प्रतिक्रियेचा महत्वाचा भाग हे वर्गच होते. हे वर्ग पुढे नात्झी पक्षाचा आधार बनले. युन्करांचे विशेषाधिकार कायम असल्याकारणाने सामाजिक-लोकशाहीवाद्यांचा सर्वसाधारण शेतकरी वर्गात आधार तयार होऊ शकला नाही. ही शेतकरी जनता फासीवादाच्या प्रसाराच्या काळात एक तर निष्क्रिय राहिली किंवा फासीवाद्यांची समर्थक बनली. तिलासुद्धा त्यांच्या अनिश्चिततेचा तरणोपाय फासीवाद्यांमध्ये दिसू लागला होता. हा निव्वळ त्यांचा भ्रम होता, आणि पुढे ते सिद्धही झाले, हे स्पष्टच आहे.

१९१९ नंतर वायमार गणराज्याच्या स्थापनेनंतर जे राज्य अस्तित्वात आले ते एक कल्याणकारी राज्य होते. लोककल्याणकारी धोरणे ही जर्मन भांडवलदार वर्गाची अगतिकता होती, कारण युद्धानंतर तो कामगार चळवळीशी सरळ संघर्ष करू शकत नव्हता आणि रशियाचे उदाहरण त्याच्या समोर होते. ही समज विकसित करण्यात सामाजिक-लोकशाहीवाद्यांनी त्यांची मोठीच मदत केली. कामगार वर्गाला मोठ्या प्रमाणात सवलती देण्यात आल्या. परंतु भांडवली विकासाचे स्वतःचे गतित्त्व असते. साम्राज्यवादी जगात टिकून राहण्यासाठी नफ्याचा दर वाढवत नेणे ही जर्मन भांडवलदार वर्गाच्या अस्तित्वासाठीची अनिवार्य अट होती. कामगार वर्गाला दिलेल्या सवलती लवकरच त्याला डोईजड वाटू लागल्या. लोक-कल्याणकारी धोरण हे नफ्याच्या दरावर ब्रेक लावण्याचे काम करू लागले होते. वित्तीय, औद्योगिक भांडवली वर्ग आणि कुलक-युन्कर ह्यांना लवकरच कामगार वर्गावर त्यांची नग्न आणि क्रूर हुकुमशाही लादण्यासाठी एका हुकुमशाही सत्तेची गरज वाटू लागली.

सामाजिक-लोकशाहीवाद्यांनी कामगार चळवळीला सुधारवादाच्या चौकटीतच डांबून ठेवले. त्यांनी भांडवलशाहीचा कुठलाही पर्याय दिला नाही आणि त्याचबरोबर ते भांडवलशाहीच्या पायातील बेड्यासुद्धा बनले. त्यांचे एकूण ध्येय हे भांडवली लोकशाहीच्या चौकटीत राहून पगार-भत्ते वाढवत राहणे आणि जे मिळाले आहे त्याच्याशी चिकटून राहणे हेच होते. परंतु भांडवली व्यवस्था नफाच निर्माण करू शकली नाही तर काय होईल ह्या प्रश्नाचे त्यांच्याकडे कुठलेही उत्तर नव्हते. ते जैसे थे स्थिती कायम ठेवण्याचे स्वप्नरंजन करत राहिले. परंतु भांडवलशाहीची नैसर्गिक गती कधीच हे होऊ देत नाही. भांडवली वर्गाला नफ्याचा दर वाढवायचाच होता. आणि त्याचा दीर्घ कालीन स्त्रोत होता - कामगारांच्या शोषणात वाढ करणे. संघटित कामगार आंदोलनाच्या जोरावर सामाजिक-लोकशाहीवादी असे करू देत नव्हते. आता भांडवली वर्ग लोकशाहीच्या चौकटीत राहून नफ्याचा दर वाढवू शकत नव्हता. मोठ्या भांडवली वर्गाला आता एका सर्वसत्तावादी राज्याची आवश्यकता होती व वायमर गणराज्य ते देऊ शकत नव्हते, कारण वायमर गणराज्य हे भांडवल आणि श्रम ह्यांच्यातील तडजोडीवर टिकून होते. हे कार्य नात्झी पक्षच पूर्ण करू शकत होता.

भांडवली राज्यसत्तेचे कार्य असते भांडवली उत्पादन विना अडथळा चालू राहण्यासाठीची हमी देणे आणि भांडवली उत्पादन संबंधांचे संरक्षण करणे. राज्यसत्तेच्या माध्यमातून भांडवलदार वर्ग त्याच्या वर्गीय हितसंबंधांना संघटित करतो आणि व्यक्तिगत भांडवली हितसंबंधांच्या वर नेतो. अधून-मधून आपसातील अंतर्विरोध वाढीस लागतात, अराजकता पसरते तेव्हा राज्यसत्ता हस्तक्षेप करून व्यवस्था पुन्हा रुळावर आणते. त्याच बरोबर भांडवली राज्यसत्ता कष्टकरी जनतेला एक वर्ग म्हणून संघटित होऊ देत नाही आणि त्यांना राष्ट्र, समुदाय किंवा धर्माच्या सदस्याच्या रुपात म्हणजेच एका नागरिकाच्या रुपात अस्तित्वात ठेवण्याचा प्रयत्न करते. वायमर गणराज्य भांडवली वर्गांच्या हितसंबंधांना संघटित करण्यात अपयशी ठरले. कल्याणकारी धोरणांनी भांडवलदार वर्गाच्या राजकीय आणि आर्थिक ऐक्यास सुरुंग लावला. संकट काळात भांडवली हितसंबंध आणि जनतेचे हितसंबंध ह्यांच्या मध्ये ताळमेळ राखणे अवघड होते. तेव्हाच जनतेच्या राजसत्तेकडून असलेल्या अपेक्षा वाढीस लागतात, परंतु राजसत्ता लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास पूर्वी पेक्षा अधिक असमर्थ झालेली असते. अशा वेळी बुर्झ्वा वर्गाचा एक भाग राजसत्तेने त्यांच्या बाजूने हुकुमशाही वर्तन करावे अशी अपेक्षा करू लागतो. आणि असे घडले नाही तर मोठे भांडवलदार अधिकाधिक प्रतिक्रियावादी आणि असहिष्णू होऊ लागतात. वायमर गणराज्यात हेच घडले. श्रम आणि भांडवल ह्यांच्यातील सामाजिक लोकशाही तडजोड राज्यसत्तेला मोठ्या भांडवलदारांच्या गरजेनुरूप मुक्तपणे काम करू देत नव्हती आणि त्यामुळे भांडवली संकट अधिकाधिक गहन होत चालले होते. ह्या संकटामुळे जनतेचा एक मोठा भाग उध्वस्त होत होता आणि त्यांच्यामध्ये असंतोष तयार होत होता. मोठ्या भांडवलदारांनी नात्झी पक्षाच्या माध्यमातून ह्या असंतोषाचा लाभ उठवला आणि त्याला प्रतिक्रियावादामध्ये रुपांतरित केले. नात्झी पक्षाने त्यासाठी ज्यू-विरोध, वांशिक-श्रेष्ठत्व, कम्युनिजम-विरोध, लोकशाही-विरोध अशा विचारांचा आधार घेतला.

सामाजिक-लोकशाहीवाद्यांच्या झुंजार अर्थवादी संघर्षामुळे आणि ट्रेड युनियनवादामुळे कामाची मजुरी वाढत होती, परंतु भांडवली संकटामुळे नफ्याचा दर कुंठित झाला होता. त्यामुळे नफ्याच्या अकुंचनाची स्थिती तयार झाली. ह्यामुळे सर्वप्रथम उध्वस्त झालेला छोट्या उद्योगपतींचा वर्ग पुढे चालून फासीवाद्यांचा खंदा समर्थक बनला. नंतर फासीवादाने त्यांना काहीही दिले नाही आणि नंतर फासीवादाने फक्त मोठ्या भांडवलदार वर्गाची सेवा करण्यात धन्यता मानली, ही गोष्ट अलाहिदा. मोठा भांडवली वर्ग उध्वस्त होऊन भिकेला तर लागला नाही मात्र त्याने जर फासीवादाच्या उदयाचे समर्थन केले नसते तर मात्र तो नक्कीच भिकेला लागला असता, कारण त्याला त्याच्या नफ्यामध्ये मोठ्या घसरणीला तोंड द्यावे लागले असते. संघटित कामगार चळवळीच्या दबावाचे स्वरूप एका उदाहरणावरून समजून घेता येईल. १९२८ मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पादनाचा ६७ टक्के भाग कामगारांच्या मजुरीच्या रुपात खर्च होत होता. संकट काळात बेरोजगारीमध्ये वाढ होऊनही भांडवलदार वर्गाच्या मोलभाव करण्याच्या क्षमतेत कुठलीच सुधारणा झाली नाही. त्याचे कारण एका मजबूत आणि लढाऊ कामगार आंदोलनाची उपस्थिती हे होते. कुलक आणि युन्करांनी आपले विशेषाधिकार कायम राखण्यासाठी आणि संकट काळावर मात करण्यासाठी नात्झींचे समर्थन केले. परंतु सशक्त कामगार चळवळ सामाजिक-लोकशाहीवाद्यांच्या नेतृत्वाखाली भांडवली सुधारवादाच्या भोवऱ्यात गटांगळ्या खात राहिली. भांडवली वर्गाला आक्रमक होण्यासाठीचे कारण भेट म्हणून देण्यात आले आणि फासीवादाचा उदय प्रतिरोध्य असताना अप्रतिरोध्य बनला.

(पुढच्या अंकात क्रमशः)

# नफ्याच्या गोरखधंद्यात बळी जाते आहे विज्ञान आणि तडफडतो आहे मनुष्य

पान १६ वरून

म्हणजेच कष्टाच्या अभावामुळे, आरामदायी जीवनामुळे होणाऱ्या स्थूलपणासारख्या रोगांवर आणि सौंदर्य, विलासिता यांच्याशी संबंधित टक्कल पडणे, सुरकुत्या, नपुंसकता यांसारख्या रोगांवर उपचार शोधून काढणे हा आहे. मर्कनावाच्या एका बहुराष्ट्रीय औषध कंपनीचा माजी प्रमुख तर खुलेआम स्वीकार करतो की स्टॉकहोल्डरवाली कोणतीही कंपनी आपला रिसर्च तिसऱ्या जगातील देशांमध्ये होणाऱ्या रोगांच्या इलाजाच्या दिशेने वळवू शकत नाही, कारण त्यामुळे कंपनीचे दिवाळे निघू शकते. एका औषध कंपनीत काम करणारे संशोधक ए. जे. स्टेलर यांनी रॉयल सोसायटी ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन ॲण्ड हाइजिन नावाच्या प्रतिष्ठित पत्रिकेतील एका लेखामध्ये असा निष्कर्ष काढला होता की एखादे नवीन ॲण्टीबायोटिक बनवणे महाग असते आणि तिसऱ्या जगातील देशांमध्ये ते औषध विकून फारसा नफा कमावला जाऊ शकत नाही. त्यांच्यासाठी मानवी जीवनापेक्षा नफ्याचे मोल जास्त आहे, हे उघडच आहे.

पेटंटसंबंधी बोलायचे झाले तर जागतिक व्यापार संघटनेचा एक करार आहे जो बौद्धिक संपदा अधिकाराच्या व्यापार संबंधी पैलूंवर आधारलेला आहे. इंग्रजीत त्याला TRIPS म्हणतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्व सदस्यांसाठी तो बंधनकारक आहे. या करारानुसार कोणत्याही कंपनीला आपल्या पेटंटचा अधिकार २० वर्षांसाठी मिळतो. म्हणजेच संबंधित औषध बनविण्याचा आणि विकण्याचे सर्वाधिकार २० वर्षांसाठी त्या कंपनीपाशी राहतात. आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये कोणतेही सरकार त्या देशात व्यापार करणाऱ्या कोणत्याही कंपनीला कोणत्याही पेटंट औषधाचा फॉर्म्युला देण्यासाठी बाध्य करू शकते, असा एक अनुच्छेद नावाला त्यामध्ये आहे, आणि अमेरिकेसह युरोपच्या सर्व विकसित भांडवली देशांनी यावर सहमती दर्शविलेली आहे. परंतु या अनुच्छेदाचा प्रयोग होऊ नये यासाठी हे सर्व साम्राज्यवादी देश भारतासह आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेच्या विकसनशील देशांवर सतत दबाव टाकत असतात. साम्राज्यवादाच्या हिताच्या विरोधात असलेला अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव कधीही प्रत्यक्षात उतरू शकत नाही, हे वास्तव आहे. २००१ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने जेव्हा एड्सचे औषध स्वस्त करण्यासाठी असे करण्याचा प्रयत्न केला तेव्हा अमेरिकेने दक्षिण आफ्रिकेला आर्थिक निर्बंध लादण्याची धमकी देत व्यापार निगराणी सूचीमध्ये टाकले होते. अमेरिका किंवा दुसरा कोणताही साम्राज्यवादी देश भांडवलदारांचा नफा जपण्यासाठी काहीही करू शकतो, याचेच हे उदाहरण.

भांडवलशाहीसाठी नफा हाच एकमात्र हेतू असतो, आणि भांडवलदार जे काही करतात ते फक्त नफ्यासाठीच करतात, हे आपण अशा प्रकारे पाहू शकतो. नफ्यासाठीच औषध कंपन्या कोणत्याही आजारावर उपचार करण्याऐवजी तो लांबवण्यासाठीच पैसा लावतात, हे एक खुले रहस्य आहे. औषधांच्या किंमतीत वाढ, पेटंटसाठी झगडे आणि रिसर्च थांबवण्यासारख्या गोष्टी तर फार पूर्वीपासून सतत होत आहेत, परंतु आजच्या काळात हे सारे अगदी नंग्या आणि विभत्स रुपात सर्वांसमोर येत आहे. यामागचे कारण भांडवलदारांची कधी न शांत होणारी हाव हेच आहे, हे आपण वर पाहिले आहे. आरंभीचा काही काळ सोडला तर एकूण इतिहासात भांडवलशाही आणि भांडवलदार वर्ग बांडगुळांसारखा समाजाला चिकटून बसला आहे. तो समाजाचे रक्त शोषून जिवंत राहतो आणि त्याच्या बदल्यात आजारांशिवाय दुसरे काहीही समाजाला देत नाही. त्याऐवजी आपण जर समाजवादी रशिया आणि समाजवादी चीनची उदाहरणे पाहिली तर आपल्या लक्षात येईल की योजनाबद्ध समाजवादी अर्थव्यवस्थेद्वारे दुसऱ्या कोणत्याही क्षेत्राप्रमाणेच आरोग्य विज्ञान आणि जनसामान्यांच्या आरोग्यातही अद्भुत चमत्कार केले जाऊ शकतात. नफ्याऐवजी उपचारावर लक्ष केंद्रित केले तर केवढा फरक पडू शकतो ते या देशांच्या उदाहरणांवरून सिद्ध झालेच आहे. परंतु त्यासाठी या सडलेल्या परजीवी व्यवस्थेला उपटून फेकून देणे आणि समतेवर आधारित कष्टकरी जनतेचे लोकस्वराज्य म्हणजेच समाजवादी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. समाजवादात नफ्यावर उभ्या असलेल्या कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करून त्या कंपन्या कष्टकरी वर्गाच्या नियंत्रणाखाली आणल्या जातील. मानवी मूल्यांवर आधारित आरोग्य व्यवसाय आणि रिसर्च यांना भांडवलाच्या जबड्यांतून मुक्त केले जाईल. तेव्हा विज्ञानाच्या इतर शाखांप्रमाणेच आरोग्य विज्ञानसुद्धा कोणाच्या नफ्याचे गुलाम न राहता मानवाचा सेवक बनेल.

**नवमीत**

**(लेखक पेशाने डॉक्टर आहेत)**

**अनुवाद : अभिजीत**

●

# विश्वव्यापी मंदी आणि सांप्रदायिक फासिस्ट दहशतीच्या छायेत सरले वर्ष

पान १ वरून

राहिल्या आणि हे जिन्नस अधिकांश लोकांच्या आवाक्याबाहेर राहिले. रेल्वे भाडे आणि घरगुती गॅसच्या किंमतींमध्ये झालेल्या वाढीचे तडाखेसुद्धा सर्वात जास्त कष्टकरी लोकांनाच झेलावे लागले. शिक्षण, आरोग्य, निवारा यांसारख्या मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी झटकून मोदी सरकारने मंदीच्या काळातही भांडवलदारांच्या तिजोऱ्या भरण्याचे काम चोख पार पाडले. मेक इन इंडियाचा फुगा चांगलाच फुगवण्यात आला, परंतु वास्तवात देशातील बहुतेक तरुणांची रोजीरोटीच्या शोधात वणवण भटकण्यापासून सुटका होऊ शकलेली नाही. बेरोजगारीची अवस्था अशी आहे की उत्तर प्रदेशात शिपयाच्या ३६८ पदांसाठी २३ लाखपेक्षा जास्त तरुणांचे अर्ज आहे. त्यांमध्ये पीएचडी आणि एमबीए डिग्रीधारकसुद्धा होते. या नागड्या वास्तवावर पांघरूण घालण्यासाठी गेल्या वर्षी आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापवण्यात आला. कुणी आरक्षणाला विरोध करताना, तर आणखी कुणी अन्य काही जातींना आरक्षणाचे लाभ देण्याची मागणी करताना दिसून आले. या प्रक्रियेमध्ये देशातील तरुणांमध्ये जातीच्या नावाखाली फूट पाडण्याचे कारस्थान चांगलेच रंगले. याशिवाय मोदी सरकारच्या स्मार्ट सिटीच्या हवाई मनोऱ्यांचे पितळ चेन्नईमध्ये मुसळधार पावसानंतर आलेल्या पुराच्या भेदक चित्राने उघडे पडले. गेल्या वर्षी सर्वसामान्य बजेटमध्ये कॉर्पोरेट टॅक्सचा दर ३० टक्क्यांवरून कमी करून २५ टक्के करण्यात आला. यामुळे सामान्य जनतेवर २३,३८३ कोटी रूपयांचा बोजा अप्रत्यक्ष करांच्या रूपात पडणार आहे. दुसरीकडे धंदा करणे सुलभ करण्याच्या नावाखाली भांडवलादारांना उदार मनाने सवलती देण्यात आल्या. स्वदेशी आणि राष्ट्रवादाचा जप करणाऱ्या भाजप सरकारने विमा, संरक्षण यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात थेट परकीय गुंतवणुकीला सूट दिली. त्याच प्रकारे शेतकऱ्यांची जमीन बळकावणे औद्योगिक भांडवलदारांना सोपे जावे  याकरिता भूमी अधिग्रहण बिल पास करण्यासाठी सरकारने पूर्ण ताकद लावली, मात्र जनतेच्या दबावामुळे त्यांचा हा डाव यशस्वी होऊ शकला नाही.

गेल्या वर्षात संघ परिवाराच्या नरभक्षी फासिस्ट गुंडांनी देशभरात आपल्या राक्षसीपणाचा नंगा नाच केला. संघाच्या गुंडानी फक्त शिवीगाळ आणि तोडफोड करण्यापुरते स्वत:ला मर्यादित ठेवले नाही. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यामुळे सैया भये कोतवाल तो डर काहेका ही म्हण अगदी खरी ठरवीत लोकांच्या खुलेआम हत्या करण्यासही ते कचरले नाहीत. नरेंद्र दाभोळकरांच्या हत्येनंतर या दहशतवाद्यांनी गेल्या वर्षी कोल्हापूरचे ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते गोविंद पानसरे आणि कर्नाटकातील धारवाड येथील कन्नड विद्वान आणि तर्कशील विचारवंत एम. एम. कलबुर्गी यांच्या निर्घृण हत्या केल्या. त्यांचे खुनी अजूनही मोकाट फिरत आहेत. संघ परिवाराच्या हिंदुत्त्ववादी राष्ट्रवादाबद्दल चिकित्सक दृष्टिकोन बाळगणारे बुद्धिजीवी, इतिहासकार, पत्रकार, कलाकार यांना ते धमकावत आहेत आणि अर्वाच्य शिवीगाळ करीत आपल्या हिंदुत्त्ववादी संस्कृतीचे प्रदर्शनही मांडत आहेत.

याशिवाय देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये संघ परिवाराशी संबंधित वेगवेगळ्या संघटना शहरांतील निम्न मध्यमवर्गीय वस्त्या आणि कामगार वस्त्यांमध्ये, तसेच अगदी गावांमध्येसुद्धा अभूतपूर्व स्वरूपात आपले जाळे पसरवीत आहेत आणि लव्ह जिहाद, बीफ सेवन आणि धर्मांतराशी संबंधित अफवा पसरवीत, लोकांच्या धार्मिक सांप्रदायिक पूर्वग्रहांचा फायदा घेत, अल्पसंख्याकांच्या विरोधात सांप्रदायिक विद्वेषाचे विष कालवीत आहेत. या विद्वेषाची टोकाची अभिव्यक्ती दादरी येथे अखलाक याच्या हत्येच्या रुपात समोर आली. गोमांस सेवनाची अफवा पसरवून लोकांची हत्या करण्याची किमान आणखी दोन प्रकरणे उजेडात आली आहेत. याशिवाय संघ परिवाराशी संबंधित संघटना कायदा व्यवस्था धाब्यावर बसवून दररोज गोमांस सेवनाच्या विरोधात खुलेआम गुंडगिरी आणि तोडफोड करीत आहेत.

भाजप आणि संघ परिवाराच्या आनुषंगिक संघटनांचे तमाम नेते मोदी सरकारवर टीका करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला देशद्रोही ठरवून पाकिस्तानला जाण्याचा सल्ला देत आहेत. सत्तेच्या नशेत भगवे फासिस्ट इतके मदांध झाले आहेत की बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपचा पराभव झाला तर पाकिस्तानात फटाके वाजवले जातील, असे वक्तव्य खुद्द भाजप अध्यक्षांनीच बिहार निवडणुकीच्या आधी केले होते. तऱ्हेतऱ्हेचे मानवद्रोही चाळे केल्यानंतरसुद्धा भाजपला बिहार विधानसभा निवडणुकीत सणसणीत पराभव पत्करावा लागला, ही गोष्ट अलाहिदा. देशातील असहिष्णुतेचे वातावरण इतके घुसमटून टाकणारे बनले की ५० हून अधिक लोकांनी आपले राष्ट्रीय पुरस्कार परत केले. त्यांमध्ये साहित्यिक, नाट्यकर्मी, चित्रपटकर्मी आणि शास्त्रज्ञांचाही समावेश आहे. नरेंद्र मोदींसाठी ही सणसणीत चपराक होती, परंतु यातून बोध घेतील तर ते फासिस्ट कसले! त्यांनी या साहित्यिक, चित्रपटकर्मी आणि शास्त्रज्ञांच्या विरोधात अपप्रचाराची मोहीम उघडली.

शिक्षणसंस्थांपासून समग्र शिक्षणक्षेत्राच्या भगवाकरणाची मोहीम गेल्या वर्षी आपल्या अत्युच्च बिंदूवर पोहोचलेली दिसून आली. भारतीय इतिहास संशोधन परिषद, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, नॅशनल बुक ट्रस्ट, भारतीय जनसंचार संस्था, आईआईएस, आईआईटी, आईआईएम आणि अनेक विद्यापिठांच्या प्रमुख पदांवर अशा लोकांची नेमणूक करण्यात आली ज्यांची सर्वांत मोठी योग्यता हीच आहे की ते संघाशी जोडलेले आहेत. फिल्म अँण्ड टेलिविजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआईआई) च्या गर्वनिंग काउंसिलच्या अध्यक्षपदी संघाचे समर्थक आणि अश्लील चित्रपटांचे हिरो गजेंद्र चौहान यांची नेमणूक करण्यात आली. या नेमणुकीच्या विरोधात एफटीआईआईच्या विद्यार्थ्यां नी पुकारलेले शानदार आंदोलन अजून सुरू आहे. उच्च शिक्षण संस्थांच्या भगवाकरणाबरोबरच नवउदारवादी धोरणेसुद्धा जोरात लागू करण्यात आली. नॉन नेट फेलोशिप बंद करण्याची घोषणा हे त्याचे ठळक उदाहरण होते. याच्या विरोधात उभे राहिलेले ऑक्युपाई युजीसी आंदोलन दमनाच्या अनेक प्रयत्नांनतरही अजूनसुद्धा सुरू आहे.

भगव्या फासिस्टांच्या शासनात गेल्या वर्षभरात सांप्रदायिकतेचे विष पसरलेच, त्याचबरोबर जातीय उत्पीडनाच्या घटनांमध्येसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाली. संघाचे प्रचारक म्हणून काम केलेल्या मनोहरलाल खट्टर यांचे शासन असलेल्या हरयाणामध्ये फरीदाबाद येथील सुनपेड गावात नवधनाढ्य दांडगटांनी एका दलित परिवाराला जिवंत जाळले. या भयंकर घटनेमध्ये दोन निष्पाप मुलांचा जीव गेला आणि त्यांचे आईवडील जखमी झाले. याच्या आधी मे महिन्यात राजस्थानच्या डांगवास येथे आणि उत्तर प्रदेशच्या दनकौर येथेसुद्धा गरीब कष्टकरी दलितांवर असेच अत्याचार झाले. प्रामुख्याने हरयाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि तामिलनाडूमध्ये दलित विरोधी अत्याचारांमध्ये वाढ दिसून आली. यांपैकी बहुतेक घटनांमध्ये गुन्हेगारांना शिक्षा झालेली नाही.

दलित विरोधी अपराधांबरोबरच महिला विरोधी अपराधही काही कमी झाले नाहीत. लोकसभा निवडणुकांच्या आधी "बहुत हुवा नारी पर वार, अब की बार मोदी सरकार"ची घोषणा देणाऱ्या मोदींचे सरकार सत्तेत आल्यानंतरसुद्धा गेल्या वर्षी देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये घर, रस्ते, बाजारांपासून फॅक्टरी आणि कचेऱ्यांमध्येसुद्धा महिलांवर पाशवी अत्याचार होत राहिले आणि कायदा व्यवस्था आ वासून बघत राहिली. दिल्लीमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षानेसुद्धा विधानसभा निवडणुकीच्या आधी महिलांच्या सुरक्षेबाबत बऱ्याच बाता मारल्या होत्या, परंतु त्यांचे सरकार बनल्यानंतरसुद्धा दिल्लीमध्ये महिलांच्या सुरक्षेत सुधारणा झालेली नाही.

दिल्ली विधानसभा निवडणुकांमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाच्या ऐतिहासिक विजयानंतर हे सरकार जनतेच्या बाजूचे असले, अशी अपेक्षा अनेक बुद्धिजीवींना वाटत होती. परंतु अशा बुद्धिजीवींचा आशावाद फार काळ टिकून राहू शकला नाही, कारण सत्ता हाती येताच या पक्षात सुरू झालेल्या सुंदोपसुंदीत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी अरविंद केजरीवाल यांच्या हुकुमशाही वागणुकीचा पर्दाफाश केला. यानंतर दिल्लीमध्ये ठेका प्रथा बंद करण्याच्या मागणीसाठी निदर्शने करणाऱ्या कामगारांवर पोलिसांनी पाशवी लाठीचार्ज केला. या घटनेने केजरीवाल सरकारच्या कामगारविरोधी चारित्र्याचे पितळ उघडे पाडले आणि केजरीवालसुद्धा भांडवलशाहीचाच एक दलाल आहे, यावर शिक्कमोर्तब केले. त्यानंतर दिल्लीच्या वेगवेगळ्या भागांमध्ये कष्टकऱ्यांच्या झोपड्या पाडण्याच्या प्रकरणानेसुद्धा या पक्षाचे जनविरोधी चारित्र्य उघडे पाडले.

आंतरराष्ट्रीय पटलावर गेल्या वर्षी विश्वव्यापी मंदीच्या काळात आंतरसाम्राज्यवादी प्रतिस्पर्धेने तीव्र रूप धारण केले. त्यामुळे जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये युद्धे आणि दहशतवादी कारवायांमध्ये निर्दोष माणसे मारली जाण्याचे प्रमाण वाढले. मध्य पूर्वेमध्ये साम्राज्यवादाच्या अंतर्विरोधांनी टोक गाठले. अमेरिकी साम्राज्यवादाची थुंकी झेलत साउदी अरबच्या निरंकुश सत्ताधाऱ्यांनी यमनवर हल्ला करून विद्ध्वंस केला. सिरियामध्ये सुरू असलेल्या गृहयुद्धाने आणखी हिंसक रूप धारण केले. अमेरिकेच्या साम्राज्यवादाने पोसलेल्या इस्लामिक स्टेट नामक भस्मासुराने सिरियामध्ये मोठ्या प्रमाणात मृत्यूचे तांडव केले. सिरियामध्ये रशियन सैन्याचा हस्तक्षेप आंतरसाम्राज्यवादी प्रतिस्पर्धा तीव्र होण्याची स्पष्ट खूण होती. पॅरिसच्या दहशतवादी हल्ल्यानंतर फ्रांससह कित्येक युरोपी देश इस्लामिक स्टेटचा नायनाट करण्याच्या गोष्टी करू लागताच, पाश्चात्य साम्राज्यवादी गोटातील भेगासुद्धा स्पष्ट दिसून आल्या.

सिरिया आणि इराकमध्ये सुरू असलेल्या युद्धांमुळे लाखोंच्या संख्येने शरणार्थ्यांनी कायदेशीर आणि बेकायदेशीर मार्गांनी युरोपी देशांमध्ये आश्रय घेण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे एक जबरदस्त शरणार्थी संकट उभे ठाकले आहे व ते दूर होण्याची चिन्हे नजिकच्या काळात तरी दिसत नाही आहेत. शरणार्थ्यांचा प्रश्न हाताळणारी संयुक्त राष्ट्राची संस्था यूएनएचसीआरनुसार जगभरात शरणार्थ्यांच्या संख्येने आज ६ कोटीचा आकडा ओलांडला असून तो दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वांत जास्त आहे. तिकडे पॅलेस्टाईनमध्ये इजराइलची पाशवता सुरूच आहे, परंतु पॅलेस्टाईननेसुद्धा आपला संघर्ष अखंड सुरू ठेवला असून वर्ष सरता सरता त्यांनी इजराइलचे हल्ले आणि जायनवादी पाशवतेच्या विरोधात मोहीम उघडली. त्याला तिसऱ्या इंतिफादाची सुरुवात म्हटले जाते आहे.

गेल्या वर्षी ऑक्टोबरच्या अखेरच्या आठवड्यात एक अमेरिकन समुद्री युद्धनौका यू.एस.एस. लासेन दक्षिण चीनी समुद्रातील चिनी क्षेत्रात दाखल होताच, तीव्र होणाऱ्या आंतरसाम्राज्यवादी स्पर्धेची आणखी एक झलक अमेरिका आणि चीन दरम्यान दक्षिण चीनी सागरात झालेल्या ओढाताणीच्या रूपात पाहायला मिळाली. या नौकेसोबत एक गुप्तहेर विमानही होते. या घटनेनंतर अमेरिका आणि चीनमध्ये तणाव निर्माण झाला.

जागतिक भांडवलशाहीच्या ज्या प्रेषितांनी विश्वव्यापी मंदीमधून बाहेर पडण्यासाठी चीनकडून अपेक्षा बाळगल्या होत्या, त्यांच्या पदरी गेल्या वर्षी निराशाच आली. चिनी अर्थव्यवस्थेचा फुगा गेल्या वर्षी असा काही फुटला की त्याच्या धमाक्याने जगभरातील शेयर बाजार गडगडले. चीनच्या नकली कम्युनिस्टांनी तेथील जनतेला जी गुलाबी स्वप्ने दाखवली होती ती आता दुस्वप्ने ठरली आहेत. तेथील कामगार आंदोलने, संप, धरण्यांच्या संख्येत झालेल्या जबरदस्त वाढीवरून चीनी लोकांच्या मोहभंगाचा अंदाज येऊ शकतो. याबद्दलच्या बातम्या चीनच्या बनावट कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्त्वातील सामाजिक फासीवादी सत्तेने घातलेल्या तमाम निर्बंधांनंतरही जगभरात पसरल्या.

गेल्या वर्षाच्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय घटनांवर धावती नजर फिरवताच आपल्याला या वर्षीच्या आव्हानांचा अंदाज सहजच येऊ शकतो. विश्वव्यापी मंदीतून सुटका होण्याच्या शक्यता या वर्षीसुद्धा दिसत नाही आहेत. उलट मंदी अधिक तीव्र होण्याचीच चिन्हे आहेत. साम्राज्यवादाच्या हितरक्षणासाठी जीव तोडून काम करणारी संघटना, म्हणजेच जागतिक बँकेच्या एका अलीकडच्या अहवालात स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला आहे की २०१६ मध्ये मंदी तीव्र होण्याची शक्यता आहे. पाश्चात्य देशांमध्ये असलेली मंदी सुरू राहीलच, त्याचबरोबर ब्रिक्स देशांमध्ये (ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका) सुद्धा मंदी तीव्र होईल, असा अंदाज जागतिक बँकेच्या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेवरही मंदीचे काळे ढग दाटून येत आहेत. मेक इन इंडिया अभियानात कोट्यावधी रूपये उधळल्यानंतरही गेल्या वर्षी भारताच्या निर्यातीमध्ये विक्रमी घसरण दिसून आली. औद्योगिक उत्पादनात मंदीतून सावरण्याचे कोणतेही संकेत दिसत नाही आहेत. हल्लीच पंतप्रधान कार्यालयाने देशातील प्रमुख अर्थशास्त्रज्ञांना पत्रे पाठवून भारतीय अर्थव्यवस्थेतील संभाव्य मंदीला तोंड देण्याच्या उपायांबाबत त्यांची मते द्यायला सांगितले आहे, जेणेकरून भांडवलदारांचा नफा टिकून राहील. या वर्षी अर्थव्यवस्थेत जबरदस्त मंदी येणाची शक्यता असल्यामुळे सत्ताधारी किती घाबरले आहे, त्याचा अंदाज या गोष्टीवरून येऊ शकतो.

येत्या दिवसांमध्ये मोदी सरकार आपल्या मालकाची, म्हणजेच भांडवलदारांची खुशामत करण्यासाठी कामगार विरोधी विधेयकांना संसदेची मंजुरी मिळवून देण्याकरिता पुरेपूर जोर लावणार आहे. कामगार वर्गाला या तथाकथित श्रमसुधारांचे कामगार विरोधी चारित्र्य ओळखावे लागेल आणि आत्तापासूनच त्यांच्या विरोधाची रणनीती निश्चित करावी लागेल. कामगार वर्गाची एकता फोडण्यासाठी सांप्रदायिक मुद्द्यांच्या आधारे जनतेचे धृवीकरण करण्याचा पुरेपूर प्रयत्न भगवे फासिस्ट करणार आहेत. वर्षाच्या आरंभीच ज्या प्रकारे भगव्या वानरांनी रामजन्मभूमीचा मुद्दा पुन्हा वर काढला आहे त्यावरून त्याच्या खुणा दिसतच आहेत. शिक्षण आणि अकॅडेमिक क्षेत्र भगव्या रंगात रंगवून टाकण्याची संघी मोहीम देशभरात जोरदारपणे चालविली जाईल, हेसुद्धा ठरलेलेच आहे. न्याय, समता आणि सामाजिक समरसतेबद्दलचा प्रत्येक आवाज निर्दयपणे चिरडून टाकण्याची मोहीमसुद्धा पुढे चालवली जाईल.

भांडवलशाही संकटाच्या काळात बहरणाऱ्या फासीवादी राक्षसाचा सामना कामगार वर्गाच्या पोलादी एकजुटीद्वारेच केला जाऊ शकतो, अशी इतिहासाची साक्ष आहे. भगव्या फासीवादी शक्ती कष्टकऱ्यांना धर्म आणि जातीच्या नावावर फोडून मृत्यूचे जे तांडव करीत आहेत त्याद्वारे ते त्यांच्या मरायला टेकलेल्या मालकाचे - भांडवलशहा वर्गाचे - आयुष्य वाढवण्याचे काम करीत आहेत, हे आपण समजून घेतले पाहिजे. भांडवलशाहीच्या या मरणासन्न रोग्याला त्याच्या थडग्यापर्यंत पोहोचवण्यासाठी कामगार वर्गाने आपल्या ऐतिहासिक जबाबदारीचे स्मरण ठेवून फासिस्ट शक्तींशी टक्कर घेण्यासाठी कंबर कसली पाहिजे. नव्या वर्षात याच्याहून चांगला संकल्प दुसरा कोणता असू शकतो?

●

# कॉम्रेड नवकरणला 'कामगार बिगुल'तर्फे लाल सलाम

आमचा प्रिय तरुण कॉम्रेड नवकरण आता आमच्यात नाही. पंजाबच्या या क्रांतिकारी कार्यकर्त्याने २३ जानेवारी रोजी मृत्यूला आलिंगन दिले. एका अत्यंत संवेदनशील, विवेकशील आणि क्रांतीच्या ध्येयाला सर्वस्वी समर्पित तरुणाने आत्महत्येचा दुःखद मार्ग निवडावा, यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. आपल्या सोबत्यांसाठी जगणारा नवकरण आज त्यांनाच सोडून गेला आहे, यावर विश्वास बसत नाही. अशा प्रकारच्या घटना नेहमीच क्रांतिकारी आंदोलनासाठी मोठा आघात असतात. ही वाट किती कठीण आणि किती दीर्घ लांब पल्ल्याची आहे, याची नव्याने आठवण अशा घटना क्रांतिकारकांना करून देत असतात..

शेवटी क्रांतिकारकसुद्धा याच समाजातून येतात आणि आपल्या आत असलेल्या समाजाच्या जन्मचिन्हांसह क्रांतीकार्यात उतरत असतात. स्वतःच्या उणिवा, दोष यांच्याशी ते सतत संघर्ष करीत असतात आणि एक एक करून त्यांच्यावर मात करीत असतात. हा संघर्ष जीवनाच्या अंतापर्यंत संपत नाही. तो वेगवेगळी रूपे धारण करीत असतो. एका क्रांतिकारकासाठी हा संघर्ष त्याच्या मृत्यूपर्यंत सुरूच असतो. एक संघर्ष तो या व्यवस्थेच्या विरोधात चालवीत असतो, जेणेकरून एका अशा जगाची निर्मिती करता येईल जेथे अशा दोषांची बीजे असणार नाहीत जे एकूण समाजाबरोबरच त्या क्रांतिकारकामध्येसुद्धा असतात आणि ज्यांच्याशी तो सतत लढत असतो. बऱ्याचदा लोक क्रांतिकारकांना आदर्श बनवून त्यांच्याकडे पाहतात आणि समाजाने देऊ केलेल्या दोषांच्या वर ते आहेत असे मानतात. परंतु हे एका माणसाला देवत्त्व प्रदान करण्यासारखे नाही का? क्रांतिकारकसुद्धा एक माणूस असतो आणि त्याच्या आतसुद्धा वेगवेगळ्या प्रश्नांचे अखंड द्वंद्व सुरू असते. एका क्रांतिकारकाच्या आयुष्यातसुद्धा कित्येक वेळा निराशेचे टप्पे येत असतात हे खरे आहे. आयुष्याशी सतत चालणार्या स्वातंत्र्यप्रेमींच्या या झगड्यात नवकरण पराभूत झाला. नवकरण आता पुन्हा कधीच येणार नाही हे माहीत असूनही त्याच्या सोबत्यांच्या नजरा आज त्याला शोधत आहेत. परंतु यामुळे त्याचा निवाडा करण्याचा अधिकार कुणालाही मिळू शकत नाही. कम्युनिस्ट आंदोलनामध्ये पाल लफार्ग, इलियानोर मार्क्स (मार्क्सच्या कन्यांपैकी एक) फदयेव मायकोवस्की, वाल्टर बेंजामिन आणि कित्येक अज्ञातांनी आत्महत्येद्वारे आपल्या जीवनाचा अंत केला. ना त्यांची आत्महत्या म्हणजे त्यांचे विचार, त्यांची संघटना किंवा त्यांचे ध्येय याचा निवाडा होता, ना अन्य एखादी व्यक्ती या दुःखद निर्णयावरून त्यांचा निवाडा करू शकते. येथे प्रश्न तुलना करण्याचा नाही. मित्र नवकरण निर्विवादपणे आमचा एक धडाडीचा कार्यकर्ता होता, व त्याच्या जाण्याच्या धक्क्यातून आणि दुःखातून आम्ही अजून सावरू शकलेलो नाही.

नवकरण पंजाबमधील संगरूर येथे राहणारा. तीन वर्षांपूर्वी तो क्रांतिकारी चळवळीच्या संपर्कात आला. भगतसिंहांना त्याचा आदर्श होते. या व्यवस्थेच्या सर्व क्लेशदायक खुणा- गरीबी, शोषण, बहुसंख्य जनतेचे अगदी भकास जीवन- हे सारे त्याने आपल्या डोळ्यांनी पाहिले होते, भोगले होते. चांदीचा चमचा मुखात घेऊन तो जन्माला येणाऱ्यांपैकी तो नव्हता. जनतेच्या दुःखाची त्याला जाणीव होती. क्रांतिकारी आंदोलनाशी स्वतःला जोडून समाजातील सर्व समस्या वैज्ञानिक पद्धतीने समजून घेण्यास त्याने सुरुवात केली आणि एका नव्या जगाचे स्वप्न डोळ्यांमध्ये घेऊन त्याने या कार्यात स्वतःला मनोभावे झोकून दिले. आक्टोबर २०१३ मध्ये त्याने व्यावसायिक क्रांतिकारी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचे जीवन अंगिकारले आणि शेवटच्या श्वासापर्यंत आपल्या ध्येयासाठी खंबीरपणे काम करीत राहिला. नव्या गोष्टी शिकून घेणे आणि कठीण काम हाती घेणे हा तर त्याचा स्वभावच होता. काही काळासाठी तो नौजवान भारत सभेच्या लुधियाना युनिटचा संचालकही होता. त्याचबरोबर तो पंजाब स्टुडेंट्स युनियन (ललकार) च्या नेतृत्त्वकारी कमिटीचाही सहस्य होता. त्याच्यामुळे लुधियानामध्ये नौजवान भारत सभा आणि पंजाब स्टुडेंट्स युनियनच्या कामाला गती मिळाली. कामगार आघाडी असो, विद्यार्थी-युवक आघाडी असो, तो सर्वच आघाड्यांवर सारख्याच ताकदीने सक्रिय होता. सर्वत्र त्याची महत्त्वपूर्ण भूमिका होती. कामगार वस्त्यांमध्ये जाऊन प्रचार करणे, कामगारांच्या मुलांना शिकवणे, जनतेची वेगवेगळ्या मुद्द्यांवर एकजूट निर्माण करणे, वर्तमानपत्रे, पत्रिका, पुस्तके घेऊन क्रांतिकारी साहित्याचा प्रचार करणे, सर्वच




कामांमध्ये तो बघता बघता पारंगत झाला. त्याचे भाषण श्रोत्यांना चेतविणारे होते. तो नियमित अभ्यास करायचा, व पंजाबी पत्रिका ललकारसाठी त्याने वेगवेगळ्या राजकीय सामाजिक मुद्द्यांवर लेखन करण्यासही सुरुवात केली होती. एका धुमकेतूप्रमाणे अल्प काळासाठी आपला प्रकाश विखरून तो आमच्यामधून निघून गेला.

त्याला गाण्याची आवड होती आणि त्याचा आवजही बुलंद होता. वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तो गीते सादर करायचा, परंतु त्याच्या प्रतिभेचा खरा विलास सोबत्यांमध्ये अनौपचारिकपणे गाताना पाहायला मिळायचा. सर्वच त्याच्या सुरात सूर मिसळून गाऊ लागत. तो गिटार वाजवण्यासही शिकत होता. संगीत आणि कलेचे महत्त्व त्याला ठाऊक होते, म्हणूनच अत्यंत लाजरा असूनसुद्धा तो गाण्याची वेळ येताच अगदी मोकळेपणाने गात असे. मंचावरून तो पाशच्या कवितांचे पठण करी तेव्हा जोशाने श्रोत्यांच्या मुठी आवळल्या जात. तो चांगला अनुवादकसुद्धा होता आणि इंग्रजीतून पंजाबीत जलत अनुवाद करायचा. अलीकडेच त्याने स्तालिन यांच्या संघटनेसंबंधी या पुस्तिकेचा इंग्रजीतून पंजाबीत अनुवाद केला होता, अन्य दोन तीन पुस्तकांचे अनुवाद तो करीत होता.

नवकरणचा सगळ्यात महत्त्वाचा गुण म्हणजे त्याला श्रमाची आवड होती. जेवण बनवणे, साफसफाई करणे, कपडे धुणे, भांडी घासणे, ही कामे तर तो स्वतः करायचाच, शिवाय सामूहिक कामेसुद्धा तो निव्वळ कर्तव्यभावनेने नाही तर आनंदाने करायचा. आपल्या समाजात शारिरीक श्रमाला तुच्छ लेखले जाते, परंतु नवकरण शारीरिक श्रमाचे मोठेपण जाणून होता. तो अवश्य थकायचा, पण थकल्यामुळे गळून गेलेला कधी कुणी त्याला पाहिले नाही.

तो फार कमी बोलायचा, अंतर्मुख होता. आपल्या अडीअडचणी, समस्या यांच्याबद्दल उघडपणे कधी बोलत नसे. बराच आग्रह केल्यानंतरच सोबत्यांना काही गोष्टी कळायच्या. त्याच्या जवळच्या सोबत्यांच्या मते त्याच्या राजकीय जीवनामध्ये बऱ्याचदा निराशेचा काळ यायचा. बहुतेकदा आपल्या मनातील गोष्टी तो आपल्या सर्वांत जवळच्या मित्रांशीसुद्धा बोलून दाखवायचा नाही. त्याचा स्वभाव फारच बुजरा होता. कदाचित त्यामुळेच, त्याच्या मनात चाललेल्या ज्या वादळामुळे त्याने असा निर्णय घेतला त्याचा थांगपत्ता त्याच्या सोबत्यांनासुद्धा लागू शकला नाही. शेवटी, त्याच्या आठवणी तेवढ्या आता आमच्यापाशी मागे राहिल्या आहेत.

क्रांतीच्या वाटेवरुन चालणे हे अतिशय कठीण काम आहे, हे नाकारता येणार नाही. अशा वेळी कधीकधी निराश होणे, हीसुद्धा एक सामान्य बाब आहे. परंतु एक क्रांतिकारक अशा वेळी क्षणभर थांबतो आणि पुन्हा पूर्वीपेक्षा जास्त ताकद आणि ऊर्जेसह आपल्या मार्गावर पुढे चालू लागतो. आपल्या आत अनेक दुःखांचे ओझे घेऊनसुद्धा तो चालत राहतो. तसे पाहता, बरेच लोक क्रांतिकारी आंदोलनात पडतात आणि काही दिवसांनंतर जेव्हा मार्ग खडतर वाटू लागतो तेव्हा ते हा मार्ग सोडून पुन्हा आपल्या खाजगी जीवनाकडे वळतात. काही लोक तर इतके स्वार्थी असतात की आपले दोष झाकण्यासाठी ते चळवळीवर दोषारोप करू लागतात आणि पळ काढतात. नवकरण या दोन्ही प्रकारांपैकी नव्हता, हे महत्त्वाचे आहे. थकवा आणि निराशेने त्याला अवश्य जखडले होते, परंतु दुनियादार बनणे त्याच्या तारुण्याला पटले नाही. ज्या जीवनातून तो आला होता, तेथे पुन्हा जाणे त्याच्या मनाला पटले नाही. तसे जीवन त्याला मंजूर नव्हते. आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत नवकरण लुटीवर उभ्या असलेल्या या व्यवस्थेचा तिरस्कार करीत राहिला. तिच्या विरोधात चाललेल्या संघर्षाकडे कानाडोळा करून घरी बसणे आणि आपल्या वैयक्तिक स्वार्थांसाठी जगत राहणे, हा त्याचा मार्ग नव्हता.

त्याच्या जाण्याने क्रांतिकारी चळवळीवर मोठा आघात झाला आहे. ही कोणत्याही एका संघटनेची क्षती नाही तर एकूण क्रांतिकारी चळवळीची क्षती आहे. अशा जिंदादिल तरुणाला श्रद्धांजली अर्पण करून आज त्याने पाहिलेले स्वप्न डोळ्यांत घेऊन क्रांतीच्या खडतर मार्गावरून आपल्याला पुढे चालत जावे लागेल. ज्यांच्यामुळे आमचा प्रिय साथी नवकरण आज आमच्यामध्ये नाही ती कारणे कायमची नष्ट करावी लागतील. नवकरण जीवनाच्या लढ्यात पराभूत झाला खरा, परंतु त्याचे लहानसे राजकीय जीवन इतरांना प्रेरणा देण्यासाठी पुरेसे आहे. कामगार बिगुलची त्याला श्रद्धांजली. त्याचे स्वप्न साकार करण्यासाठीचा संघर्ष सुरू ठेवण्याची शपथ आम्ही यावेळी पुन्हा एकदा घेत आहोत.

**कॉम्रेड नवकरणला लाल सलाम. इंकलाब जिंदाबाद.**

●



# कथा - नागडा राजा

पान १५ वरून

आदेश दिला, ज्यावेळी तो रस्त्यावर येईल त्यावेळी कुठूनही, कुठल्याही माणसाचा कसलाही आवाज जरी आला तरी त्याला हात्तीच्या पायाखाली तुडवल जाईल.

कायदयाची घोषणा होताच राज्यभरातले गणमान्य नागरिक विचार करू लागले. राजाची चेष्टा करणं किंवा त्याला हसणं हे चांगलं नाहीये हे खरं, मात्र इतर कारणास्तव ते बोलले किंवा त्यांनी साधी कुजबूज केली तरी त्यासाठी फुकटची शिक्षा कां म्हणून भोगायची? आणि तीसुद्धा देहदंडाची. सर्व लोक मिळून राजाकडे गेले. राजमहलाच्या बाहेर अगदी गुडघ्यांवर येऊन म्हणाले, आम्ही राजाला एक विनंती करायला आलोय.

भेदरलेला राजा बाहेर आला, अन खोटं अवसान आणून म्हणाला, "कशाला आलाय इथं? विद्रोह करण्याचा विचार आहे का?" गणमान्य नागरिकांनी वर बघायचं धाडस न करता उत्तर दिलं, "नाही महाराज, तुम्ही आम्हाला चुकीचं समजलात. आम्ही असं काहीही करणार नाही." सुस्कारा सोडत राजाने ऐटीत आपल्या अदृश्य पोषाखाची किनार ठिक केली आणि पहिल्यापेक्षा कडक शब्दात म्हणाला, "मग एनढ्या मोठया संख्येनं कशाला आला आहात?"

"आम्ही एक विनंती करायला आलोय. आमचं हसण्या बोलण्याचं स्वातंत्र्य आम्हाला परत दया. जे लोक तुमच्यावर चिखलफेक करतात, तुम्हांला हसतात ते मूर्ख आहेत. आणि त्याना मारलंच पाहिजे. पण आम्ही सगळे राजभक्त, इमानदार नागरिक आहोत. आमची तुम्हांपाशी प्रार्थना आहे, तुमचा हा नवीन कायदा रद्द करा".

"स्वातंत्र्य? आणि तुम्हाला? जर तुम्ही स्वातंत्र्याची इच्छा बाळगत असाल तर तुम्ही प्रजा म्हणून या राज्यात राहू शकत नाही. जर तुम्हांला माझी प्रजा म्हणून इथं राहायचं असेल तर माझे कायदे मान्य करावे लागतील. आणि माझे कायदे पोलादासारखे मजबूत आहेत. मी ते रद्द करु? कधीच नाही!" - एवढं बोलून राजा वळाला आणि आपल्या महालात निघून गेला.

नागरिकांना पुढे बोलण्याची हिंमत झाली नाही. भीत भीत त्यांनी हळूच मान वर केली, आणि पाहतात तर राजा निघून गेलाय. आता ते माघारी जाण्यावाचुन काहीही करू शकत नव्हते. मग लोकांनी एक नवीन शक्कल लढवली. ज्या ज्या वेळेस राजा बाहेर येई, त्या त्या वेळी ते दाराला कडी लावून घरात बसत. रस्त्यावर ढुंकूनसुद्धा बघत नसत.

एके दिवशी राजा मंत्री आणि अंगरक्षकांबरोबर



राजमहालाच्या बाहेर निघाला. सगळे रस्ते सामसूम होते. दुतर्फा घरांचे दरवाजे बंद होते. जो एकच आवाज येत होता तो त्याच्याच पावलांचा होता. जणू रात्रीच्या निरव शांततेत कुठलीशी सेना मार्च करीत होती.

अचानक राजा थांबला. कान टवकारत ओरडला, "हा आवाज ऐकताय ना?" मंत्र्यांनीसुद्धा एकण्याठी कान टवकारले.

"हो, लहान मूल रडतंय," एक जण म्हणाला.

"एक बाई गाणं म्हणतेय," दुस-याने सांगितलं.

"तो माणूस नक्कीच दारूच्या नशेत पार झिंगलेला असणार, मूर्ख कुठला, मोठमोठयानं हसतोय," तिसरा मंत्री म्हणला.

आपल्या मंत्र्यांना या गोष्टी अगदी क्षुल्लक वाटताहेत हे बघून राजा लालेलाल झाला. "तुम्ही माझा नवीन कायदा विसरलात वाटतं?" - त्याने गर्जना केली. रागानं त्याचे डोळे बाहेर आले होते, आणि त्याची लुळी छाती धडधडत होती.

मंत्र्यानी लगेच आदेश दिला - ज्या कुणी आवाज काढलाय, भले तो म्हातारा असो, तरुण असो, पुरुष असो वा स्त्री किंवा आणखी कुणी. त्याला जेरबंद करुन जल्लादाच्या हवाली करा.

पण तेवढ्यात असं काही घडलं ज्याची राजाने स्वप्नातसुद्धा कल्पना केली नव्हती. शिपायांनी घराचे दरवाजे तोडताच बायका-पुरुष, लहान मुलांचा घोळका घरांतून बाहेर पडला. ते राजाभवती उड्या मारू लागले आणि हाताचे पंजे घारींसारखे उगारत ते राजाच्या शरीरावर तुटून पडले. तो ओरडत होते, "ओरबडा, फाडा, त्याचा खुनी पोषाख फाडून टाका."

लोकांनी राजाच्या बाहया पकडून मोडल्या. महिला त्याच्या छाताडावर बुक्क्या मारीत होत्या. दोन लहान मुलं त्याच्या काखेत आणि पोटात गुदगुल्या करीत होती. चहू बाजूंनी वेढलेल्या राजाला निसटण्याची वाट दिसेना. त्याने आपले तोंड गुडघ्यात लपवले आणि खारुताईसारखा अंग चोरून बसला. पण सगळं व्यर्थ. काखेत होणा-या भयनाक गुदगुल्या आणि शरीराजी होणारी भयंकर जळजळ तो सहन करु शकत नव्हता. काही केल्या तो या संकटातून सुटू शकत नव्हता. त्याच्या तोंडातून राग, भय आणि आश्चर्याचे संमिश्र आवाज निघत होते. तो कपाळ ताणून लोकांना घाबरवण्याचा, धमकावण्याचा प्रयन्त करीत होता. ते बघून हसता हसता लोकांच्या पोटात दुखू लागलं.

लोकांच्या घरातून शिपायांनी पाहिलं, राजा राजा फार मजेशीर दिसत होता. जणू कुत्र्यांनी घेरलेलं माकड. आपण त्याच्याबद्दल आदर बाळगला पाहिजे, हेसुद्धा ते पार विसरून गेले. तेही इतरांच्या हसण्यात सामील झाले. हे पाहून पहिल्यांदा तर मंत्री घाबरले, त्यांनी राजाकडे पाहिलं, आणि मग तेही खळखळून हसू लागले.

हसता हसता अकस्मात मंत्र्यांना आठवलं, आपण राजाचा कायदा मोडतोय, आपल्याला अटक होऊ शकते. अगोदर जेव्हा जनता राजाची खिल्ली उडवत होती, त्यावेळी मंत्रीच त्यांना दंड देत होते. मात्र आता ते स्वत:च राजावर हसू लागले होते. पुन्हा त्यांनी राजाकडे पाहिलं. त्यांच पूर्ण शरीर काळनिळं पडलं होतं. जळक्या वाकळासारखं. राजा पावसात भिजलेल्या कोंबडीच्या पिलासारखा दिसत होता. त्याला बघून मंत्र्यांना पुन्हा हसू फुटलं.

"हे अगदी स्वाभाविक नाही का? विनोदी गोष्टींवर लोकांना हसू येणारच. पण राजाने तर कायदा करून लोकांच्या हसण्यावरच बंदी आणली होती. काय फालतू कायदा आहे!" मग मंत्रीसुध्दा लोकांबरोबर ओरडू लागले "ओरबडा! याचे खोटे कपडे फाडून टाका!"

आपले मंत्री आणि शिपाईसुद्धा जनतेच्या बाजूने गेले आहेत आणि आता ते आपल्याला जरासुद्धा भीत नाहीत, हे पाहून राजाला प्रचंड धक्का बसला. आपल्या मस्तकात हातोड्याचा जोरदार प्रहार झाल्यागत वाटलं त्याला, आणि पुढच्या क्षणी तो जमिनीवर कोसळला!

●

# मार्क्सचे भांडवल समजून घ्या: चित्रांकनासह

पान १४ वरून

## ३

भांडवलशाही समाजाच्या आर्थिक संरचनेची उत्पत्ती सामंती समाजाच्या आर्थिक संरचनेपासून झाली. सामंती समाजाचे विघटन भांडवलशाही समाजाच्या निर्माणाची तत्त्वे उन्मुक्त करते.

प्रत्यक्ष उत्पादक, म्हणजेच कामगार, तोपर्यंत आपले श्रम विकू शकत नाहीत जोपर्यंत जमिनीशी असलेला त्याचा संबंध समाप्त झालेला नाही, जोपर्यंत दास, भूदास किंवा दुसर्या व्यक्तीचा वेठबिगार होण्यापासून त्याची सुटका झालेली नाही. याशिवाय, श्रमशक्तीचे स्वतंत्र विक्रेता बनण्यासाठी, कोणत्याही बाजारात सौदा करण्यासाठी, शिल्प संघांच्या प्रभुत्वापासून बचाव करण्यासाठी, आपले अप्रैंटिस आणि जर्नीमॅनच्या क्रियात्मक गतिविधीवर निर्बंध लादणाऱ्या शिल्प संघांच्या नियमांपासून आणि कायद्यांपासून मुक्ती मिळवणे त्यांच्यासाठी आवश्यक होते. या दृष्टिकोणातून, उत्पादकांना पगारी कामगारांत बदलणारी ऐतिहासिक प्रक्रिया एकीकडे उत्पादकांना भूदास प्रथा आणि शिल्प संघांच्या निर्बंधातून मुक्त करणारी प्रक्रिया असते. भांडवली इतिहासकारांसाठी फक्त हाच पैलू अस्तित्त्वात असतो. परंतु दुसरीकडे, नुकतेच स्वातंत्र्य मिळवलेले लोक. त्यांच्यापासून उत्पादनाची सर्व साधने आणि त्यांचे अस्तित्त्व टिकवून ठेवणाऱ्या जुन्हा सामंती व्यवस्थेने त्यांना प्रदान केलेल्या सर्व गोष्टी हिरावून घेतल्या गेल्याशिवाय स्वत:ला बाजारात विकण्यासाठी जात नाहीत. ही संपत्तीहरणाची कहाणी मनुष्यजातीच्या इतिहासात रक्तरंजित आणि धगधगत्या अक्षरांत लिहिली गेली आहे....



पगारी कामगार आणि भांडवलदार दोघांनाही पैदा करणार्या विकास प्रक्रियेचा प्रस्थानबिंदू कामगारांची गुलामी हाच होता. प्रगती होती या गुलामीचे स्वरूप बदलण्यात, सामंती शोषणाचे रूपांतर भांडवली शोषणात होण्यात...

आदिम संचयाच्या इतिहासात अशा तमाम क्रांत्यांना आपण युगांतरकारी मानले पाहिजे ज्या निर्माणाच्या टप्प्यातून जाणाऱ्या भांडवलदार वर्गासाठी पायऱ्यांचे काम करीत असतात. जेव्हा मोठ्या संख्येने माणसांच्या समूहांना अकस्मात आणि जबरदस्तीने त्यांच्या जीवन निर्वाहाच्या साधनांपासून वेगळे करून स्वतंत्र तसेच अनाश्रित सर्वहाराच्या रूपात श्रमाच्या बाजारात फेकून दिले जात असते, अशा क्षणांसाठी ही बाब सर्वाधिक लागू होते. या एकूण प्रक्रियेचा आधार आहे शेतीची उत्पादने, शेतकऱ्यांचे संपत्तीहरण, त्यांना त्यांच्या जमिनीपासून वेगळे केले जाणे.


वेगवेगळ्या देशांमध्ये हे संपत्तीहरण वेगवेगळे रूप धारण करीत असते, वेगवेगळ्या ऐतिहासिक कालखंडांमध्ये ते संपत्तीहरण आपल्या अनेक अवस्थांमधून जात असते. परंतु फक्त इंग्लंडमध्येच त्याचे प्रारुपित रूप पाहावयास मिळते, असे म्हटले जाऊ शकते. म्हणूनच आपण इंग्लंडचेच उदाहरण घेत आहोत.

(पुढच्या अंकात क्रमशः)

# मार्क्सचे भांडवल समजून घ्याः चित्रांकनासह

## भाग पहिला - आदिम संचयाचे रहस्य

अनुवाद : नारायण खराडे




**अमेरिकेच्या कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य आणि प्रसिद्ध राजकीय चित्रकार ह्युगो गेलर्ट यांनी १९३४ मध्ये मार्क्सच्या भांडवलाच्या आधारे एक पुस्तक कार्ल मार्क्सज कॅपिटल इन लिथोग्राफ लिहिले होते. या पुस्तकामध्ये भांडवलमध्ये दिलेल्या प्रमुख अवधारणा चित्रांच्या माध्यमातून समजावल्या गेल्या होत्या. गेलर्ट यांच्याच शब्दांत या पुस्तकामध्ये मूळ पुस्तकातील सर्वांत महत्त्वपूर्ण अंश तेवढे दिलेले आहेत. परंतु मार्क्सवादाच्या मूलभूत जाणीवेसाठी आवश्यक सामग्री चित्रांकनाच्या साहाय्याने दिलेली आहे. कामगार बिगुलच्या वाचकांसाठी या सुंदर कृतीतील अंश या अंकापासून एका शृंखलेच्या रूपात दले जाणार आहेत. - संपादक**

### १

धर्मशास्त्रामध्ये मूळ पाप जी भूमिका पार पाडीत असते, साधारणपणे राजकीय शास्त्रामध्ये आदिम संचयाची तीच भूमिका असते. आदमने वर्ज्य असलेले सफरचंद खाल्ले, म्हणून जगात पाप निर्माण झाले. मूळ पापाचा उद्भव एका लोककथेच्या द्वारे सांगण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, आदिम संचयाबद्दल आपल्याला सांगण्यात येते की फार पूर्वी जगात दोन प्रकारचे लोक होते. एकीकडे काही श्रेष्ठ लोक होते, जे कष्टाळू होते, बुद्धिमान होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे काटकसर करणारे होते, दुसरीकडे कामचुकार आणि बदमाश लोक होते जे आपली सगळी धनसंपत्ती भोगविलासात उधळत होते. परंतु एक फरक होता. पतनाच्या धर्मशास्त्रीय कथेमध्ये आपल्याला कमीत कमी असे सांगण्यात आले आहे की माणसाला आपल्या भाजीभाकरीसाठी घाम कां गाळावा लागतो. काही लोकांना आपल्या भाजीभाकरीसाठी असे काहीही कां करावे लागत नाही, हे आर्थिक इतिहासाच्या पतनाची कथा आपल्याला सांगते. हे आर्थिक पतनच सामान्य माणसाच्या गरीबीचे कारण आहे. कितीही कष्ट उपसले तरी त्यांच्यापाशी विकण्यासाठी स्वतःखेरीच दुसरे काहीही असत नाही, तसेच काही लोकांच्या संपदेची सुरुवातसुद्धा तेथूनच होत असते. ती सतत वाढत जात राहते, वास्तविक त्या लोकांनी काम करायचे कधीच सोडून दिले आहे.

आजसुद्धा लोक अशा प्रकारची मुक्ताफळे उधळीत असतात. जेव्हा जेव्हा संपत्तीचा प्रश्न उभा राहतो, तेव्हा ही घोषणा करणे प्रत्येक व्यक्तीचे पवित्र कर्तव्य ठरते. प्रत्येक वयात आणि मानसिक विकासाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये लोकांना फक्त अक्षरमाला शिकवली जाते. सर्वांना माहीतच आहे, वास्तविक जगाच्या इतिहासात युद्ध, इतरांना परतंत्र बनवणे, दरोडेखोरी, हत्या आणि थोडक्यात सांगायचे तर बळप्रयोगाची मुख्य भूमिका आहे. परंतु राजकीय अर्थशास्त्राचा सभ्य इतिहास नेहमीच मनोहर कहाण्यांना चिकटून राहिलेला दिसतो. अर्थशास्त्र्यांचे ऐकायचे झाले तर , आपला काळ सोडल्यास अधिकार आणि श्रम नेहमीच समृद्धीचे एकमेव माध्यम राहिले आहे. परंतु आदिम संचय ज्या पद्धतीने झाला आहे, ते दुसरे काहीही असू शकेल, मनोरम नक्कीच नाही, हे वास्तव आहे.





### २

ज्या प्रकारे उत्पादनाची साधने तसेच जीवननिर्वाहाची साधने आधीपासूनच भांडवल नसतात, तसेच चलन आणि मालसुद्धा आधीपासूनच भांडवल नसतात. त्यांचे भांडवलात रूपांतर करावे लागते. परंतु हे रूपांतर काही निश्चित परिस्थितींमध्येच होऊ शकते, त्यामध्ये निम्नलिखित परिस्थिती अनिवार्य आहेत.

दोन भिन्न प्रकारच्या मालाच्या मालकांचे समोरासमोर असणे आवश्यक आहे आणि त्यांनी एका परस्पर संबंधामध्ये बांधले जाणे गरजेचे आहे. एकीकडे चलन, उत्पादनाची साधने आणि जीवन निर्वाहाच्या साधनांचे मालक असतात. ते दुसऱ्यांची श्रमशक्ती विकत घेऊन आपल्या मालकीच्या मूल्याची एकूण राशी वाढवण्याची लालसा बाळगून असतात. दुसरीकडे असले पाहिजेत स्वतंत्र कामगार, आपली श्रमशक्ती विकणारे आणि म्हणूनच श्रम विकणारे. त्यांना दोन अर्थांनी स्वतंत्र असावे लागते. पहिली गोष्ट म्हणजे, दास, भूदास आदींप्रमाणे ते स्वत: उत्पादनाच्या साधनांचा प्रत्यक्ष हिस्सा असता कामा नयेत आणि ते उत्पादनाच्या साधनांशी जोडलेले असता कामा नयेत. दुसरे म्हणजे, ज्या प्रकारे मालक शेतकऱ्याकडे उत्पादनाची साधने असतात त्याप्रमाणे त्यांच्यापाशी उत्पादनाची साधने असता कामा नयेत. स्वतंत्र कामगार स्वतः कोणत्याही उत्पादनाच्या साधनांपासून स्वतंत्र आणि त्यांच्या ओझ्यापासून मुक्त असतात.

मालाच्या बाजारपेठेचे अशा प्रकारे धृवीकरण झाल्यानंतर भांडवली उत्पादनासाठी आवश्यक मूलभूत अटी पूर्ण होतात. भांडवली व्यवस्था कामगार आणि जिच्याद्वारे त्यांचे श्रम मूर्त रूप प्राप्त करीत असतात, त्या संपत्तीमध्ये एक



परात्मता गृहीत धरून चालते. भांडवली उत्पादन आपल्या पायांवर उभे राहताच, ते ही परात्मता फक्त भूतकाळाचा वारसा म्हणून मिळवत नाही, तर ते सतत वाढत्या प्रमाणात त्याचे पुनरुत्पादन करीत असते. म्हणूनच भांडवली व्यवस्थेसाठी वाट करून देणारी प्रक्रिया म्हणजे दुसरे तिसरे काही नसून अशी प्रक्रिया आहे जिच्याद्वारे कामगारांकडून त्यांच्या श्रमाच्या साधनांची मालकी हिरावून घेतली जाते, एक अशी प्रक्रिया जी एकीकडे त्याच्या जीवन निर्वाहाच्या आणि उत्पादनाच्या साधनांना भांडवलात आणि दुसरीकडे प्रत्यक्ष उत्पादकांना पगारी गुलामांमध्ये बदलून टाकते.

म्हणूनच तथाकथित आदिम संचय म्हणजे दुसरे तिसरे काही नसून अशी ऐतिहासिक प्रक्रिया आहे जिच्याद्वारे उत्पादकाला उत्पादनाच्या साधनांपासून तोडले जाते.

ती आदीम स्वरूप ग्रहण करते कारण ती अशा प्रारंभिक काळाशी संबंधित आहे जो भांडवलशाहीच्या इतिहासाचा आरंभ आणि भांडवलशाहीला अनुरूप उत्पादन पद्धती स्थापित होण्याच्या आधी येत असते.

पान १३ वर

# कथा - नागडा राजा

येह शेङ ताओ
अनुवाद- नागेश भारत धुर्वे.



हैन्स एण्डरसनची गोष्ट तुम्ही वाचली किंवा ऐकली असेल. त्या गोष्टीत एक राजा होता. त्याला नवनवीन कपडे घालण्याचा नाद होता. या राजाला एके दिवशी दोन बदमाशांनी उल्लू बनवलं. त्या बदमाशांनी पैजेवर सांगितलं की ते राजासाठी एक असा सुंदर पोषाख तयार करतील ज्याचा कुणी स्वप्नातसुद्धा विचार करु शकणार नाही. आणि हो, या पोषाखाची एक आगळी मजा असणार आहे. हा पोषाख कुठल्याही मूर्ख किंवा आपल्या पदासाठी अयोग्य व्यक्तीला दिसणार नाही. राजाने ताबडतोब आपल्यासाठी पोषाख बनविण्याचा आदेश देऊन टाकला. मग काय, लगोलग बदमाशसुद्धा माप घेण्याचा, कापण्या-शिवण्याचा अभिनय करू लागले. पोषाख शिवण्याचं काम कसं चाललंय हे बघण्यासाठी राजानं वारंवार आपल्या मंत्र्यांना पाठवलं. प्रत्येक वेळी जाऊन ते राजाला सांगत, आम्ही आमच्या डोळ्यांनी पोषाख बघून आलोय. खरोखर, खूपच सुंदर पोषाख तयार होतोय. खरं तर त्यांनी काही ओ की ठो पाहिलं नव्हतं. पण स्वतःला मूर्ख म्हणवून कसं घ्यायचं? अन् त्याच्याही पुढे, आपल्या पदासाठी आपण अयोग्य आहोत हे म्हणवून घेणं तर त्यांना अजिबात नको होतं.

राजानं ठरवलं, ज्या दिवशी नवा पोषाख तयार होईल त्या दिवशी एक जंगी समारंभ करायचा. आणि त्या दिवशी राजा नवा पोषाख घालून नगरात फिरेल. संपूर्ण राज्यात तशी दवंडी पिटली गेली.

तो दिवस उजाडताच बदमाशाने राजाचे सगळे कपडे उतरवले . ते राजाला नवीन अवतारात सजवण्याचा - नटवण्याचा अभिनय करु लागले. राजाचे दरबारी आणि नोकरचाकर सुदधा एका स्वरात राजाचं गुण-गान करु लागले. कारण पुन्हा तेच. त्यांनाही स्वताःला मूर्ख अथवा आपल्या पदासाठी अयोग्य म्हणवून घ्यायचं नव्हतं. मग काय, राजा आपलं गुण-गान ऐकून आनंदाच्या भरात नागडाच बाहेर निघाला.

रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या लोकांनासुद्धा स्वतःला मूर्ख म्हणवून घ्यायचं नव्हतं. सर्वजण राजाचा नवा पोषाख बघून अशी काही प्रशंसा करीत होते, जणू काही त्यांना खरोखरच पोषाख दिसत होता. पण तेवढयात एक लहान मुलगा भाबडेपणाने बोलून गेला, "अरे त्या माणसानं तर अंगावर काहीच घातल नाय."

तिथे असणा-या प्रत्येक माणसाच्या कानावर लहान मुलाचे हे शब्द पडले, आणि सर्व माणसे हसू लागली, ओरडू लागली, "आरं खरच की! राजाच्या अंगावर साधा एक कपडयाचा तुकडा सुद्धा नाय." क्षणात राजा समजून चुकला की आपल्याला गंडवलेलं आहे. पण आत्ता कुठे खेळ सुरू झाला होता. आणि खेळ मध्येच थांबवणं म्हणजे आणखीनच बदनामी. राजानं ठरवलं, हे असंच सुरू ठेवायचं अन् तो छाती फुगवून दिमाखात चालू लागला.

याच्या नंतर काय झालं ? त्याबद्दल मात्र हैन्स अँडरसननं काहीही सांगितलेलं नाही. प्रत्यक्षात मात्र या गोष्टीत अजून बरंच काही व्हायचं होतं.

काही घडलंच नाही अशा आविर्भावात राजा आपली भव्य मिरवणूक घेऊन पुढे चालू लागला. तो इतका आखडून चालत होता की त्याची खांदे आणि पाठीची हाडे दुखायला लागली. त्याच्या अदृश्य पोशाखाचा मागचा भाग उचलून चालण्याचा अभिनय करणारे सेवक मोठ्या कष्टाने ओठ दाबून हसणं आवरत होते. त्यांनासुद्धा स्वतःला मूर्ख म्हणवून घ्यायची इच्छा नव्हती. अंगरक्षक डोळे जमिनीवर खिळवून चालत होते. एखादयाची नजर आपल्या जोडीदाराच्या चेह-यावर गेली, तर त्याला हसू फुटायचं. पण जनतेचं सगळं रोखठोक असतं. तिला ओठ दाबून, डोळे जमिनीवर खिळवून चालण्याचं काहीच कारण नव्हतं. त्यामुळे राजाने अंगावर काहीच घातलेलं नाही, हे नागडं सत्य समोर येताच लोक जोर जोरात हसायला लागले.

"आयला, चांगलाच राजा हाय हयो, आँ. नागडाच चाललाय," एकानं उत्पाहात म्हटलं.

"हम.. मला वाटतं, याचं डोकं फिरलंय," दुसरा हसत म्हणाला.

"च् च् च् घानेरडा कीडा," अजुन एक जण म्हणाला.

"आरं त्याचा खांदा अन् पाय बघीतलं का? कशी, उलटया पंखाची कोंबडीच हायं असं वाटतया," चौथ्यानं टोमणा मारला.

असल्या या टोमण्यांनी राजाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याने मिरवणुक थांबवली आणि आपल्या मंत्र्यांना दरडावलं, "ह्या मुर्खांचं आणि देशद्रोह्यांचं तोंड जास्तच चालायला लागलंय, तुम्ही त्यांना बोलण्यापासून रोखत कां नाही? माझे नवीन कपडे खुपच उठावदार आहेत. ते परिधान केल्यामुळे माझी ऐट, माझा रूबाब वाढलाय, म्हणून तुम्हीच तर सांगत होता. त्यामुळे यापुढे मी फक्त आणि फक्त हेच कपडे घालणार, दुसरं काहीच घालणार नाही. जो कोणी, मी नागडा आहे असं म्हणण्याचे धाडस करेल तो कपटी आणि गद्दार आहे. त्याला तात्काळ अटक करुन फासावर लटकवा. हा नवीन कायदा मी आजपासूनच लागू करतोय. ताबडतोब ही घोषणा करून टाका."

ह्या नवीन कायद्यामुळे राज्याच्या मंत्र्यांची पळापळ सुरू झाली. मंत्र्यांनी दणक्यात नगरभर या नवीन कायदयाची दवंडी पिटली. हया जीवघेण्या कायदयाच्या भीतीमुळे लोकांचा हसणं आणि टोमणे मारणं बंद झालं. राजाने प्रसन्न मनाने मिरवणुकीस पुढे जाण्याचा आदेश दिला. पण तो थोडासाच पुढे जातो न जातो तोच हसण्याचा आणि टोमण्यांचा आवाज त्याच्या कानात फटाकड्यांसारखा वाजू लागला.

"त्याच्या अंगावर कपडयाचा एक तुकडा देखील नाय."

"कसलं घाणेरड पिवळं जरट शरीर हाय."

"आरं,त्याचं पोट तरी बघा, जसा सडलेला भोपळा हाय!"

"हम... खरचं की, याचे कपडे लईच भारी हायत राव!" अशा प्रत्येक टोमण्याबरोबर हास्याचा स्फोट ऐकू यायचा.

राजाला परत राग आला. त्यान वखवखलेल्या नजरेनं मंत्र्यांना पाहिलं आणि खेकसला, "हे ऐकल का तुम्ही!"

"हो महाराज ऐकलं आम्ही," थर थर कापत मंत्र्यांनी उत्तर दिलं.

"मग? मी नवीन कायदा सुरु केलाय हे विसरलात वाटतं?"

राजाचं बोलण पूर्ण व्हायच्या आतच मंत्र्यांनी शिपायांना आदेश दिला, जे कुणी हसत होते, किंवा टोमणे मारत होते, त्यांच्या मुसक्या आवळा. सगळीकडे गोंधळ उडाला. शिपाई इकडून तिकडे पळत सुटले. पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना अडवू लागले. त्यामुळे चेंगरा चेंगरी झाली. काही लोक पडले, काही जण एकमेकांना तुडवुन पळुन जाण्यात यशस्वी झाले. आता हसणं, खिदळणं अन् टोमण्यांच्या जागी ओरडणं, विव्हळणं कानावर पडू लागलं. सुमारे पन्नास जणांना ताब्यात घेण्यात आलं. राजाने त्यांना मारुन टाकण्याचा आदेश दिला. कारण लोकांना समजलं पाहिजे, माझ्या तोंडून निघालेला शब्द अखेरचा शब्द असतो, आणि त्याची कोणीही चेष्टा करु शकत नाही, राजा म्हणाला.

त्या दिवसानंतर राजाने कुठलाच पोषाख अंगावर चढवला नाही. अंत:पुरापासून दरबारापर्यंत सर्वत्र राजा नागडाच फिरे, अन् मध्येच स्वत:चा पोषाख नीटनेटका करण्याचा अभिनयसुद्धा करी. त्याच्या राण्या आणि दरबारी सुरुवातीला त्याच्या घाणरेडया पिवळया शरीराबरोबर फिरत, राजाच्या अशा वागण्यामुळे त्याची मजा पण घेत. मात्र हळुहळू ते काही झालंच नसावं, असा आव आणायला शिकले. त्यांना या सगळ्या प्रकाराची सवयच झाली. आता ते राजाकडे असे काही पाहत, जणू त्याने अंगभर कपडे घातलेलेच आहेत. दुसरं काही ते करूशी शकत नव्हते, कारण दुसरा पर्यायच नव्हता. नाहीतर फक्त नोकरीच नाही, जीवसुद्धा जायची पाळी. एवढे सारे करूनदेखील जराशी चूक झाली तर ती त्यांच्या नाशाचे कारण ठरू शकली असती.

ऐके दिवशी राजाची प्रिय राणी त्याला खुश करण्यासाठी आपल्या हाताने त्याला मदिरापान करवीत होती. तिने एका प्याल्यात लाल दारू भरुन तो राजाच्या ओठाला लावला लाडात येऊन म्हणाली, हे प्या आणि देव तुम्हाला अमरत्व प्रदान करील. हे ऐकून राजा इतका खुष झाला की त्याने एका दमातच ग्लास रिकामा केला. पण त्यामुळे त्याला ठसका लागला, अन् थोडीशी दारु त्याच्या छातीवर सांडली.

"अहो, तुमच्या छातीवर तर डाग लागला," राणी उद्गारली.

"काय ? माझ्या छातीवर!"

आपल्याकडून भयंकर चूक झाल्याचे राणीच्या लक्षात आले. त्यामुळे तिचा चेहरा पिवळा पडला. "नाही, तुमच्या छातीवर नाही," तिनं कापऱ्या आवाजात स्वतःची चूक दुरुस्त केली, "तुमच्या पोषाखावर डाग लागलाय."

"पण तू तर म्हणालीस, माझ्या छातीवर डाग लागलाय म्हणून. म्हणजे याचा अर्थ मी कपडेच घातलेले नाहीत. मूर्ख कुठली! तू दगाबाज आहेस. आणि तू माझा कायदा मोडला आहेस!" एवढं बोलून राजाने हुकूम सोडला, "हिला जल्लादाकडे घेऊन चला." राजाचे शिपाई आले आणि राणीला फरफटत घेऊन गेले.

राजाचा एक खूपच विद्वान मंत्रीसुदधा राजाच्या हेकटी स्वभावाचा बळी ठरला. जे चाललंय त्याकडे दुर्लक्ष करायची सवय त्याने लावली होती खरी, पण भरल्या दरबारात सिंहासनावर नागडा बसणाऱ्या माणसाला राजा म्हणायची त्याला लाज वाटत होती. मनातल्या मनात तो त्याला 'टकलं माकडच' म्हणायचा. पण त्याला या सगळयाची भीती वाटयची. एखादया दिवशी मनातल ओठवर आलं तर. नको त्या प्रसंगी हसू फुटलं तर. तसे झाले तर त्याचा सर्वनाश ठरलेला होता. त्यामुळे त्याने आपल्या वृध्द आईला बघण्यासाठी घरी जाण्याचं खोटं कारण देत रजा मागितली.

"एका मातृभक्त मुलाची विनंती मी कशी काय फेटाळू शकतो," राजा म्हणाला आणि राजाने त्याला रजा दिली. रजा मिळाल्यामुळे मंत्र्याला हायस वाटलं. आपल्या खांद्यावरचं खूप मोठ ओझ उतरल्यासारखं वाटलं त्याला. त्याने सुटकेचा श्वास घेतला आणि पुटपुटला, "देव पावला, आता या नागड्या राजाला पाहावं लागणार नाही."

राजाला या कुजबुजण्याची भणक लागली. त्याने आपल्या सेवकानां विचारलं, "काय म्हणाला हा?" गडनडीत सेवकांना काय उत्तर द्यावं सुचलं नाही, त्यांनी खरं खरं सांगून टाकलं.

"असं आहे तर, तू रजा यासाठी मागितलीस की तुला मला पाहायला आवडत नाही," राजा ओरडला, "तू माझा कायदा मोडला आहेस. तुला कायमच्या रजेवर पाठवतो. आणि रजासुद्धा अशी की तू आयुष्यात पुन्हा घराचं तोंड पाहू शकणार नाहीस." त्यानंतर राजान जल्लादांना आदेश दिला, याला घेवुन जा, आणि याचं मुंडकं छाटून टाका.

अशा घटनांमुळे अंतःपुरात आणि दरबारात प्रत्येक माणूस सावध राहयाला लागला. पण सामान्य जनता अजून राण्या आणि दरबाऱ्यांसारखी चलाखी शिकली नव्हती. त्यामुळे जेव्हा राजा आपलं सोंग आणि घाणेरडं शरीर घेऊन जनतेच्या समोर जाई तेव्हा त्यांना हसणं आवरणं कठीण जायचं. त्यानंतर खुनांचं सत्रच सुरु व्हायचं. एके दिवशी राजा यज्ञ करण्यासाठी मंदिरात गेला. तेव्हा त्याच्या शिपायांनी तीनशे लोकांना जल्लादाच्या हवाली केलं. ज्या दिवशी तो आपल्या सैन्याच्या हवालीसाठी गेला त्या दिवशी पाचशे लोकांचे खून पडले. आणि ज्या दिवशी तो राज्याच्या दौ-यावर गेला, त्या दिवशी हजारो लोकांचे मुडदे पाडण्यात आले.

एका दयाळू वृध्द मंत्र्यान विचार केला, राजाने सगळया मर्यादा ओलांडलेल्या आहेत. आता काही तरी केलं पाहीजे. पण राजा आपली चूक कबूल करणा-यातला नव्हता. त्याला त्याची चूक दाखवून देणं म्हणझे स्वतःच्या पायावर कु-हाड मारुन घेण्यासारखं होत. तेव्हा वृध्द मंत्र्यान विचार केला, काहीही करुन राजाला परत कपडे घालायला भाग पाडलं तर लोकांचं हसणं आणि टोमणे मारणं थांबेल. आणि आपोआपच लोकांचे प्राणसुध्दा वाचतील. काय करावं ज्याने सापही मरेल आणि काठीसुद्धा मोडणार नाही. कित्येक दिवस आणि रात्री हाच विचार त्याच्या डोक्यात घोळत होता.

अन् एके दिवशी त्याला एक युक्ती सुचली. तो राजाकडे गेला आणि म्हणाला, "हे राजन! तुमचा एक प्रमाणिक सेवक या नात्याने मी तुम्हाला काही सुचवू इच्छितो. राजन तुम्हाला नवनवीन कपडे घालण्याची आवड आहे. त्यामुळे तुमचा रूबाब वाढतो. पण हल्ली मी बघतोय की, आपण राज्याच्या कारभारात इतके व्यस्त झाला आहात की, आपल्याला नवनवीन कपडे घालण्याचं भानच राहिलेलं नाही. जो पोषाख तुम्ही सध्या घातला आहे, त्याचा रंग उडाला आहे. त्यामुळे मला वाटते की तुमच्यासाठी एक नवीन पोषाख तयार करण्यासाठी तुम्ही तुमच्या शिंप्यांना आदेश द्यावा."

"काय म्हणालात? माझ्या कपडयांचा रंग उडालाय?" राजा आपल्या नसलेल्या कपडयांवरून हात फिरवत म्हणाला. "बकवास! हा जादुई पोषाख आहे. याचा रंग कधीच उतरत नाही. तू ऐकलं नव्हतंस वाटतं, मी घोषणा केली होती की मी या पोषाखाशिवाय काहीच घालणार नाही. मी हा पोषाख उतरवावा अशी तुझी इच्छा आहे. जेणेकरून मी खराब दिसावं. हो ना ? वारे वा! चल, जाऊ दे, तुझे वय आणि मागची सेवा बघून मी तुला जीवदान देतो. पण तुझं उरलंसुरलं जीवन आता काळोख्या कोठडीतच जाणार."

याच प्रकारे शेकडो लोकांना फासावर लटकवण्याचं काम चालूलेच होते. तरीही लोकांचं हसणं बंद न झाल्यामुळे राजा आणखीच भडकला. त्याने आणखी कडक कायदा केला. ह्या वेळेस त्यानं

पान १३ वर

# संघवाल्यांचे कारस्थान ओळखा
# ओळखा, कोण खरा देशभक्त आहे आणि कोण देशद्रोही?

सध्या देशभरात काही लोक देशभक्ती आणि राष्ट्रभक्तीचे ठेकेदार बनलेले आहेत. हे तेच लोक आहेत ज्यांचा स्वातंत्र्यलढ्यात कसलाही सहभाग नव्हता. अमर शहीद भगतसिंग आणि त्यांच्यासारख्या अनेकानेक स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या विरोधात ज्यांनी इंग्रजांसाठी हेरगिरी केली, तेच हे लोक आहेत. हे तेच लोक आहेत ज्यांनी हिटलर आणि मुसोलिनीला आपला आदर्श मानले होते. आणि स्वातंत्र्याच्या आगोदर ब्रिटिश राणीला सलामी देणारे हेच लोक आहेत. हे कधीपासून देशभक्तीचे ठेकेदार बनले? सत्ताधारी पार्टी आणि संघ परिवाराची ही माणसं आज धर्म आणि जातीच्या नावाखाली देशाचे तुकडे पाडत आहेत. साम्प्रदायिकतेच्या लाटेवर स्वार होऊन हे सत्तेत पोहचले. त्यांनी देशभक्तीला सरकारभक्तीकशी जोडलं आहे. जो कोणी ही शासनापेक्षा वेगळा विचार करण्याचे धाडस करतो आहे, त्यांच्या राजकारणावर टीका करत आहे, जो आपल्या हक्कासाठी आवाज उठवतो आहे, अशा प्रत्येकालाच ते देशद्रोही आणि राष्ट्रद्रोही घोषित करीत आहेत. अम्बानी आणि अदानींसारख्यांच्या तुकडयांवर जगणारा कॉरपोरेट मीडियासुद्धा ह्या तथाकथित "देशभक्तीच्या" सुरात सूर मिसळवीत आहे आणि आपल्या चकचकीत वातानुकूलीत स्टूडिओमध्ये खटलाही चालवीत आहे.

हे एकूण प्रकरण जेएनयू (जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली) मध्ये भारतविरोधी घोषणा दिल्यापासून तापले. सर्वोच्या न्यायालयाच्या आदेशाचा या धार्मिक कट्टरतावादी फासीवादी गुंडांनी न्यायालयाच्या आवारात भंग केला. त्यात दिल्ली पोलीसांनी बघ्याची भूमिका घेतली. न्यायालयाच्या आवारात पत्रकारांवर आणि नागरिकांवर हल्लात केला गेला. त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली. **असं तर हिटलरच्या जर्मनीमध्ये आणि मुसोलिनीच्या इटलीमध्ये व्हायचं, जेव्हा कायद्याचंशासन संपलं होतं. आणि त्यावेळीसुद्धा अशाच प्रकारचे देशभक्ती आणि राष्ट्रभक्तीचे ठेकेदार रस्त्यांवर गुंडगिरी करीत होते. अशा वेळी आम्ही तुम्हांला काही गोष्टींवर विचार करण्याचे आवाहन करीत आहोत.**

जेएनयूमध्ये भारत विरोधी घोषणा देणारे काही जण म्हणजे अराजकतावादी तत्त्वे होती, हे आता सिद्ध झाले आहे. त्यांपैकी बहुतेकजण तर जेएनयूचे विद्यार्थीसुद्धा नव्हते. खरे तर आरोपींना पोलिस अजून अटकसुद्धा करू शकेलेले नाहीत. परंतु एक निरपराध विद्यार्थी कन्हैया कुमारला मात्र अटक करण्यात आली. त्याशिवाय इतर काही विद्यार्थ्यांवर खोटे खटले भरण्यात आले आहेत. **त्यांना निशाणा कां बनवण्यात येत आहे, आपल्याला माहीत आहे का? कारण हे तेच विद्यार्थी आहेत ज्यांनी याआधी कामगारांचे शोषण, महागाई आणि बेरोजगारीच्या विरोधात आवाज उठवला होता. हे तेच विद्यार्थी आहेत ज्यांनी मोदी सरकारच्या विद्यार्थीविरोधी, कामगारविरोधी आणि गरीबविरोधी धोरणांना विरोध केला होता. अशात मोदी सरकार काही अराजकतावादी तत्वांच्या हालचालींच नाटक करून या निरपराधी विद्यार्थ्यांना आणि संपूर्ण जेएनयूला निशाणा बनवत आहे.** तेव्हा विचार करा की हे नक्की चाललंय काय? दिल्लीच्या मायापुरीमधील एका कामगाराचा काम करीत असताना मृत्यू झाला. त्यानंतर जेव्हा कामगारांनी न्यायाची आणि नुकसान भरपाईची मागणी केली तेव्हा त्यांच्यावरही पोलिसांनी लाठीमार केला. त्यांच्या नेत्यांवर देशविरोधी असण्याचा आरोप करण्यात आला. पुण्यातील एफटीआयआयच्या विद्यार्थ्यांसोबतही हेच झालं. आणि जेव्हा जेव्हा आपल्या हक्कांसाठी देशातील कष्टकरी आणि कामगार आवाज उठवण्याचा प्रयत्न करीत आहेत तेव्हा त्यांच्यापैकी प्रत्येकासोबत हेच केले जात आहे.

**देशद्रोह किंवा राष्ट्रद्रोहाची व्याख्या संविधानात दिली गेली आहे, हेदेखील लक्षात घेतले पाहिजे. सरकारापासून ते देशातल्या सर्व पक्षांना ती बंधनकारक आहे. ही व्याख्या काय सांगते? तर कोणतीही व्यक्ती सरकारच्या निर्णयावर टीका करू शकते, त्याचा सनदशीर मार्गाने विरोध करू शकते, तसेच समाजातील कोणत्याही समुदायाच्या हक्कासाठी बोलू शकते. परंतु जर कुणी व्यक्ती सरकारविरुद्ध सशस्त्र विद्रोह किंवा हिंसक कारवाई करण्यात गुंतलेली असेल किंवा हिंसेसाठी प्रवृत्त करण्यात गुंतलेली असेल तर तिच्यावर देशद्रोहाचा खटला चालवला जाऊ शकतो. मग वाट्टेल त्याला देशद्रोही आणि राष्ट्रद्रोही घोषित करण्याचा हक्क धार्मिक कट्टरतावादी फासीवाद्यांना कुणी दिला?** विशेष म्हणजे, आज राष्ट्रभक्तीचे सर्टीफिकेट इतरांना देण्याचा ठेका घेणारे हेच लोक देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात तर देशाशी गद्दारी करीत होते. इंग्रजांच्या विरोधात लढण्याचे सोडूनच द्या, उलट त्यांच्यासाठी हेरगिरी करणे, माफीनामे लिहून देणे आणि राणीला सलामी देणे यांसारखी कामे यांनी केलेली आहेत. इतिहास त्याचा साक्षीदार आहे. १९२५ मध्ये आरएसएसची

**पान ७ वर**

# नफ्याच्या गोरखधंद्यात बळी जाते आहे विज्ञान आणि तडफडतो आहे मनुष्य

विज्ञान मानवाचा सेवक आहे, असे आपण म्हणतो खरे, परंतु भांडवलशाहीत मात्र विज्ञान निव्वळ नफा कमावण्याचे एक साधन होऊन राहिले आहे. कधीच शांत न होणाऱ्या नफ्याच्या हव्यासाने ग्रस्त असलेली ही मानवद्रोही भांडवली व्यवस्था माणसाबरोबरच मानवी मूल्ये आणि मानवी संवेदनांनासुद्धा सतत गिळंकृत करीत आहे. विज्ञानाची एक शाखा असलेल्या आरोग्य विज्ञानाचे उदाहरण आपण पाहू शकतो. विज्ञानाच्या दुसऱ्या कोणत्याही शाखेप्रमाणेच आरोग्य विज्ञानानेसुद्धा गेल्या काही दशकांमध्ये अभूतपूर्व अशी प्रगती केलेली आहे, अनेक शिखरे पादाक्रांत केलेली आहेत. अनेक रोगांवर विजय मिळवलेला आहे, आणि अनेक रोगांशी लढण्यास आपण समर्थ बनलो आहोत. परंतु विज्ञानाच्या अन्य शाखांप्रमाणेच आरोग्य विज्ञानसुद्धा भांडवलशाहीच्या जाळ्यात असे काही सापडले आहे की उच्च मानवी मूल्यांवर आधारित हे विज्ञान फक्त नफा उकळण्याचे एक माध्यम बनले आहे. या व्यवस्थेत रोग्याला रोगी समजले जात नाही, तर त्याला एक गिऱ्हाईक समजले जाते. या गिऱ्हाईकाला औषधे आणि उपचार विकले जातात. डॉक्टरांपासून औषध कंपन्यांपर्यंत या व्यवसायाशी संबंधित बहुतेक लोक नफ्याच्या दलदलीत खोलवर रुतलेले आहेत.

याच संदर्भात काही दिवसांपूर्वीची बातमी आहे. अमेरिकेच्या टूरिंग फार्मा नावाच्या एका औषध कंपनीने दैराप्रिम नावाचे एक औषध बनवण्याचे आणि विकण्याचे अधिकार खरेदी केले आहेत. हे औषध टोक्सोप्लाज्मोसिस नावाच्या एका आजारावर तसेच अन्य काही औषधांबरोबर एड्सच्या उपचारासाठी वापरले जाते. लाखो एड्स पीडितांसाठी हे औषध संजीवनीसारखे काम करते. या औषधाचे अधिकार खरेदी करताच या औषध कंपनीने पहिले काम कोणते केले असेल तर, अगोदर प्रति टॅबलेट १३.५० डॉलर असलेली या औषधाची किंमत दुसऱ्याच दिवशी वाढवून प्रति टॅबलेट ७५० अमेरिकन डॉलर इतकी केली. रोग्याच्या उपचारांवर पूर्वी ११३० डॉलर इतका खर्च व्हायचा, तो वाढून ६३००० डॉलर इतका झाला. या हिशेबाने जर एका वर्षाच्या उपचाराचा हिशेब मांडायचा झाला तर तो ६००००० डॉलर म्हणजेच ३९०००००० इतका होतो! कंपनीच्या भागधारकांच्या (शेअरहोल्डर) हिताचे मला रक्षण करायचे आहे, असे या दरवाढीबद्दल कंपनीचे सीईओ मार्टिन श्क्रे ली यांनी निर्लज्जपणे सांगितले. लोकांच्या उपचाराशी त्यांना अर्थातच काहीही देणेघेणे नाही. २० टक्के, ५० टक्के, १०० टक्के किंवा अगदी २०० टक्के दरवाढसुद्धा अधुनमधुन होतच असते, परंतु यावेळी झालेली दरवाढ इतकी भरमसाठ आहे की तिचा भांडवली मीडियानेसुद्धा विरोध केलेला पाहावयास मिळतो आहे. चहू बाजूंनी छी-थू झाल्यावर ही प्रचंड दरवाढ कदाचित कमी केलीही जाईल, परंतु प्रश्न या एका औषधाचा किंवा एका कंपनीचा नाही. खरे तर हे प्रकरण म्हणजे पाण्यात दडलेल्या हिमनगाचा वर दिसणारा फक्त छोटासा भाग आहे. अख्खा हिमखंड प्रचंड आहे, आणि तो दिसत नाही आहे. अर्थात ही घटना म्हणजे नफ्यावर आधारित या व्यवस्थेला नागडे करणारे एक अभिजात उदाहरण आहे, असे आपण जरूर म्हणू शकतो.

या कंपन्या नव्या औषधांचे फक्त मार्केटिंग आणि व्यापार करतात, कोणताही नवा आविष्कार करीत नाहीत, हे सर्वज्ञात आहे. अशा प्रकारे या कंपन्यांना सतत फायदाच झालेला आहे. यांचा फायदा कष्टकरी जनतेला फार महागात पडतो, हे तर दिसतेच आहे. परंतु विश्वव्यापी आर्थिक संकटामुळे औषध कंपन्यांचे मालकसुद्धा नफा कमी झाल्यामुळे हैराण आहेत. आर्थिक संकटाच्या काळात बाजार मालांनी भरलेला असतो, आणि व्यापक जनतेची सापेक्ष क्रयशक्ती जवळपास नसल्यागत होते. त्यामुळे बहुतेक माल विकला जाऊ शकत नाही व त्यामुळे भांडवलदाराला नफा मिळू शकत नाही. भांडवल फसल्यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी पसरते, व त्यामुळे संकट आणखीनच वाढते. हे औषध उद्योगाशी जोडून पाहिल्यावर आपण समजू शकतो की अन्य उत्पादनांप्रमाणेच औषधसुद्धा एक माल असते. जेव्हा आर्थिक अरिष्ट येते तेव्हा इतर क्षेत्रांप्रमाणेच ते त्यालासुद्धा तावडीत पकडते. आजच्या काळात औषध उद्योगसुद्धा संकटाला तोंड देतो आहे. दुसरीकडे, आणखी दहा वर्षांच्या आत बहुतेक औषधांचे पेटंट संपुष्टात येणार आहेत, त्यामुळे एकाधिकार संपल्यामुळे त्यांना अब्जावधी डॉलरचे अतिरिक्त नुकसानसुद्धा सोसावे लागणार आहे. म्हणूनच ते आता आपले लक्ष कमी वापरात असलेल्या अशा औषधांवर केंद्रित करीत आहेत ज्यांमध्ये स्पर्धा फार कमी आहे. म्हणूनच मनमान्या पद्धतीने किंमती वाढवून नफा टिकवून ठेवण्याचे प्रयत्न केले जात आहेत, हे स्पष्टच आहे. टूरिंग फार्मा कंपनीचे हे पाऊलसुद्धा त्याचाच पुरावा आहे.

औषधांच्या दरवाढीचे औचित्य सिद्ध करण्याचा प्रयत्न करताना श्क्रेली म्हणाले की किंमतीमध्ये होणारी ही वाढ वास्तविक रोग्यांच्या फायद्यासाठीच आहे. श्क्रेठली यांनी सांगितले की या एक्स्ट्रा नफ्याचा वापर मेडिकल रिसर्चसाठी केला जाईल, व त्यामुळे आरोग्य विज्ञान आणि रोग्यांचा लाभच होईल. परंतु भांडवलदार कोणत्या प्रकारचा रिसर्च करतात ते कोणापासूनही लपून राहिलेले नाही. एड्स या आजारावर कोणताही इलाज नाही आणि आत्तापर्यंत असे कोणतेही औषध तयार झालेले नाही जे एड्स पूर्णपणे नाहीसा करू शकेल. तसेच त्याच्यावर कोणतेही वॅक्सिनसुद्धा अजून शोधले गेलेले नाही. अशा परिस्थितीत सुरू होणारा कोणताही रिसर्च पूर्णत्वास जाऊ शकत नाही कारण एक तर मोठे मोठे औषध उद्योजक लॉबिंग करून त्यात खोडा घालतात किंवा पैसे कमी पडल्यामुळे तो पुढे सरकू शकत नाही. याचे कारण असे की जर एड्स समूळ नाहीसा करणारे एखादे वॅक्सिन किंवा औषध तयार झाले तर या औषध कंपन्या वर्षानुवर्ष रोग्यांना औषधे विकून जो नफा कमावत असतात तो मारला जाईल.

हा प्रकार फक्त एड्सबाबतच आहे, असे नाही. २००७ मध्ये अल्बर्टा विद्यापिठाच्या संशोधकांना असे आढळले की डीसीए नावाचा एक यौगिक कॅन्सरच्या कोशिकांना नैसर्गिक रुपात नष्ट करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका वठवू शकतो. प्रयोगशाळेत केलेल्या प्रयोगांमध्ये हे रसायन वेगवेगळ्या प्रकारच्या कॅन्सरशी लढण्यात प्रभावी असल्याचे दिसून आले. कॅन्सरशिवाय माइटोकान्ड्रियाशी संबंधित कित्येक रोगांमध्ये हा यौगिक बऱ्याच काळापासून प्रयोगात आणला जात आहे. याचे मानवी शरीरावरील प्रभावसुद्धा वैज्ञानिकांना माहीत होते. परंतु या यौगिकाची एक अडचण होती. त्याचा पेटंट घेतला जाऊ शकत नव्हता. साहजिकच पेटंट नसल्यामुळे नफा कमी असणार होता, व म्हणूनच पुढच्या संशोधनासाठी कोणत्याही कंपनीने पैसे लावले नाहीत. काही काळ तर संशोधकांनी स्वतःच्या पैशावर संशोधन सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला परंतु पैशाची चणचण असल्यामुळे गेल्या दोन वर्षांत या बाबतीत कोणतेही खास काम होऊ शकलेले नाही. स्वतःच्या रिसर्चच्या नावाखाली मोठ्या (आणि अगदी मध्यम श्रेणीच्यासुद्धा) औषध कंपन्या एवढेच करतात की छोट्या बायोटेक कंपन्यांकडून मूळ रिसर्च फॉर्मुले खरेदी करतात आणि मग त्यांचा पेटंट घेऊन मनमान्या किंमतींवर ती औषधे विकतात.

या औषध कंपन्या उपचारांसाठी ना कोणताही खास रिसर्च करतात ना रिसर्चवर पैसा लावतात. जीवघेण्या आजारांच्या उपचारांसाठी औषधे बनवणे हा त्यांचा उद्देश्य नाही तर औषधांचे मार्केटिंग करणे व आजार लांबत जाईल याची दक्षता घेत त्याची विक्री करणे, हा त्यांचा उद्देश्य आहे. १९७५ पासून १९९७ पर्यंत बहुराष्ट्रीय कंपन्यांनी १२३३ नवीन औषधे बाजारात आणली. यांपैकी फक्त १ टक्का, म्हणजेच १३ औषधे विकसनशील देशांमध्ये लोकांचे जीव घेणाऱ्या उष्णकटिबंधीय रोगांच्या निदानात कामी येणारी होती. या देशांतील कष्टकरी लोकांच्या जीवाचे काहीच मोल नाही, हे स्पष्टच आहे, कारण हे लोक महागडी औषधे विकत घेऊ शकत नाहीत. खरे तर या कंपन्यांचा रिसर्चचा मुख्य उद्देश्य लाइफ स्टाइल डिजिज,

**पान १० वर**

• संपादक मंडळ – नारायण खराडे, विराट चौधरी • संपादकीय कार्यालय- रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३
मो. नं. ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३ • जागृति प्रिंटर्स, १२-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इण्डस्ट्रीज, भायखला, मुंबई फोन न. ०९८२००१७५८८ कडून मुद्रित